सोलापूर
तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, २० ऑगस्ट २०२४ | वर्ष दुसरे | अंक १४९ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

डॉक्टरांना जगू द्या!, कोलकाता प्रकरणावर आयएमए अध्यक्षांचे भावनिक पत्र

नवी दिल्ली, १९ ऑगस्ट : कोलकाता प्रशिक्षणार्थी महिला डॉक्टर बलात्कार प्रकरणावर इंडियन मेडिकल असोसिएशनचे (आयएमए) अध्यक्ष डॉ. आर. व्ही असोकन यांनी भावनिक पत्र लिहिलं आहे. या पत्रातून त्यांनी या बलात्कार प्रकरणाचा निषेध केला असून डॉक्टरांच्या सुरक्षेचा मुद्दा उपस्थित केला आहे. तसेच डॉक्टर अनाथ नाहीत. पण एकदा सर्वांनी डॉक्टरांना दत्तक घेतलं पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले.

असोकन यांनी पत्रात म्हटले, एक राष्ट्र म्हणून आपण तिला मरण पत्करू दिले नाही. राष्ट्राचा मूड पकडणे कठीण आहे. क्रोध, विद्रोह, निराशा, असहायता. एकदा भारताने तिच्या डॉक्टरांना बरोबर समजून घेतले. ती ३६ तास ड्युटीवर होती. वॉर्डाशेजारील सेमिनार रूममध्ये आराम करण्यापूर्वी तिने २ वाजता

जेवण केले. निम्न मध्यमवर्गीय पालकांची एकुलती एक मुलगी. साधे मध्यमवर्गीय पालक, असह्य. पण त्यांनी आता जीवनाचा अर्थ आणि उद्देश गमावला. रस्ते रिकामे होते. भीती होती. एका कोपऱ्यात काही कर्तव्यदक्ष तरुणांनी आंदोलन केले. विचित्र शांतता. तिने दहा लाख मेणबत्त्या पेटवल्या होत्या. युद्धाचे हजारो ढोल वाजले. प्रत्येक भारतीय कुटुंबाने आपली मुलगी गमावली. मातांना वाईट वाटलं. वडील मूकपणे रडले. कारण ते प्रथम रहिवासी होते. पुढचे सात दिवस ते झोपले नाहीत. त्यांची जागरुकता आणि अग्निशक्ती हीच राष्ट्राची आशा आहे. त्यांनी रेझिस्टन्सला छिन्न केले.

आयएमए स्वातंत्र्यलढ्याच्या आगीत खच- चा जन्म झाला.. आग अजूनही धगधगत आहे. व्यवसायात विवेक राखणारा. सर्व जिल्ह्यांत रुजलेली ही संस्था. त्यांनीही आंदोलनाला ताकद दिली. डॉक्टर अनाथ नाहीत. अजून तरी नाही. एकदा सर्वांनी डॉक्टरांना दत्तक घेतले. स्वातंत्र्याची ७७ वर्षे. आपण तरुण राष्ट्र आहोत. निरक्षर कायदे दुरुस्त करता येतात. त्यागात डॉक्टर हा एक वेगळा वर्ग आहे. आम्ही जगण्याच्या अधिकाराचे आवाहन करतो. डॉक्टरांना जगू द्या. डेस्टिनीशी प्रयत्न पूर्ण प्रमाणात रिडीम झाला नव्हता. त्यामुळे डॉक्टरांना डावलले. आम्ही परत लढण्यासाठी जगतो, असं आवाहनही त्यांनी केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी युक्रेन दौऱ्यावर जाणार; युक्रेन-रशियात थेट मध्यस्ती करणार नाही

नवी दिल्ली, १९ ऑगस्ट : पंतप्रधान नरेंद्र मोदी या आठवड्यात युद्धग्रस्त युक्रेनला भेट देणार आहेत. परराष्ट्र मंत्रालयाने सोमवारी ही माहिती दिली.रशियासोबत सुरू असलेल्या युद्धादरम्यान पंतप्रधान मोदींचा हा पहिलाच युक्रेन दौरा आहे.

याबाबत परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले की, पंतप्रधानांनी सुमारे एक महिन्यापूर्वी रशियाला भेट दिली होती आणि राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांची भेट घेतली आणि त्यांना सांगितले की युक्रेन संकटावर लष्करी तोडगा काढणे शक्य नाही. रशिया आणि युक्रेनमध्ये भारत थेट

मध्यस्थी करणार नसल्याचे सूत्रांनी सांगितले. तथापि, ते दोन्ही देशांमधील संदेश पोहोचविण्यात मदत करू शकते.

गेल्या महिन्यात, भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार यांच्याशी फोनवर झालेल्या संभाषणात, राष्ट्राध्यक्ष र झेलेन्स्कीचे चीफ ऑफ स्टाफ आंद्री येरमाक म्हणाले होते की युक्रेनमध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी मोदी महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतात. सूत्रांनी सांगितले की, भारत दोन युद्धरत देशांमधील कोणत्याही थेट मध्यस्थीच्या भूमिकेसाठी उत्सुक नाही. मध्यस्थी करण्याऐवजी आपण दोन्ही पक्षांमधील संदेश पोहोचवू शकतो, असे संकेत त्यांनी दिले आहेत. आपण मध्यस्थी करणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे पण आपण संदेश देऊ शकतो असे म्हटलं आहे. मात्र, या प्रकरणी परराष्ट्र मंत्रालयाकडून अद्याप कोणतेही अधिकृत वक्तव्य आलेले नाही.

जळगावात चार सख्ख्या बहीण-भावंडांचा बुडून मृत्यू

जळगाव १९ ऑगस्ट : रक्षाबंधन बहिण भावाच्या नात्याचा सण.. मात्र चाळीसगावात रक्षाबंधन सणाला गालबोट लागले. तालुक्यातील पिंपरखेड गावाच्या परिसरातील केटी वेअर धरण परिसरात खेळायला गेलेल्या चार सख्ख्या बहीण- भावांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली. चाळीसगाव तालुक्यातील पिंपरखेड गावात आदिवासी समाजाचे आर्य परिवार मजुरीसाठी म्हणून येथील उदय सुधाकर अहिरे यांच्याकडे आलेले आहे. त्यांच्या परिवारात ५ मुली, १ मुलगा आहेत. परिवारातील मोठी मुलगी ही भांडी घासण्यासाठी के. टी. वेअर धरणाच्या काठावर गेली होती. बहिणी सोबत जावे म्हणून रोशनी सुभाषसिंग आर्य (वय ९ वर्ष), शिवांजली सुभाषसिंग आर्य (वय ८ वर्ष), आर्यन सुभाषसिंग आर्य (वय ३ वर्ष) आराध्या सुभाषसिंग आर्य (वय ४ वर्ष, सर्व रा. दुगणी तहसील ता. सेंधवा जिल्हा बडवणी) ही चार मुले रविवारी संध्याकाळी ६ वाजेच्या सुमारास सोबत गेली. धरणाच्या पाण्याजवळ गेले असताना त्यांचा पाय घसरला आणि ते पाण्यात पडले. चारही भावंड क्षणार्धात एकमेकांसोबत बुडाले. ग्रामस्थांना समजताच त्यांनी धावाधाव केली.

महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक लांबणीवर?, राष्ट्रपती राजवट लागण्याची शक्यता

झारखंडसोबत लागू शकते निवडणूक

मुंबई, १९ ऑगस्ट : महाराष्ट्र विधानसभेची मुदत २६ नोव्हेंबर २०२४ रोजी संपणार आहे. त्यामुळे डिसेंबर महिन्यात निवडणूक घ्यायची झाल्यास नियोजित वेळेत नवी विधानसभा अस्तित्त्वात न आल्यास महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागू होण्याची शक्यता आहे. यापूर्वी २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रात बरेच दिवस सरकार स्थापन होत नसल्याने राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली होती. गेल्या आठवड्यात दिल्लीत झालेल्या पत्रकार परिषदेत केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी महाराष्ट्रात गरज भासल्यास राष्ट्रपती राजवट लागू करण्याचे संकेत दिले होते. राज्यातील विधानसभेची मुदत संपल्यानंतर सहा महिन्यांच्या आत निवडणूक घेण्याची मुभा निवडणूक आयोगाला असते. त्यामुळे २६ नोव्हेंबर रोजी विधानसभा बरखास्त झाली तरी संविधानातील तरतुदीनुसार राष्ट्रपती राजवट लागू करता येऊ शकते.

नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत महायुतीने महाराष्ट्रात निवडणुकीपूर्वी ४५ पेक्षा अधिक जागा जिंकण्याचा दावा केला होता. मात्र प्रत्यक्षात एकूण ३० जागांवर महाविकास आघाडी, तर अवघ्या १७ जागांवर महायुतीच्या उमेदवारांचा विजय झाला होता. त्यामुळे महायुतीला मोठा फटका बसल्याचे स्पष्ट झाले होते. विधानसभा निवडणुकीतही संभाव्य पुनरावृत्ती होऊ शकते, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे. या पार्श्वभूमीवर महायुती सरकारने अनेक लोकप्रिय योजनांची घोषणा केली होती. यापैकी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही सध्या चर्चेचा केंद्रबिंदू ठरत आहे. या योजनेनुसार २१ ते ६५ वयोगटातील महिलांना राज्य सरकार महिन्याला १५०० रुपयांची आर्थिक मदत करणार आहे. १४ ऑगस्टपासून या योजनेच्या पहिल्या हप्त्याचे पैसे लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होण्यास सुरुवात झाली होती.

राष्ट्रपती राजवट लागू होणार?

राज्यातील विधानसभेचा कार्यकाळ २६ नोव्हेंबर रोजी संपत आहे. याच पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाचीही तयारी असल्याचे स्पष्ट संकेत नवी दिल्लीमधील पत्रकार परिषदेत मिळाले. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी गरज पडली तर महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागू केली जाईल असे संकेत दिले आहेत. कोणत्याही राज्यामधील विधानसभेची मुदत संपल्यानंतर सहा महिन्यांमध्ये निवडणूक घेण्याची मूभा निवडणूक आयोगाला असते. त्यामुळेच विद्यमान विधानसभा २६ नोव्हेंबरला बरखास्त झाली आणि निवडणूक डिसेंबर होणार असेल तर मधल्या कालावधीमध्ये राज्यात राष्ट्रपती राजवट लागू शकते अशी शक्यता आहे. संभाव्य निवडणूक आणि विधानसभा बरखास्तीच्या कालावधीत फार कमी फरक असेल, तर अवघ्या काही आठवड्यांमध्ये निवडणुकीचा निकाल लावून पुन्हा सरकार सत्तेत येईल, असे संकेतही निवडणूक आयोगाने दिले आहेत.

हे छायाचित्र एखाद्या नदीचे नसून जोगेश्वरी येथील येथील ग्रामपंचायत समोरून जाणाऱ्या रस्त्याचे आहे. या रस्त्याच्या आजूबाजूला दोन शाळा असून विद्यार्थ्यांना पाऊस आल्यानंतर अशाप्रकारे गुडघ्यावर पाण्यातून ये -जा करावे लागत आहे.

सोयगावच्या सोना नदीला पावसामुळे आला पूर, पिकांना दिलासा

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१९ ऑगस्ट

सोयगाव सह परिसरात सोमवारी दुपारी तीन वाजता अचानक तीस ते चाळीस मिनिटे धुव्वाधार पावसाने हजेरी लावल्याने पिकांना दिलासा मिळाला आहे जरंडी परिसरात जोरदार पाऊस झाल्याने जरंडीत खडकी नदीला जुलै महिन्यानंतर दुसऱ्यांदा सोमवारी पूर आला होता सोयगाव परिसरात दि.८ आगस्ट पासून अकरा दिवसांचा खंड पडला होता तयामुळे कपाशीची पिकांनी ऊन धरले होते

मात्र सोमवारी दुपारी झालेल्या चाळीस मिनिटे पावसाने कपाशी मका पिकांना तग धरला आहे मात्र तालुक्यातील निम्म्या भागात पाऊस नसल्याने कही खुशी कही गम अशी स्थिती होती.

सोयगाव सह जरंडी,निंबायती,बहुलखेडा,कवली,उमर विहिरे ,निमखेडी,घोसला,बनोटी,वाडी,नायगाव,पळाशी, हनुमंतखेडा आदी भागात जोरदार पावसाने हजेरी लावली तर इतर भागात पावसाचा थेंब ही नव्हता मात्र सोयगाव शहरासह कंकराळा,जरंडी,निंबायती,रामपुरातांडा,बहुलखेडा,कवली, उमरविहिरे,निमखेडी,घोसला या दहा गावात जोरदार पावसाने हजेरी लावली होती.

फारोळा येथील कंपनीमध्ये अपघात; एक ठार, दोन जखमी

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १९ पैठण तालुक्यातील बिडकीन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील छत्रपती संभाजीनगर रोडवरील फारोळा येथील कंपनीमध्ये मशीन अंगावर पडून यामध्ये एक कामगाराचा दुर्दैव मृत्यू तर दोन जण गंभीर जखमी झाले असून जखमींना छत्रपती संभाजीनगर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू सविस्तर माहिती अशी की बिडकीन पोलीस ठाण्याच्या हद्दीमधील छत्रपती संभाजीनगर रोडवरील फारोळा गावाजवळ गट नंबर १०३, व १०४ मधील बी जी फासनिंग इंजिनीरिंग इंडस्ट्रीज प्रा. लि. फारोळा या कंपनी मध्ये दि. १८ रविवार रोजी सकाळी सात ते रात्री सात या बारा तास वेळेमधील ड्युटी शिफ्ट मध्ये मेंटेनेस विभाग मध्ये दुपारी १२:३० वाजता दीपक धरपळे,वय २४ रा फारोळा, दुरगेश बोडखे वय २५ रा. कांचनवाडी,व मोहम्मद शेख मनु शेख वय २४ रा. लाखेगाव ता. पैठण वरील तीन कामगार मेंटेनेस मध्ये कनवेर मध्ये माल खाली करत असताना कनवेर तुटून लोखंडी बॉक्स अंगावर पडल्याने यामध्ये दीपक धरपळे व दुर्गेश बोडखे या दोघांना डोक्याला व पायाला मार लागून जखमी झाले तसेच मोहम्मद शेख मनु शेख याच्या डोक्याला मोठी दुखापत झाल्याने या तिघांना जखमी अवस्थेत कंपनीच्या गाडीमध्ये घेऊन छत्रपती संभाजीनगर येथील खाजगी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले असता मोहम्मद शेख मनु शेख याला जास्त दुखापत असल्याने खाजगी हॉस्पिटल यांनी शासकीय रुग्णालय मध्ये उपचारासाठी पाठवले असता डॉक्टरने मोहम्मद शेख मनु शेख यास मृत घोषित केले, या घटनेची माहिती मोहम्मद शेख यांच्या घरच्यांना मिळतात गावातील नागरिक व नातेवाईक यांनी कंपनीमध्ये जाऊन चौकशी केली असता कंपनी व्यवस्थापक यांच्याकडून उडवा उडवीचे उत्तर देण्यात आल्याने जमलेल्या नातेवाईकाने संताप व्यक्त केला, मोहम्मद शेख यांचे शासकीय रुग्णालय मध्ये शवविच्छेदन करुन मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले यांची अंत्यविधी आज दि. १९ सोमवार रोजी सायंकाळी करण्यात आली तसेच वरील दोन्ही जखमी कामगारावर खाजगी हॉस्पिटल मध्ये उपचार सुरू आहे मागील तीन दिवसापासून बिडकीन व फारोळा परिसर मधील कंपनीमध्ये तीन कामगारांचा दुर्दैव मृत्यू झाले आहे बिडकीन चितेगाव एमआयडीसी मधील कंपनीमध्ये कामगारांसाठी कोणतीही सुरक्षिता नसल्याचे दिसून येत आहे यामुळे गरीब कुटुंबातील कामगारांचा नाहक मृत्यू होत आहे याकडे संबंधित अधिकारी यांनी कंपनीमध्ये कामगारांसाठी सुरक्षिततेसाठी उपयोजना पाहणे तेवढेच महत्वाचे आहे. वरील घटनेची नोंद बिडकीन पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अशोक माने, दिलीप साळवे पुढील तपास करीत आहे.

एमआयडीसीमध्ये तीन जणांचा मृत्यु

दि.१७ शनिवार रोजी फारोळा येथील धुत कॉम्पेक कंपनीत सुपरवायझर ने गळफास घेऊन केली आत्महत्या, तसेच कौडगाव गावाजवळ असलेल्या टेक्नो ग्रुप कंपनी मध्ये हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले, दि .१८ रोजी बी. जी. फासनिंग इंजिनीरिंग इंडस्ट्रीज कंपनी फारोळा मध्ये दोन कामगार कंपनीत जखमी तर एका जणाचा दुर्दैवी मृत्यू ,बिडकीन चितेगाव,फारोळा परिसर मध्ये कंपन्यांमध्ये सतत कोणत्या ना कोणत्या कारणाने कामगारांचा मृत्यू होत आहे कामगाराचे सुरक्षितेबाबत संबंधित अधिकारी यांनी कंपनीकडे लक्ष देणे गरजेचे असताना सुद्धा कंपन्यावर अधिकाऱ्यांचे वचक नसल्याचे दिसून येत आहे.

श्री.घृष्णेश्वराचे घेतले भाविकांनी उत्साहात दर्शन तिसऱ्या सोमवारी भाविकांची अलोट गर्दी

तभा वृत्तसेवा

खुलताबाद प्रतिनिधी संतोष करपे.वेरूळ येथील प्रसिद्ध बारावी ज्योतिर्लिंग असलेले श्रीघृषणेश्वराच्या दर्शनासाठी श्रावण महिन्यातील तिसऱ्या सोमवारी हर हर महादेवाच्या जयघोषात पहाटेपासून दर्शन घेतले. सोमवारी दिवसभर भाविकांची मांदियाळी मंदिर परिसरात होती. शहरातून, खेड्यापाड्यातून आणि परराज्यातून भाविक दर्शनासाठी आले होते. बॅरिकेट्स आणि येण्या-जाण्यासाठी वेगवेगळ्या मार्ग चालू केल्यामुळे भाविकांना सुलभतेने दर्शन घेता आले. मंदिर परिसरातील आवारात भाविकांसाठी दानशूर भाविकांनी फराळ पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून सीसीटीव्ही कॅमेरे, खाजगी सुरक्षा रक्षकांसह तगडा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

कंपनीमध्ये स्वयंपाकी परप्रांतीय इसमाचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १९ ऑगस्ट पैठण ते छत्रपती संभाजीनगर रोडवरील कौडगाव गावानजीक असलेल्या टेक्नो ग्रुप प्रायव्हेट. लिमिटेड येथे परप्रांतीय ४७ वर्षीय इसमाचा हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले हि घटना (ता.१८) रविवारी सकाळी १० वाजेच्या सुमारास घडली आहे. गोवर्धन भुईया, वय.४७. वर्षे, रा.दिपोलिया, जि.नादिया, राज्य. वेस्ट बंगाल असे कामगाराचे नाव आहे.

टेक्नो ग्रुप प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीचे काम सुरू असुन परप्रांतीय कामगारांची संख्या मोठ्या प्रमाणावर असुन या कामगारांनाच जेवण व नाष्टा करुन देण्यासाठी हा मयत गोवर्धन भुईया स्वयंपाकी म्हणून काम करत होता.या घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस फौजदार निकाळजे यांनी घटनास्थळी धाव घेत स्थानिक कामगारांच्या वतीने ग्रामीण रुग्णालय बिडकीन येथे दाखल केले असता वैद्यकीय अधिकारी डॉ आशिष वेदपाठक यांनी मृत घोषित करत शवविच्छेदन करत मृतदेह नातेवाईकांच्या व कामगारांच्या ताब्यात देत वेस्ट बंगाल येथे अंत्यसंस्कार करिता रुग्णवाहिकेतून हलविण्यात आला आहे.पुढिल तपास सहायक पोलीस फौजदार महादेव निकाळजे संदीप धनेधर पुढील तपास करित आहेत.

शेतकऱ्यांवरील अन्याय दूर करण्याचे माझे व्रत आहे : राजू शेट्टी

कन्नड शहरात राज्यातील पहिली अद्रक परिषद उत्साहात संपन्न

कन्नड दि.२० ऑगस्ट - शेतकऱ्यांच्या नसलेल्या एकजुटीचा फायदा व्यापारी घेत आहेत. व्यापारी हे शेतकऱ्यांच्या जीवावर जगणारी बंडगुळं आहेत. आपल्या हितासाठी शेतकऱ्यांनी एक नजर शिवारात, एक नजर बाजारात आणि एक नजर राजकारणात ठेवावी, असे आवाहन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी यांनी केले आहे.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने कृषिभूषण भाऊसाहेब थोरात यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र राज्यातील पहिल्या अद्रक परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते.

या वेळी बोलताना ते पुढे म्हणाले की, मी शेतकऱ्यांवरील अन्याय दूर करण्याचे व्रत घेतले आहे.शेतकऱ्यांनी आपल्या प्रत्येक पिकाच्या बाबतीत जागृत राहावे. कच्च्या मालाचा भाव मिळत नसल्यास त्याचे पक्क्या मालात रूपांतर करुन दोन पैसे अधिकचे मिळवावे. व्यापारी हे शेतकऱ्यांच्या जीवावर जगणारी बंडगुळं आहेत. तर शेतकऱ्यांच्या बाबतीत सरकारचे उदासीन धोरण आहे.शेतकऱ्यांनी बांधावर शेतीमाल खरेदीसाठी येणाऱ्यांची ऐपत तपासावी जेणे करून फसगत होणार नाही, असा सल्लाही त्यांनी दिला.

यावेळी अद्रक संशोधन केंद्र हे कन्नड तालुक्यातच व्हावे, आद्रकाचे भौगोलिक नामांकन करण्यात यावे. अद्रकला हमीभाव मिळावा. अद्रकला पीकविमा मिळावा. पिकपेऱ्यात अद्रकची नोंद घेतली जावी. कन्नड परीसरात शासनाने

अद्रकवर आधारित प्रक्रिया उद्योग उभारण्यासाठी मार्गदर्शन करुन चालना द्यावी. यासह इतर ठराव मांडण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना कृषिभूषण भाऊसाहेब थोरात यांनी ही अद्रक परिषद आयोजनामागचा उद्देश सविस्तरपणे सांगितला. आणि सहकार परिषद, ऊस परिषद व आता अद्रक परिषद यशस्वी होत असल्याचे आणि हे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे यश असल्याचे प्रतिपादन केले.

या प्रसंगी कृष्णा साबळे, माजी आमदार नामदेवराव पवार, इंजि. मिलिंद पाटील, मयुर बोर्डे, अनिल पवार, माजी तालुका कृषी अधिकारी उदय देवळाणकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले तर प्रकाश पोफळे यांनी कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप केला.

या प्रसंगी कृषिभूषण डॉ. सिताराम जाधव, पोपटराव दापके, संतोष जाधव, अजय जाधव, चंद्रकांत देशमुख, तालुका कृषी अधिकारी बाळराजे मुळीक, साहेबराव अकोलकर, कमलाकर मालोदे, आपचे जिल्हाध्यक्ष सुभाष पाटील निकम, देविदास काळे, कृष्णा साबळे, पुंडलिक डहाके, रंगनाथ लहाने, संदीप जगताप यांची मंचावर उपस्थिती होती.

या अद्रक परिषदेसाठी केवळ कन्नड तालुक्यातच नाही तर राज्यातील विविध भागातून अद्रक उत्पादक शेतकरी बांधव मोठया संख्येने सहभागी झाले होते.

स्नेहभोजनाने या अद्रक परिषदेची सांगता करण्यात आली.

सोयगाव:- भाऊ चि.ओम पाटील याचे रक्षाबंधनानिमित्त औक्षण करतांना लाडकी बहीण कु.स्वरा पाटील (छाया – साई बोखारे,सोयगाव)

सोयगाव शिवारात वन्यप्राण्यांचा धुमाकूळ;-मका उडीद मूग पिकांवर ताव

सोयगाव,दि.१९ ऑगस्ट : सोयगाव शिवारात सोनसवाडी सोयगाव आदी भागात वन्यप्राण्यांच्या धुडगूस वाढला असून तोडणी वर आलेल्या उडीद मुगाच्या शेंगा सह मका कपाशी पिकांवर ताव मारून वन्यप्राणी नुकसान करत आहे याप्रकाराने शेतकरी मेटाकुटीला आला आहे शनिवारी दि.१७ रात्रीच्या सुमारास अरुण सोनवणे(सोहणी) यांच्या सोयगाव शिवारात गट क्र-६१ मका पिकांची वन्यप्राण्यांच्या कळपनी नुकसान केले आहे या प्रकरणी सोयगाव वनविभागाला माहिती देण्यात आली आहे दरम्यान सोयगाव व सोनस वाडी शिवारात वन्यप्राण्यांच्या कळपानी मोठा धुडगूस घातला आहे सध्या च्या दिवसात मूग उडीद आदी पिके तोडनी वर आली आहे परंतु घरात येण्याच्या आधीच ही पिके फस्त झाली आहे. दरम्यान भास्कर चौधरी,गंगाधर सोहणी,सुरेश महाले,अनिल चौधरी,आदींचेही नुकसान झाले आहे याप्रकरणी सोयगाव वनविभागात तक्रार केली आहे .

समाजसेवक सुमित पंडित यांना शिक्षणमहर्षी माधवराव बोराडे समाजभूषण पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान

सोयगाव,दि.१९ ऑगस्ट : पुरस्कार कार्य करण्याची प्रेरणा देतात समाजसेवक यांच्या सामाजिक कार्याची हि कौतुकाची थाप आहे त्यांचा हा १०१ वाघ पुरस्कार आहे त्यांनी तो पुरस्कार माणुसकी समुहात अर्पण केला आहे.निळे प्रतीक बहुउद्देशीय सेवाभावी संस्था आणि शिक्षणमहर्षी माधवराव बोरडे प्रतिष्ठानच्या वतीने,महाकवी वामनदादा कर्डक आणि शिक्षणमहर्षी माधवराव बोरडे यांच्या जयंतीनिमित्त,या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन व महापुरुषांच्या प्रतीमेस पुष्पहार अर्पण करून करून करण्यात आली.या कार्यक्रमाला विजयकुमार गवई न्यायाधीश,प्रा.यशवंत खडसे,यशवंत खडसे,जेष्ठ साहित्यिक,गौतम पातारे पोलीस निरीक्षक,बालाजी सोनटक्के सहाय्यक पोलिस आयुक्त,रविंद्र जोगदंड, रंजना भोसले,अंबादास लंगडे आदि मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल व ब्लु माउंटन प्री स्कुल मध्ये रक्षाबंधन सण उस्ताहात साजरा

बिडकीन दि १९ ऑगस्ट : पैठण तालुक्यातील बिडकीन येथील ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल व ब्लु माउंटन प्री स्कुल मध्ये दर वर्षी प्रमाने याही वर्षी बहिण – भावाचा अतुट नात्याचा सण रक्षाबंधन साजरा करण्यात आला. यावेळी शाळेचे संस्थापक सतिश तोतला,शाळेच्या मुख्यध्यापिका सविता तोतला यांची प्रमुख उपस्थिती होती. शाळेचे संस्थापक सतिश तोतला यांनी विद्यार्थ्यांना आपले मनोगत व्यक्त करतांना सांगितले की रक्षाबंधन म्हणजे बहीण – भावाच्या प्रेमाचे अतुट बंधन. हा सण अतुट उत्कट प्रेमाची आठवण करुण देणारा दिवस मानला जातो. या दिवशी बहिण भावाच्या हातावर धागा बांधते हा फक्त धागा नसुन ते बहिण भावाच्या नात्याचे बंधन असते.त्यानंतर विद्यार्थीनींनी विद्यार्थ्यांना राखी बांधली तसेच मुलांनी त्यांना भेटवस्तु देऊन रक्षण करण्याचे वचन दिले. सर्व विद्यार्थांना चॉकलेट वाटप करण्यात आले.या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शाळेच्या शिक्षिका ज्योती राठोड व कार्यक्रमाची सांगता प्रतिक्षा पोटे यांनी केली.हा कार्यक्रम यशस्वी पार पडण्यासाठी शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

ॲड. सचिन जाधव यांची निवड

वाळूज महानगर(प्रतिनिधी) : ॲड. सचिन जाधव यांची जिल्हा उपाध्यक्ष छत्रपती संभाजी नगर विधी विभाग या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती महाराष्ट्र राज्याचे राज्य समन्वयक योगेश नाईक यांच्या हस्ते करण्यात आली. त्यांच्या या निवडीबद्दल गंगापूर तालुका कार्याध्यक्ष भीमराव मोरे, ॲड. अनिल ढगे, कृष्णा साळवे, मुख्याध्यापक नागमवार, अमोल धुळे, सूर्यकांत पठारे, संतोष लाठे आदींनी अभिनंदन केले.

जन्मजात हृदयविकारांसाठी महाराष्ट्र सरकारने रुग्णालयाला सर्वोच्च संदर्भ संस्था म्हणून मान्यता दिली

पुणे- बाल आरोग्य सेवा वाढविण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलत, श्री सत्य साई संजीवनी चाइल्ड हार्ट केअर सेंटर, खारघरला महाराष्ट्र सरकारने जन्मजात हृदयरोग (सीएचडी) साठी सर्वोच्च संदर्भ संस्था म्हणून घोषित केले आहे. सीएचडी लवकर ओळखण्यासाठी आणि हस्तक्षेप करण्यासाठी हॉस्पिटलने पुणे जिल्ह्यातील मुलांची तपासणी करण्यासाठी आपले प्रयत्न वाढवल्यामुळे ही मान्यता मिळाली आहे.श्री सत्य साई संजीवनी यांचा बालरोग कार्डियोलॉजी आणि सार्वजनिक आरोग्य विभाग या उपक्रमात आघाडीवर आहे, त्यांनी गेल्या पाच वर्षांत रायगड जिल्ह्यात १००० हून अधिक सरकारी प्राथमिक आरोग्य सेवा कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित केले आणि स्क्रीनिंग शिबिरे आयोजित केली. या प्रयत्नामुळे २५,००० हून अधिक मुलांची सीएचडी साठी तपासणी करण्यात आली आहे.

बोधेगाव ते बैरागीवाडी रस्त्याच्या कामाकडे दोन दशकापासून शासनाचे दुर्लक्ष

बाबरा,१९ऑगस्ट : फुलंब्री तालुक्यातील बोधेगाव बु.येथिल बोधेगाव ते बैरागीवाडीकडे जाणाऱ्या या तीन किमी रस्त्याला मोठी रहादारी असून गेल्या दोन दशकापासून याकडे शासनाने पूर्णपणे दुर्लक्ष केले असल्याने वाहने चिखलात फसत असून शेतकऱ्यांना व विद्यार्थ्यांनाही चिखलातूनच वाट शोधावी लागत आहे.

बोधेगाव ते बैरागीवाडी रस्ता २००२ मध्ये प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतून झाला होता तेव्हा पासून कधीच शासनाने व स्थानिक पुढाऱ्यांनी या रस्त्याकडे लक्ष दिले नाही.रस्त्याला ३ ते ४ वस्त्या लागून आहे. या रस्त्यावर जिल्हा परिषदेची वस्तीशाळा आहे. तसेच या वस्तीवरून गावात व इतर ठिकाणी जाणाऱ्या शाळकरी मुलाची संख्या शंभरच्या वर आहे. आतापर्यंत ग्रामीण मार्गाचे डांबरीकरण करणे आवश्यक होते.या रस्त्याने ये जा करणाऱ्याची मोठी संख्या आहे. या मार्गावर मार्गक्रम करणारे मोठ्या प्रमाणात शेतकरी आहे. पावसाळ्यात या मार्गावर गुडघ्यापर्यंत चिखल असतो. त्यामुळे या शेतकयांना,गावकऱ्यांना व शाळेतील मुलांना रस्त्यावरून ये-जा करण्यास मोठी कसरत करावी लागते. ग्रामपंचायत बोधेगाव येथील मासिक सभेमध्येही बऱ्याच वेळी या विषयी चर्चा केली असता. अजून पर्यंत काहीच झाले नाही.हा रस्ता मंजूर करण्यात यावा. त्यामुळे ये-जा करणाऱ्या शेतकरी, गावकरी यांची होणारी गैरसोय टळून त्यांना मोठा दिलासा मिळेल अशी मागणी गावकरी करीत आहे.

आ. सतीश चव्हाण यांच्या हस्ते लुंबिनी बुध्द विहार सभा मंडप बांधकामाचे भूमीपूजन

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.१९ : गंगापूर शहरातील लुंबिनी बुध्द विहाराच्या दुसर्या मजल्यावर सभा मंडप बांधकामासाठी आमदार सतीश चव्हाण यांनी ४०लक्ष रूपयांचा निधी उपलब्ध करून दिला असून सदरील सभा मंडप बांधकामाचे भूमीपूजन सोमवारी (दि.१९) आमदार सतीश चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.

फेब्रुवारी महिन्यात गंगापूर शहरातील लुंबिनी बुध्द विहाराच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी माजी नगराध्यक्ष संजय जाधव, बापू खाजेकर आदींनी आमदार सतीश चव्हाण यांच्याकडे केली होती. आमदार सतीश चव्हाण यांनी त्यांच्या मागणीची तात्काळ दखल घेऊन शासनस्तरावर पाठपूरावा करून राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात अधिसुचित विशिष्ट नागरी सेवा व

सुविधा पुरविणे या योजनेअंतर्गत सदरील बुध्द विहाराच्या सभा मंडप बांधकामासाठी ४० लक्ष रूपयांचा निधी मंजूर करून घेतला होता. आज या कामाचा भूमीपूजन समारंभ आमदार सतीश चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थित आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी बोलताना आमदार सतीश चव्हाण म्हणाले की, भगवान गौतम बुध्दांनी जगाला शांततेचा संदेश दिला. त्यांचे स्मरण करण्यासाठी व त्यांचे विचार आत्मसात करण्यासाठी बुध्द विहारात येणार्या उपासकांना या सभा मंडपाचा निश्चितच उपयोग होईल. बुध्द विहाराच्या माध्यमातून विचारांची देवाण-घेवाण होते. येत्या दीड ते दोन महिन्यात या सभा मंडपाचे कामकाज पूर्णत्वास येईल व याच्या लोकार्पण सोहळ्यास आपण सर्व पुन्हा उपस्थित राहू. असे यावेळी ते म्हणाले.

याप्रसंगी पुज्य भंदत भंन्ते रत्नबोधी, पुज्य भनोजी धमरत्न, पुज्य भंदन विस्सभो, माजी नगराध्यक्ष संजय जाधव, मच्छिंद्र देवकर, रावसाहेब तोगे, खालेद नाहदी, मोहसीन चाऊस, प्रविण नितनवरे, अशोक गायकवाड, मारोती साळवे, प्रशांत ननवारे, सुरेश नेमाडे, रमेश निचित, सोपान देशमुख, राहुल कोळसे, संदीप खाजेकर, बापुसाहेब खाजेकर, भारत खाजेकर, सिध्दार्थ खाजेकर, सागर दळवी, रमेश खाजेकर, शांतावण खाजेकर, रंगनाथ खाजेकर, भागीनाथ किर्तीशाही आदींची उपस्थिती होती.

संपूर्ण महाराष्ट्रात प्रवासी वाहन कर्जाची मागणी मजबूत राहण्याची शक्यता -जी. एम. जिलानी

छत्रपती संभाजीनगर - जी. एम. जिलानी, सह-व्यवस्थापकीय संचालक, श्रीराम फायनान्स म्हणतात एक उत्साही अर्थव्यवस्था सामान्यत: प्रवासी वाहन (पीव्ही) कर्जासह विविध कर्ज विभागांमध्ये मागणी उत्तेजित करते. आमच्या अनुभवानुसार महाराष्ट्रातील टियर दोन, तीन आणि चार श्रेणीतील शहरांमध्ये पीव्ही कर्जाला असलेली मागणी स्पष्टपणे दिसत आहे.

वित्तीय वर्ष २४ मध्ये, आम्ही वितरित केलेल्या सर्व पीव्ही कर्जांमध्ये महाराष्ट्राचा वाटा ८.७२ टक्के इतका होता. आमच्या कर्जाचा सरासरी आकार ४,००,००० रुपयांदरम्यान आहे. वित्तीय वर्ष २४ मध्ये, आम्ही महाराष्ट्रातील १८,४७८ कर्जदारांना अंदाजे ६४५ कोटी रुपयांचे कर्ज वितरित केलेले आहे. तसेच, गेल्या काही महिन्यांपासून कर्जाच्या मागणीसाठी आमच्याकडे सातत्याने विचारणा होत आहे. यातून महाराष्ट्राच्या बाजारपेठेत मोठी क्षमता दडलेली असून तिचा वापरच झालेला नाही, हे आम्हाला कळेल आहे. ग्राहक वर्गाला प्रवासी व्यावसायिक वाहने आणि खासगी कार पुरवण्यावर आमचे धोरणात्मक लक्ष केंद्रीत झालेले आहे. या विभागात मजबूत मागणी आणि व्यवसाय पूर्वपदावर येत असल्याचे स्पष्टपणे दिसत आहे. व्यावसायिक वाहनांची सर्वात मोठी वित्तपुरवठादार असलेली श्रीराम ट्रान्सपोर्ट फायनान्स कंपनी आणि दुचाकीसाठी सर्वाधिक वित्तपुरवठा करणारी त्याचबरोबर सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना (एमएसएमई) वित्तपुरवठा करणारी अग्रणी कंपनी असलेल्या श्रीराम सिटी युनियन फायनान्स यांच्यातील विलीनीकरणाचे फायदे हा सकारात्मक बदल अधोरेखित करतोय. त्याचबरोबर आव्हानात्मक आर्थिक परिस्थितीशी जुळवून घेण्याची आमची क्षमताही तयार झाली असून त्यामुळे दीर्घकालीन यशाबद्दल आम्हाला आत्मविश्वास आहे.

चोरलेल्या दुचाकीचे सुटे भाग करून विकणारे गजाआड

अडीच लाखांचा मुद्देमाल हस्तगत

अहमदनगर : शहर परिसरातून मोटरसायकली चोरून त्यांचे सुटे भाग करून विक्री करणाऱ्या तिघांना कोतवाली पोलिसांनी गजाआड केले आहे.

मोटरसायकल चोरीच्या एका गुन्ह्याचा तपास करीत असताना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे शोध घेतला असताना भिंगार येथील रोहित आप्पासाहेब शिरोले, यश प्रकाश ओहोळ, करण कैलास पवार व इम्रान सलिम शेख या चौघांच्या घराची व गॅरेजची झडती घेतली असता त्यांचेकडे ५ मोटार सायकली व २ मोटार सायकलींचे सुटे भाग असा २ लाख ५० हजारांचा मुद्देमाल आढळून आला. सदरची कारवाई ही जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रताप दराडे गुन्हे शोध पथकाचे पो.स.ई. महेश शिंदे, प्रवीण पाटील, पो.हे.कॉ. योगेश भिंगारदिवे, विशाल दळवी, सूर्यकांत डाके, विशाल दळवी, गणेश धोत्रे, विक्रम वाघमारे, सलीम शेख, राहुल शिंदे, सतीश भांड, पो कॉ. अभय कदम, अमोल गाढे, अनुप झाडबुके, राहुल गुंडू यांच्या पथकाने केली.

आर्थिक नीतीतील बदलामुळे वैश्विक बाजार प्रभावित : श्रीजीत बालासुब्रमण्यम

पुणे : अमेरिकी अर्थव्यवस्थेत कमजोरीचे संकेत मिळाले आहेत. त्यामुळे फेडद्वारा व्याजदरांमध्ये कमी होण्याची शक्यता असल्याने बाजाराची आशा वाढली आहे. मात्र ईसीबी आणि बीओईने यापूर्वीच कमी केलेली आहे. यादरम्यान बीओजेने दरांमध्ये वाढ केल्याने जेपीवाईच्या किंमतीत वाढ झाली. तसेच व्यापारसंबंधी चिंता वाढल्याने वैश्विक बाजारात अस्थिरता आली आहे. चीनमध्ये पॉलिसीसंदर्भात बयानबाजीला वेग आला आहे. तरीही मंदी कायम आहे. दुसरीकडे भारताने केंद्रीय बजेटमध्ये राजकोषीय विवेकाची अत्यंत सावधपूर्वक निवड केली आहे. त्यामुळे हे पाऊल नजीकच्या भविष्यात खाद्य मुद्रास्फीतीच्या चिंता कमी करू शकते, असे मत प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ व बंधन एएमसीच्या फिक्स्ड इनकम टीमचे उपाध्यक्ष श्रीजीत बालासुब्रमण्यम यांनी व्यक्त केले. भारत व ग्लोबल स्तरावर आर्थिक नितीत होत असलेल्या बदलावाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी वरील मत मांडले.

बालासुब्रमण्यम यांचे म्हणणे आहे की, गेल्या मे महिन्यापासून अमेरिकी डेटा कमजोर होणे सुरू झाले. अलीकडेच मुद्रास्फीती, रिटेल विक्री, ग्राहकांची भावना आणि पीएमआयवरील आकड्यांमध्ये कमजोरी दिसून आली आहे. उंच झेप घेणारे पेरोल एडिशंसही जुलैमध्ये कमजोर होते. त्यामुळे वेतनवृद्धीत कमी तर, बेरोजगारी दरांमध्ये वाढ झाली. उल्लेखनीय म्हणजे, यूनिट लेबर कॉस्ट वृद्धी देखील निराश करणारी आहे. त्याचवेळी श्रम पुरवठयात किंचित सुधारणा होऊनही श्रम बाजारात मंदी आली आहे.

बालासुब्रमण्यम यांच्या मते, आयएसएममध्ये कमजोर रोजगार कम्पोनेंट, क्रेडिट कार्ड आणि ऑटो लोनच्या चूकमध्ये वृद्धी, फेडच्या बेज बुकमध्ये ग्राहकांवर टिप्पणी आणि कंपन्यांच्या फिक्या तिमाही परिणामांमुळे विकासाच्या चिंता आणखीनच वाढविल्या आहेत. त्यामुळेच फेडने अलीकडेच महटल्याप्रमाणे, त्यांची पहिली दर कटौती येत्या सप्टेंबरमध्ये होऊ शकते. याचे कारण की, त्यांनी डेटा मधील ग्रोथला स्वीकार करीत मुद्रास्फीती व रोजगाराच्या लक्ष्यांवर अधिक लक्ष केंद्रित केले आहे. तथापि, गेल्या काळातील कमजोर आकड्याने यावर्षी दरांमध्ये कटौतीचे प्रमाण व गतीच्या बाजार मूल्य निर्धारणला अधिक सशक्तपणे पुढे चाल मिळाली आहे. त्यामुळे काही प्रमाणात बाजारात अस्थिरता दिसून येत आहे. ईसीबीने या चक्रात पहिल्यांदा जूनमध्ये आपल्या नीति दरांमध्ये २५ बीपीएसची कटौती केली आहे. कारण की, अंडरलाइंग मुद्रास्फीतीमध्ये आणखी घट होण्याची शक्यता आहे. याउलट घरगुती मूल्य दबाव अजूनही उच्च स्तरांवर आहे. श्रम बाजार दिवसेंदिवस नरम होत असून, सर्विसेसच्या किमतीत वाढ होत आहे. कारण ईसीबी कटौतीची कोणतीही गती किंवा परिणामासाठी सुरवातीपासूनच कटिबद्ध नाही. कमजोर झालेली क्रयशक्तीच्या भरपाई कारणामुळे मजुरी अजूनही उच्च दराने वाढत चालली आहे. उत्पादकता कमजोर असल्यामुळे यूनिट लेबर खर्चातील वाढ अधिक आहे. या अपेक्षेमुळेच ईसीबीने जुलैमध्ये दर स्थिर ठेवले आहे. ऑगस्टच्या सुरवातीला बीओईने दरांमध्ये २५ बीपीएसची कटौती केली, हे लक्षात घेण्यासारखे आहे. कारण की मे आणि जूनमध्ये मुद्रास्फीतीचे लक्ष्य २ % होते. खासगी क्षेत्रात मजुरीतील वाढ आणि सेवांच्या मुद्रास्फीतीत काहीशी नरमी आली. मात्र त्या तुलनेत अजूनही उच्च स्तरावर असल्याचे सुब्रमण्यन यांनी सांगितले.

गंगापूरात आ.प्रशांत बंब यांच्या हस्ते भारतमाता पूजन

गंगापूर दि.१९ : स्वातंत्र्य दिनानिमित्त गंगापूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात आमदार प्रशांत बंब यांच्या हस्ते भारत माता पूजन करण्यात आले. यावेळी भारत माता की जय वंदे मातरम अशा घोषणा देण्यात आल्या. यावेळी किशोर कुलकर्णी मनिष वर्मा अँड. अविनाश कुलकर्णी योगेश जाधव दत्तात्रय साबणे वाल्मिक मनोरकर रविराज दारूंटे सतिश नरोडे तुकाराम कोल्हे प्रदीप बरडे महेश गुडदे मनसेचे अशोक कराळे भाजप युवा मोर्चाचे वैभव धनायत महेश बिडकर किरण सरोदे यांच्यासह आदी उपस्थित होते.

अजिंठा लेणीला भारत गणेशपुरे यांची मित्रा सोबत भेट

फर्दापूर दि१९ : 'चला हवा येऊ द्या' हा नितीन केणी निर्मित बहुचर्चित झी मराठी दूरचित्रवाणीवरील विनोदी कार्यक्रमात आपला वेगळा ठसा उमटवणारे विनोदी हास्यसम्राट भारत गणेशपुरे यांनी आपल्या वर्गमित्रांसोबत शनिवार दि.१७ जगप्रसिद्ध अजिंठा लेणी पाहण्याचा आनंद लुटला. भारत गणेशपुरे यांनी अनेक मराठी चित्रपट तसेच 'फु बाई फू' व 'चला हवा येऊ द्या' सारख्या विनोदी कार्यक्रमात हास्य सम्राटाची भूमिका साकारलेली आहे.वऱ्हाडी भाषेतील त्यांच्या अनेक भूमिका गाजलेल्या आहेत. गेल्या ३५ वर्षापासून भारत गणेशपुरे व त्यांचे वर्गमित्र वर्षातून एकदा एकत्र येतात.यावर्षी त्यांनी अजिंठा लेणीची सफर केली.लेणी बघून सर्व मित्रपरिवार हे भारावून गेले.लेणी क्र.१ ते २६ पर्यंतच्या लेण्यांची त्यांनी गाईडच्या माध्यमातून माहिती जाणून घेतली.लेणी बघितल्यानंतर त्यांचे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळातर्फे फर्दापूर पर्यटक निवासात व्यवस्थापक योगेश बळे व कर्मचाऱ्यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत गेले.पर्यटक निवास उपहारगृहात त्यांनी रात्रीचे स्नेहभोजन करून मुक्काम केला.गणेशपुरे यांच्या मित्र परिवारात काही मित्र डॉक्टर,शासकीय सेवेत उच्च पदस्थ तर काही प्रगतशील शेतकरी आहेत.मात्र आपला मित्राने सिनेसृष्टीत नावलौकिक केल्याचा आम्हाला सार्थ अभिमान असल्याचे मित्रपरिवाराने यावेळी सांगितले.यावेळी प्रा.रवींद्र भागवत,डॉ.अविनाश चिंचोले,कृषी अधिकारी विजय खोंदील,डॉ.श्याम घावडे,अतुल देशमुख, तेजराव जाधव,अनिल गाभने,नंदकिशोर आढाव आदी मित्र परिवाराचा समावेश होता.

सिट्रोएनची भारतातील पहिली एसयूव्ही लाँच

छत्रपती संभाजीनगर, १७ ऑगस्ट : सिट्रोएन इंडिया ने भारतातील पहिली मुख्य एसयूव्ही कूपे -बेसाल्ट लाँच केली आहे. हे एसयूव्ही चे मजबूत आकर्षण आणि कूपेच्या स्लीक एलेगन्स आणि अफाट परिष्करणासह एकत्र करते. सिट्रोएन बेसाल्ट ठळक, कमांडिंग स्टॅन्स, वर्गातील सर्वात मोठी जागा आणि एरोडायनॅमिक सिल्हूटसह अतुलनीय ड्रायव्हिंग अनुभव देते. आधुनिक वैशिष्ट्ये आणि ड्रायव्हिंगच्या आनंदाला अत्यंत महत्त्व दिलेल्या, १०० वर्षांपासून सिट्रोएन चा वारसा असलेला नावीन्यपूर्ण आणि सोईच्या वचनबद्धतेसह बेसाल्ट ऑटोमोटिव्ह उत्कृष्टतेच्या नवीन युगात प्रवेश करते. बेसाल्ट ७.९९ लाख ते रु. १३.६२ लाखांपर्यंतच्या प्रास्ताविक किमतींवर ऑफर सह, २ वर्षे किंवा ४०,००० किलोमीटरची मानक वॉरंटी आणि २४/७ रस्त्याच्या कडेला सहाय्य प्रदान केले जात आहे.

दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज बिडकीन येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात

बिडकीन दि.१९ ऑगस्ट पैठण तालुक्यातील बिडकीन येथील दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूल येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी विद्यार्थ्यांनी भाषण,देशभक्ती गिते,नृत्य सादर करून कार्यक्रमाची शोभा वाढवली. कार्यक्रमात बिडकीन सरपंच अशोक धर्मे, पोलीस उपनिरीक्षक महेश.घुगे नन्हेखा पठाण,काकासाहेब टेके, सागर फरताळे, प्रविण चव्हाण आदी नगरसेवक व संस्थाचालक ओमप्रकाश जैस्वाल उपस्थित होते.कार्यक्रम पार पाडण्यासाठी कोकणे , नजन ,साबळे ,चव्हाण, संगिता ओसीन राणी ,शिवाणी ,आरती सिमा सर्व शिक्षकांनी खूप मेहनत घेतली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्राचार्य अभिजित इंगळे सर यांनी केले.

मलकूजी माने यांचे निधन

गंगापूर दि.१९: माजी आमदार अण्णासाहेब माने पाटील यांचे वडील स्व.मलकुजी त्रिंबक माने पाटील (८०) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर जामगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले एक मुलगी सुना नातवंडे असा परिवार आहे. ते माजी जिल्हा परिषद सदस्य संतोष माने यांचे आजोबा होत.

जा.क्र.२०२४/विधी/ज.मू. आदेश/प्र.क्र.२२६०/कावि-२२७२
उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, सिल्लोड दिनांक :-२९.०७.२०२४.

जाहिर प्रगटन

अर्जदार :- काजल गुमानसिंग चव्हाण, वय-२२ वर्ष व्यवसाय- घरकाम, रा. उसारणी पो.जसोन्दी ता.जि.बु-हानपूर ह. मु. सोयगाव ता. सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार : ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय जंगलातांडा, ता. सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर,

विषय :- जन्म- मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज

उपरोक्त विषयी काजल गुमानसिंग चव्हाण, रा.उसारणी पो.जसोन्दी ता.जि.बु-हानपूर यांनी त्यांचा दिनांक ०१.०१.२००३ रोजी मौजे जंगलातांडा येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म-मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा-२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, काजल गुमानसिंग चव्हाण, यांचा दिनांक ०१.०१.२००३ रोजी मौजे जंगलातांडा येथे जन्म झाला असले त्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर /आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर /आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर / आक्षेप/हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी सिल्लोड

CMYK

धाराशिव
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

श्रावणी पौर्णिमेनिमित्त तुळजापूरात भाविकांची गर्दी

तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.१९ ऑगस्ट -

श्रावण महिन्यातील सोमवारी श्रावण पोर्णिमा आल्याने तुळजापूरनगरीत आज श्री तुळजाभवानी दर्शनार्थ राज्यासह परराज्यातील भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

श्रावण पोर्णिमा पार्श्वभूमीवर श्री तुळजाभवानी मातेच्या सिंहासनावर फुलांचा आकर्षक असा आरास केला होता. तसेच शहरात रक्षाबंधन पारंपारिक पध्दतीने साजरा करण्यात आला.

तुळजापूर शहरसह परीसरात रक्षाबंधन निमित्ताने आज बहीणीने भावाला राखी बांधुन रक्षाबंधन पारंपारिक पध्दतीने साजरा केला.

संक्षिप्त वृत्त...

काँग्रेस कमिटीच्या धाराशिव तालुकाध्यक्षपदी विनोद वीर

धाराशिव, दि.१९ ऑगस्ट -

काँग्रेस कमिटीच्या धाराशिव तालुकाध्यक्षपदी काँग्रेसचे निष्ठावंत विनोद जीवनराव वीर यांची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या निर्देशानुसार पक्षाचे प्रशासन व संघटन उपाध्यक्ष नाना गावंडे यांनी ही निवड घोषित केली आहे. या निवडीचे पत्र नाना पटोले यांच्या हस्ते देण्यात आले. सदरील निवडीचे काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष ॲड. धीरज कदम-पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी स्वागत केले आहे.

झाडांना राखी बांधून 'प्राईड'ने दिला पर्यावरणाचा संदेश

भूम, दि.१९ ऑगस्ट -

येथील प्राईड इंग्लिश स्कूलच्या चिमुकल्यानी झाडांना राखी बांधून पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला. दि.१९ रोजी राखी पौर्णिमेनिमित्त प्राईड इंग्लिश स्कूलच्या बाल विद्यार्थ्यांनी रक्षाबंधन व पर्यावरण रक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी वृक्षांना राखी बांधली. बेसुमार वृक्ष तोड होत असल्याने होणारी पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी वृक्षांचे महत्त्व पटवून देण्यासाठी या शाळेतील बाल विद्यार्थ्यांनी वृक्षांना राखी बांधून वृक्ष संवर्धन करण्याची शपथ यावेळी घेतली. रक्षाबंधनाचा हा आगळावेगळा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षिका मेघा सुपेकर, दीपिका टकले, सेजल सुरवसे, भाग्यश्री डांगे यांच्यासह आशा मेहत्रे व अरुणा बोत्रे यांनी परिश्रम घेतले.

माकणी येथील सुषमा कांबळेची पोलीस पदी निवड

लोहारा, दि.१९ ऑगस्ट -

लोहारा तालुक्यातील माकणी येथील क्सुषमा नेताजी कांबळे हीची पिपरी-चिंचवड पुणे येथे पोलीस पदावर निवड झाली आहे. सुषमा कांबळे ही गरीब कुटुंबातील असून तिचे वडीलाचे कांही दिवसांपूर्वी निधन झाले आहे. तिची आईने तिला मोल मजुरी करून शिक्षण शिकविले. परिस्थिती गरीब असताना देखील शिक्षण शिकवून मोठं केले. तिच्या या निवडीबद्धल ग्रामस्थ व समाजाच्या वतीने फेटा, शाल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी प्रा. किशोर कांबळे, किशोर गायकवाड, रोहित गायकवाड, आकाश कांबळे, अविनाश कांबळे, धनंजय जाधव, राज्यपाल वाघमारे, यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

गायरान पट्टे नावावर करण्याची मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे मागणी

वाशी, दि.१९ ऑगस्ट -

वाशी तालुक्यातील ४० गायरान धारकांनी ३ सर्वे नंबरमध्ये शासकीय गायरान जमिनी वहीती खाली आणून १९६१ व १९६७ आज तागायत पिके काढून उदरनिर्वाह भागवत आहेत. शासनाच्या निर्णयाप्रमाणे त्यांनी अनेक वेळा पुरावे दाखल करून शासनाने दखल घेतली नाही. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आश्वासन केल्याप्रमाणे जाणीव संघटनेचे जिल्हाध्यक्ष रामभाऊ लगाडे व गायरान धारक शेतकरी व यांच्या शिष्टमंडळांनी वाशीचे तहसीलदार राजेश लांडगे यांना १९६१ ते २००४ पर्यंतचे पुरावे सादर केले. यावेळी तहसीलदार यांनी पुराव्याची पाहणी करून आम्ही प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांना पाठवू असे आश्वासन दिले. यावेळी बाबासाहेब शिनगारे, दशरथ शिनगारे, सर्जेराव शिनगारे, कैलास शिनगारे, वंदन जाधव, रावण शिनगारे, नवनाथ शिंदे, दत्ता शिंदे, बालू शिंदे, राजेंद्र शिंदे, गायरान धारक शेतकरी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

न्यू चैतन्य तरुण गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी उमेश अवचार यांची निवड

नळदुर्ग, दि.१९ ऑगस्ट -

नळदुर्ग येथील न्यु चैतन्य तरुण गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी उमेश अवचार यांची निवड करण्यात आली असुन त्यांच्या निवडीचे सर्व स्तरातुन स्वागत होत आहे. मंडळाची नविन कार्यकारीणी निवडण्यात आली ती पुढीलप्रमाणे : उपाध्यक्ष शशिकांत खैरमाडे, संकेत कसेकर, कोषाध्यक्ष सागर थोंटे, सोहम बेले, सचिव अभी स्वामी, सहसचिव आकाश मदने, लेझिम प्रमुख अजय मोरे, मिरवणुक प्रमुख अमित शेंडगे, प्रविण चव्हाण, प्रमोद कुलकर्णी, कैलास घाटे, अंबादास पवार, आकाश कुलकर्णी, गणेश शेंडगे यांची निवड करण्यता आली.

मतदार संघात ना. तानाजीराव सावंत यांच्या कामांचा धडाका

पालकमंत्री तानाजीराव सावंत विरुद्ध माजी आमदार राहुल मोटे यांच्यात खऱ्या लढतीची शक्यता...

तभा वृत्तसेवा/ आप्पासाहेब शिंदे
परंडा, दि.१९ ऑगस्ट -

विधानसभा निवडणुकीच्या तयारीला सारेजण लागले आहेत. सर्वच राजकीय पक्षांनी उमेदवारांची चाचपणी सुरू केली आहे. विधानसभा निवडणुकीसाठी अनेकांनी गुडघ्याला बाशिंग बांधले असून, नोव्हेंबरमध्ये नवी विधानसभा अस्तित्वात येणे क्रम प्राप्त आहे. यामुळे ऑक्टोबर महिन्यात विधानसभेची निवडणूक होण्याची दाट शक्यता आहे. यामुळे भूम-परंडा-वाशी मतदारसंघाचे आमदार तथा आरोग्य व सार्वजनिक कुटुंब कल्याण मंत्री पालकमंत्री प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांनी मतदारसंघातील शहरासह ग्रामीण भागातील विकासावर भर दिला असून शासनाकडून त्यांनी मोठ्या प्रमाणात निधी मिळवून दिला होता. त्या विकास कामाचे लोक अर्पण व भूमिपूजन करण्याचा सपाटा त्यांनी परंडा मतदारसंघात कंडारी, रोहकल, साखत, कुंभेफळ, पाचपिंपळा, अंदोरी जाकीपिंपरी, टाकळी, राजुरी, आंदोरा, खासापुरी नंबर २, खासापुरी नंबर १ व चव्हाणवाडी तसेच बावची दहिटना बोडखा, वाघेगव्हाण, लोहारा, कपिलापुरी, आवारपिंपरी, सोनगिरी, खासगाव या गावांना भेटी देऊन केला असून मंत्री प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांनी ठोस निर्णय, प्रत्यक्ष कृती, कायमस्वरूपी उपाय हेच धोरण अवलंबिले असून त्यांनी आरोग्य खात्याच्या माध्यमातून पाच पिंपळा तालुका परांडा येथे विशेष बाब म्हणजे नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर केले. चिंचपूर (बु) येथे नवीन आरोग्य उपकेंद्र मंजूर करून घेतले तर ढग पिंपरी घारगाव तसेच भूम तालुक्यातील मौजे घाटनांदुर व नागेवाडी येथेही आरोग्य उपकेंद्र मंजूर केले आहे. परंडा-भूम-वाशीचे आमदार म्हणून तानाजीराव सावंत यांनी मतदार संघातील विविध समस्या मार्गी लावण्यावर जोर दिला आहे. परंडा शहरासह ग्रामीण भागात ज्या मूलभूत समस्या आहेत त्या तात्काळ सोडविण्यासाठी ते सध्या दिवस-रात्र एक करीत असल्याचे दिसत आहे. येत्या विधानसभेच्या निवडणुकीत त्यांचे कामच बोलणार आहे याची चर्चा मतदारसंघात होत असून कामाचा धडाका सुरूच आहे. त्यामुळे प्रत्यक्षात त्यांनी मतदारसंघात प्रचाराला एक प्रकारे सुरुवात ही केली असून सर्वत्र त्यांच्या विकास कामाचे डिजिटल स्क्रीनच्या माध्यमातून बॅनरही झळकले आहेत. त्यामुळे आगामी विधानसभेच्या आखाडयात परंडा मतदार संघात महायुती व महाविकास आघाडी यांच्यातच खरा सामना होणार आहे. तर मनसे, रासप, वंचित बहुज आघाडी, प्रहार जनशक्ती पक्षांनी आपला उमेदवार उभे करण्यासाठी चाचणी सुरू केली आहे.

> माजी आमदार राहुल मोटे यांनीही परंडा येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या शिवस्वराज्य यात्रेच्या निमित्ताने मतदारसंघात जाहीर सभेचे आयोजन करून निवडणुकीचे वातावरण तयार करून आपण आमदारकीच्या काळात परंडा मतदारसंघात केलेल्या विकास कामाचा लेखाजोखा जनतेसमोर मांडून एक प्रकारे आगामी विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराला सुरुवात केली आहे.
>
> राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष तथा खासदार सुप्रियाताई सुळे व खासदार अमोल कोल्हे यांनी परंडा येथील सभेत यावेळी राहुल मोटे यांना उमेदवारी मिळवून देण्याचे संकेत ही दिले आहेत. त्यामुळे राहुल मोटे यांनीही जोरात प्रचाराला सुरुवात केली असून मतदारसंघातील तिन्ही तालुक्यातील गावांना भेटी देऊन जनतेशी संवाद सादला आहे. त्यामुळे अनेकजण निवडणुकीत तुल्यबळ असले तरी खरी लढत मंत्री तानाजी सावंत व माजी आमदार मोटे यांच्यातच होण्याची शक्यता आहे.

बांधकाम कामगारांची होणार तपासणी व उपचार

फिरत्या वैद्यकीय कक्षाचे पालकमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन...

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१९ ऑगस्ट -

धाराशिव जिल्हयातील महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदनीकृत बांधकाम कामगारांना तपासणी ते उपचार आरोग्य योजनेचा शुभारंभ पालकमंत्री प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांच्या हस्ते १५ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात फिरत्या वैद्यकीय कक्ष वाहनाची फित कापून व हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ करण्यात आला.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, पोलीस अधीक्षक संजय जाधव, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास व सरकारी कामगार अधिकारी सुधाकर कोनाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. सरकारी कामगार अधिकारी कार्यालयातंर्गत येणाऱ्या महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ स्थापित करण्यात आले आहे. या मंडळाने नियुक्त केलेल्या हिंद लॅब या कंपनीमार्फत तपासणी ते उपचार आरोग्य योजनेतंर्गत अत्याधुनिक जीवन समर्थन प्रणालीयुक्त फिरते वैद्यकीय कक्ष (Mobile Medical Unit) कार्यरत करण्यात आले आहे. या योजने अंतर्गत बांधकाम कामगार व त्यांच्या कुटूंबातील पती अथवा पत्नी व १० वर्षावरील प्रथम दोन अपत्ये लाभार्थी म्हणून राहतील. बांधकाम कामगार हा नोंदणी कालावधीमध्ये वर्षातून एकदा योजनेच्या लाभासाठी पात्र राहील. नोंदीत बांधकाम कामगारांची प्राथमिक आरोग्य तपासणी, चाचणी केल्यानंतर कामगारास जीवितास धोका निर्माण करणारा आजार असेल तर त्या आजारावर आवश्यक उपचार तपासणी ते उपचार या योजनेतंर्गत करण्यात येणार आहेत.

या योजनेचा लाभ जिल्हयातील जास्तीत जास्त नोंदीत बांधकाम कामगारांनी घ्यावा, असे आवाहन पालकमंत्री प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांनी यावेळी केले.

येडेश्वरी देवी श्रावणी नारळी पौर्णिमा यात्रा उत्साहात संपन्न

तभा वृत्तसेवा
येरमाळा, दि.१९ ऑगस्ट -

येथील प्रसिद्ध देवस्थान श्री येडेश्वरी देवीची रविवारी (ता.१९) नारळी पौर्णिमा यात्रा मोठया उत्साहात पार पडली.देवीच्या पालखीची दहीहंडीसह निघालेल्या गावप्र दक्षिणेत भाविकांनी पालखीच्या दर्शनासाठी, मिरवणुकीत सहभागी होण्यासाठी हजारोच्या संख्येने गर्दी केली होती. नारळी पौर्णिमा पारंपरिक दहीहंडी फोडण्याचा कार्यक्रम दु.४ वा. सचिदानंद बोधले यांच्या हस्ते पार पडला.

श्री येडेश्वरी देवीच्या वर्षातून भरणाऱ्या दोन यात्रेपैकी नारळी पोर्णिमा ही दुसरी मोठी यात्रा मनाली जाते. मंगळागौर विसर्जनाच्या नंतर आनंदधाम विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आयोजित हरिनाम सप्ताहाने होते. पौर्णिमेच्या आदल्या दिवशी या मंदिरात देवीची पालखी नगर प्रदक्षिणेसाठी दाखल होते. पोर्णिमे दिवशी गावातील तसेच पंचक्रोशीतील भाविक देवीच्या पालखीला पुरणपोळीचा नेवैद्य दाखवुन दर्शन घेतात. सकाळी ११ वा पालखी मंदिराच्या पाठीमागून गावप्रदक्षिणेला निघते गावाला वळसा घालुन बऱ्याच्या वावरातून विसावा मंदिराजवळ विसावा घेऊन मंदिराकडे दहीहंडीसह आराधी मंडळाच्या ढोलकी, जहांज, तुणतुणे, संभुळ तर भजनी मंडळाच्या टाळ, मृदंगाच्या गजरात वाजत गाजत डोंगरावरच्या मंदिराच्या परिसरात आली येथील पारंपरिक चिंचेच्या झाडावर दहीहंडी फोडण्याचा मानाप्रमाणे दु.४ वा सचिदानंद बोधले महाराज व देविचे मानकरी यांच्या हस्ते दहीहंडी फोडण्यात आली.

यावेळी नारळी पोर्णिमेनिमित्त दर्शन व दहीहंडी कार्यक्रम पाहण्यासाठी पंचक्रोशीसह, बाहेर गावातून भाविक हजारोच्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी देवीचे मानकरी पालखीचे मानकरी पुजारी उपस्थित होते.

दहीहंडी फोडण्या पूर्वी भजनी मंडळा, वारकरी मंडळ, आराधी मंडळांनी यात्रे करंचे विविध लोक कला सादर करुन मनोरंजन केले यात पाऊल, शिवणापाणी, खो-खो, फुगड्या, नकलांचे, पोवाडे, भारुडाचे सादरीकरण केले.

धाराशिव तालुक्यात संशयित पोलिओचा रुग्ण आढळला

तभा वृत्तसेवा
तेर, दि.१९ ऑगस्ट -

धाराशिव तालुक्यातील भिकार सारोळा येथे संशयित पोलिओ रुग्ण आढळला आहे. भिकार सारोळा येथील एक वर्षाच्या मुलास उपचारासाठी मुरुड येथे नेले होते. परंतु तपासणीत संशयित पोलिओची लक्षणे आढळून आली.

या एक वर्षाच्या बाळाचे शौचाचे नमुने मुंबई येथे तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत.

त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून परिसरातील पाच किलोमीटर परिसरातील भिकार सारोळा, मोहतरवाडी, पळसप या ठिकाणी जागजी प्राथमिक आरोग्य केद्राच्या वतीने पाच वर्षाच्या आतील बालकांना घरोघरी जाऊन पल्स पोलिओ डोस पाजण्याजी विशेष मोहिम राबविण्यात आली आहे.

मुरूम मोड येथे गोमांस वाहतुक करणारे दोघे पोलिसांच्या ताब्यात

तभा वृत्तसेवा
उमरगा, दि.१९ ऑगस्ट -

उमरगा तालुक्यातील मुरूम मोड येथे गोमांस वाहतूक करणारा रिक्षा काही तरुणांनी पकडून रिक्षा चालकासह गोमांस तस्करी करणाऱ्या दोघांना पोलिसांच्या ताब्यात दिले. ही घटना रविवारी (दि.१८) सकाळी उघडकीस आली. याप्रकरणी मुरूम पोलिस ठाण्यात तिघांवर गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळलोली अधिक माहिती अशी की, मुरूम येथून आला रिक्षातून (क्रं. एमएच २५ बी ५७०८) गोमांसाची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्याने दत्ता हुळमजगे, प्रदीप गव्हाणे, वैभव लामजने आदी तरुणांनी रिक्षाचा पाठलाग केला. मुरूम मोड येथे राष्ट्रीय महामार्गाजवळ रिक्षा थांबवला.

रिक्षात गोमांस आढळल्याने पोलिसांना माहिती दिली.

सपोनि नवनाथ गाडेकर, पोहेका संजीवन शिंदे, भीमराव समुद्रे, चालक अशोक राठोड घटनास्थळी पोहोचले.

रिक्षा चालक शहिद महंमद मसुलदार (वय ४०, शास्त्री नगर, मुरूम, ता. उमरगा), महबूब निजामोद्दीन कुरेशी (वय ४०), चांदपाश अब्दुलगणी कुरेशी (वय ३०) दोघे मटण दुकानदार (रा. कसाई गल्ली मुरूम, ता. उमरगा) यांच्यासह रिक्षा ताब्यात घेत वैद्यकीय अधिकारी डॉ. कृष्णा रेड्डी व श्रीकांत कदम यांच्यासह पंचनामा केला.

यात ९८ किलो गोमांस असल्याची खात्री झाली. व्हिसेरा तपासणीसाठी राखून ठेवला. उर्वरित गोमांसावर सोपस्कार केले.

दत्ता हुळमजगे यांच्या फिर्यादीवरून मुरूम पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

वडगाव व फणेपुर गावास आ. चौगुले यांची भेट

तभा वृत्तसेवा
लोहारा, दि.१९ ऑगस्ट -

लोहारा तालुक्यातील वडगाव गां येथे शादिखाना बांधणे व फणेपुर येथील कब्रस्थानला संरक्षक भिंत बांधणेसाठी निधी मंजूर करण्यात, अशी मागणी दि.१५ ऑगस्ट २०२४ रोजी मुस्लिम बांधवांनी आमदार ज्ञानराज चौगुले यांची भेट घेऊन केली आहे. आमदार ज्ञानराज चौगुले यांनी उपस्थित मुस्लिम बांधवांना येत्या थोड्या दिवसात निधी मंजूर करून देणे बाबत आश्वासित केले आहे.

समन्यायी पाणी वाटपात मराठवाड्यावर अन्याय : शंकरराव नागरे

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१९ ऑगस्ट -

महाराष्ट्रात सर्व विभागात उपलब्ध पाण्याचे समन्यायी वाटप करण्याच्या धोरणात मराठवाड्यावर कायम अन्याय होता आला असून जोपर्यंत मराठवाड्यातील सर्वसामान्य नागरिक या प्रश्नावर जागरूक होत नाहीत तोपर्यंत हे थांबणार नाही, असे प्रतिपादन सेवानिवृत्त अभियंता आणि जलसमृद्धी प्रतिष्ठान छत्रपती संभाजी नगरचे शंकरराव नागरे यांनी केले.

ते धाराशिव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्रातील जलभूमी व्यवस्थापन विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या जलसंवाद कार्यक्रमात बोलत होते. यावेळी व्यासपीठावर विद्यापीठाचे सिनेट सदस्य पत्रकार देविदास पाठक आणि अभियंता जिरे उपस्थित होते.

मराठवाड्याच्या पाणी प्रश्नासाठी न्यायालयापर्यंत हा लढा आपण नेला असून मराठवाड्यातील पाणी समस्या शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी मिळणे हा मराठवाड्यातील शेतकऱ्यांचा हक्क असून महाराष्ट्रातील कोकण आणि विदर्भातून अतिरिक्त पाणी नदीजोड प्रकल्पातून मराठवाड्याच्या हक्काचे मिळालेच पाहिजे यासाठी लोकप्रतिनिधी सर्वसामान्य जनतेपर्यंत आपल्याला पोहोचायचे आहे, असे प्रतिपादन नागरे यांनी यावेळी केले.

या प्रश्नी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्र धाराशिव आणि पत्रकार या समन्यायी पाणी वाटपासाठी जलसमृद्धी प्रतिष्ठान सोबत असल्याची ग्वाही देऊन पत्रकार देविदास पाठक यांनी यावेळी याविषयी जनजागृती करण्याची तसेच सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्र धाराशिव येथील जलभूमी व्यवस्थापन विभागाचे विभाग प्रमुख प्राध्यापक नितीन पाटील तसेच सर्व विद्यार्थी, शेतकरी, शहरातील पत्रकार आणि प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मौलाना अब्दुल कलाम आझाद हायस्कुलमध्ये गुणवंतांचा सत्कार

तभा वृत्तसेवा
खामसवाडी, दि.१९ ऑगस्ट -

धाराशिव येथील मौलाना अब्दुल कलाम आझाद उर्दू प्रायमरी अँड हायस्कुल या शाळेला दहा वर्ष पूर्ण झाल्याबद्दल गुणवंत विद्यार्थी व पालकांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून जिल्ह्याचे अतिरिक्त पोलिस अधिक्षक गौहर हसन हे होते. विशेष आमंत्रित म्हणून राष्ट्रवादीचे नेते डॉ. प्रतापसिंह पाटील, आर.पी. कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. गाझी, तसेच प्राचार्य डॉ. अमेर काझी, डॉ.अर्षद सय्यद, नगरसेवक बाबा मुजावर, इस्माईल शेख यांच्यासह शाळेचे विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे संचालक,शिक्षक, कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

अग्रलेख...

भारताचे संतुलित परराष्ट्र धोरण

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सलग तिसऱ्यांदा सत्तासूत्रे हाती घेतल्यानंतर आणि बदललेल्या जागतिक आर्थिक व राजकीय परिस्थितीनंतर भारताचे परराष्ट्र धोरण कसे राहील, याकडे सर्वांचेच विशेषत: अमेरिका व युरोपीय महासंघाचे लक्ष लागले आहे. खासकरून शेजारच्या बांगलादेशातील सत्तापालट, पाकिस्तान व ड्रॅगनच्या कुरापती, इस्रायल-हमास युद्ध, इराणचा इस्रायलवर होऊ शकणारा संभाव्य हल्ला आणि गेल्या दीड-दोन वर्षांपासून सुरू असलेले रशिया-युक्रेन युद्ध या घडामोडींचे प्रतिबिंब भारताच्या परराष्ट्र धोरणावर पडणार याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. चीन हे भारताचे प्राथमिक धोरणात्मक आव्हान आहे, जे दूर होणार नाही, असे भारताचे चीनमधील माजी राजदूत अशोक कांथा यांचे स्पष्ट मत आहे. चीनसमवेत केवळ सीमा व्यवस्थापन धोरणच नव्हे, तर व्यापार संतुलन, महत्त्वपूर्ण उद्योगांमध्ये चीनवर सातत्याने असलेले भारताचे अवलंबित्व यांचाही विचार केला जातो. यादृष्टीने चीनशी व्यापक स्तरावर चर्चा-संवाद करणे आवश्यक आहे. परराष्ट्रमंत्री डॉ. एस. जयशंकर हे आव्हान कसे हाताळतात, याकडे केवळ आशियातीलच नव्हे तर अमेरिका व युरोपातील मुत्सद्यांचेही लक्ष लागले आहे. कारण नेहमीच दहशतवादी कारवायांना सक्रिय पाठिंबा देणारा पाकिस्तान आणि विस्तारवादी व महत्त्वाकांक्षी चीन यांच्यासोबतचे 'अस्वस्थ' संबंध सुधारणे हे खरोखरच मोठे आव्हान आहे आणि केंद्रातील मोदी सरकार आपला पूर्वानुभव लक्षात घेऊन या संबंधात व्यापक सुधारणा करेल, असे स्पष्ट मत पाकिस्तानमधील भारताचे माजी उच्चायुक्त टीसीए राघवन् यांनी व्यक्त केले. मात्र, म्यानमारमधील अंतर्गत कलहाचा देखील भारताला गांभीर्याने विचार करावा लागणार आहे. आणखी एक महत्त्वाची व लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे कुठल्याही देशाच्या आर्थिक, औद्योगिक व लष्करी प्रगतीचे, सामर्थ्याचे आणि प्रबळ आत्मविश्वासाचे प्रतिबिंब त्या देशाच्या परराष्ट्र धोरणात उमटते, ही वस्तुस्थिती आहे. २०१४ मध्ये भाजपाप्रणीत रालोआची राजवट आल्यानंतर आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाची सत्तासूत्रे हाती घेतल्यानंतर भारताच्या परराष्ट्र धोरणात आमूलाग्र बदल झाला. आज २०२४ नंतर म्हणजे सलग १० वर्षांचा आढावा घेतल्यानंतर भारताचे विद्यमान परराष्ट्र धोरण म्हणजे आक्रमकता, संवाद, समन्वय यांचे सुयोग्य मिश्रण असल्याचे आढळून येईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी परराष्ट्र धोरण या विषयात लक्ष घातल्यानंतर प्रथमच यात क्रांतिकारी बदल घडून आले आहेत. बदललेल्या जागतिक पृष्ठभूमीवर अनेक नवीन प्रवाह भारताच्या परराष्ट्र धोरणात दिसून येत आहेत. याचे कारण म्हणजे भारताचे काही अधिमान्य सामरिक, आर्थिक व अन्य हितसंबंध आहेत. त्यानुसारच परराष्ट्र धोरणाची आखणी होणार, हे आता दिवसेंदिवस स्पष्ट होत आहे. पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर गेल्या महिन्यात पंतप्रधानांचा जो यशस्वी रशिया दौरा पार पडला, यामुळे तर भारताच्या परराष्ट्र संबंधाला व धोरणाला नव्याने झळाळी प्राप्त झाली आहे. देशाच्या परराष्ट्र धोरणाला स्वप्नाळूपणा आणि आदर्शवादापेक्षा प्रत्यक्ष वस्तुस्थिती, लवचीकता, परखड वास्तव व व्यावहारिक दृष्टिकोन यांची किनार आहे, हे पंतप्रधानांनी संपूर्ण जगाला दाखवून दिले आहे. परराष्ट्र धोरण हे आपल्या आर्थिक धोरणाचा परिणाम असते, असे अनेक नामवंत मुत्सद्यांचे मत आहे. आज संपूर्ण जगात भारत वेगाने आर्थिक विकास साध्य करीत आहे. भारताची अर्थव्यवस्था वेगाने पुढे जात आहे. २०२१ मध्ये आपण इंग्लंडला मागे सोडून जगातील पाचवी मोठी अर्थव्यवस्था बनलो आहोत. साहजिकच याचे प्रतिबिंब भारताच्या परराष्ट्र धोरणात उमटले आहेत. युक्रेनशी युद्ध सुरू असतानाच रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन यांच्याशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यापक चर्चा केली तेव्हा भारताची बाह्य सुरक्षा व लष्करी सामर्थ्य हाच चर्चेचा केंद्रबिंदू असल्याचे स्पष्ट झाले. कारण, त्यानंतर काही दिवसांतच जमिनीवरून हवेत मारा करणारी लांब पल्ल्याची अत्याधुनिक अशी १२० इंटरसेप्टर क्षेपणास्त्रे रशियाकडून भारताला मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. त्यामुळे रशिया आणि भारत यांच्यातील संबंध २१ व्या शतकातील सर्वात प्रगाढ, सुदृढ व निर्णायक संबंधांपैकी एक आहे, असे अनेक आंतरराष्ट्रीय मुत्सद्यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे. भारताच्या आंतरिक व बाह्य शक्तीची जाणीव झाल्याने आणि नवीन, आक्रमक व शक्तिशाली भारताला सोबत घेतल्याशिवाय 'साम्राज्यवादी ड्रॅगन'ला टक्कर देणे शक्य नाही, याची परिपूर्ण जाणीव अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन यांनाही आहे. रशिया-युक्रेन संघर्ष सुरू झाल्यानंतर म्हणजे सुमारे सव्वा वर्षापूर्वीच भारताच्या परराष्ट्र धोरणाचा एक वेगळा चेहरा जगासमोर आला. भारताचे परराष्ट्र धोरण हे कमालीचे आत्मविश्वासाने भरलेले आहे, याची अनेक उदाहरणे या काळात पुढे आली. भारताने रशिया-युक्रेन यांच्यातील युद्धसंघर्षाबाबत जी भूमिका घेतली त्याबाबत सुरुवातीला युरोपियन देश व अमेरिका यांच्यामध्ये नाराजीचे सूर होते. परंतु, या देशांना भारताचे हितसंबंध यामध्ये कसे गुंतलेले आहेत, हे पटवून देण्यामध्ये भारताला यश आले. त्यामुळे नाराजीचा सूर नंतर संपुष्टात आला. एकूणच नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान म्हणून सत्तासूत्रे हाती घेतल्यानंतर भारतीय परराष्ट्र धोरण हे अत्यंत व्यावसायिकतेने आणि आत्मविश्वासाने भरलेले आहे, हे स्पष्ट होते. आज अमेरिकेने रशियावर असंख्य आर्थिक, राजकीय निर्बंध लादलेले असतानाही भारत रशियाकडून अत्याधुनिक संरक्षण सामुग्री आणि कच्च्या तेलाची मोठ्या प्रमाणात आयात करीत आहे. कारण, भारताचे स्वत:चे काही संरक्षणविषयक व ऊर्जाविषयक हितसंबंध असून राष्ट्रीय दृष्टिकोनातून ते अत्यंत महत्त्वाचे आहेत. भारताला शेजारी देशांकडून असणाऱ्या समस्या गृहीत धरून आणि भारताचे हितसंबंध केंद्रस्थानी ठेवूनच भारत निर्णय घेणार ही बाब केंद्रातील मोदी सरकारने स्पष्टपणे अधोरेखित केली आहे. दुसरे म्हणजे, परराष्ट्र धोरणातील भारताच्या निर्णयस्वातंत्र्यामध्ये पूर्णत: स्वायत्तता आहे. भारताने आग्नेय आशियाई देशांबरोबर संबंध प्रस्थापित करण्यासाठी आखलेल्या 'लूक ईस्ट पॉलिसी'चे नामकरण पंतप्रधान मोदींनी 'ॲक्ट ईस्ट' असे केले आणि या देशांबरोबरचे प्रलंबित प्रकल्प पूर्ण करण्यासाठी ताकद लावली. त्याचप्रमाणे इस्लामिक देशांशी असलेले संबंध सुधारण्यात त्यांनी व्यक्तिगत पुढाकार घेतला. संयुक्त अरब अमिरात या इस्लामिक देशाबरोबर भारताने मुक्त व्यापार करार केला. इस्लामिक देशांबरोबर संबंध सुधारल्याने रशिया-युक्रेन संघर्ष काळातही भारताला तेलाची टंचाई जाणवली नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे अमेरिका आणि रशियामध्ये समतोल साधणारा भारत हा जगातील एकमेव देश आहे. भारताच्या परराष्ट्र धोरणातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे ते प्रथमच भारताच्या आर्थिक विकासाशी जोडण्यात आले. मेक इन इंडिया, स्टार्ट अप इंडिया, आत्मनिर्भर भारत या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांसाठी परराष्ट्र धोरण कसे काम करू शकते यासाठी विचार झाला आणि त्याला यश आले. २०२२-२३ मध्ये सर्वाधिक वस्तूंची निर्यात करणारा देश म्हणून भारत पुढे आला आहे. संपूर्ण कोरोना काळात भारताने जगाला लसींचा पुरवठा केला आणि आज आरोग्य सेवा पुरवठादार म्हणून भारत जगातील सर्वात प्रबळ देश म्हणून पुढे आला आहे. भारताच्या या आर्थिक, औद्योगिक विकासामुळे परराष्ट्र धोरणाला बळकटी येत आहे. रशिया, चीन, अमेरिका व युरोप या बलाढ्य व परस्परविरोधी सत्ता केंद्रांमध्ये संतुलन साधण्याचे महत्त्वपूर्ण कार्य भारताच्या या संतुलित व परिपक्व परराष्ट्र धोरणामुळे साध्य होणार आहे. ■

दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

बांगलादेश लष्करी राजवटीकडे...

नोबेल पारितोषिक विजेते मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखाली बांगलादेशात एक अस्थायी सरकार स्थापन झाले असले, तरी या साऱ्या घटनाक्रमाचा खरा 'विजेता' बांगलादेश लष्कर ठरण्याची शक्यता आहे. नवे सरकार प्रमुख मोहम्मद युनूस हुशार आहेत. उच्चशिक्षित आहेत. पण, राजकारणी नाहीत. त्यांना बांगलादेशातील स्थिती हाताळणे अवघड जात असल्याचे म्हटले जाते. ढाक्यातील ढाकेश्वरी मंदिराला भेट देत त्यांनी एक योग्य संदेश देण्याचा प्रयत्न केला असला, तरी या देशातील जनतेत तयार झालेला दुरावा इतक्या लवकर सांधला जाईल, याची चिन्हे कमी आहेत.

अराजकाकडे... : केवळ शेख हसीना यांना हटवून या देशातील अराजक थांबलेले नाही. देशाच्या मुख्य न्यायाधीशालाही धमकीच्या बळावर राजीनामा देण्यास भाग पाडण्यात आले. आणखी काही न्यायाधीशांना राजीनामा देण्यास भाग पाडले जाईल, अशी एक शक्यता वर्तविली जात आहे. देशात पंतप्रधान नाही आणि प्रधान न्यायाधीश नाही. यात मोहम्मद युनूस कोणते सरकार चालविणार, असा प्रश्न आता विचारला जात आहे.

हिंसक वळण : बांगलादेशात अपदस्थ पंतप्रधान शेख हसीना यांच्याबद्दल राग होता, हे मान्य करण्यात आले पाहिजे. तो राग व्यक्त करण्यात आला. नंतर मात्र देशात ठिकठिकाणी असलेल्या, शेख हसीना यांचे पिताजी आणि देशाच्या स्वातंत्र्यलढ्याचे एक शिल्पकार शेख मुजीबूर रहेमान यांच्या प्रतिमा कलंकित करण्याचे, त्या तोडण्याचे प्रयत्न सुरू झाले आणि यानंतर स्थानिक जनतेचा रोष व्यक्त झाला. याठिकाणी आंदोलनाला वेगळे वळण लागले. मग, त्यात हिंदू-मुस्लिम हा पैलू आला. लाखो हिंदू रस्त्यांवर उतरले. ही सारी स्थिती हाताळणे मोहम्मद युनूस यांना अवघड जात आहे. नवे हंगामी सरकार किती काळासाठी आहे, याची कुणालाही कल्पना नाही. देशात नव्या निवडणुका घेतल्या जातील, असे युनूस यांनी घोषित केले आहे. पण, त्या केव्हा, त्यांची विश्वसनीयता काय राहणार, हेही कुणाला ठावूक नाही.

निवडणुकींची निष्पक्षता : देशात नव्याने निवडणुका झाल्या तरी राजकीय पेचप्रसंग सुटण्याची शक्यता नाही. यात फक्त बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टी म्हणजे बीएनपी सामील झाल्यास त्या निवडणुका एकतर्फी राहणार आहेत. देशभरात शेख हसीना यांच्या अवामी लिगच्या नेत्यांवर- कार्यालयांवर हल्ले चढविले जात आहेत. याची प्रतिक्रिया आज ना उद्या उमटणार आहे. यातून एक प्रकारची राजकीय अस्थिरता तयार होण्याची चिन्हे आहेत. जेव्हा कोणत्याही देशात राजकीय अस्थिरता तयार होते, संवैधानिक व्यवस्था कोसळून पडते, तेव्हा तेथे लष्करी सत्ता येण्याची स्थिती तयार होते. हे पाकिस्तानात वारंवार झाले आहे आणि बांगलादेशातही काही प्रसंगी झाले आहे. मात्र, शेख हसीना यांच्या पक्षामुळे या देशात लोकशाही काही प्रमाणात जिवंत राहिली. ती आज धोक्यात आली आहे.

कठपुतळे सरकार : बांगलादेशात शेख हसीना यांना राजीनामा द्यावा लागला याचे मुख्य कारण म्हणजे आंदोलनाबाबत लष्कराने घेतलेली मवाळ भूमिका. लोकशाही असलेल्या देशातही गंभीर स्थिती उद्‌भवल्यास ती हाताळण्यासाठी लष्कराची मदत घेतली जाते आणि लष्कर कायदा व सुव्यवस्था स्थापित करण्यासाठी आवश्यक त्या बळाचा वापर करते. याठिकाणी बांगलादेश लष्कराने आंदोलकांना हाताळण्यासाठी काहीच केले नाही. एकप्रकारची मोकळीक आंदोलकांना होती. लष्कराने परिस्थिती नियंत्रणात आणावी, हा शेख हसीना यांचा आदेश झुगारण्यात आला. शेख हसीना यांनी देश सोडण्यापूर्वी एक शेवटचा प्रयत्न म्हणून लष्करप्रमुखांना आपल्या निवासस्थानी पाचारण केले होते. त्यांनी शेख हसीना यांना मदत तर केलीच नाही; उलट देश सोडण्यासाठी तुमच्याजवळ ४५ मिनिटे असल्याचे त्यांना सांगितले. म्हणजे शेख हसीना यांना अटक करून त्यांना तुरुंगात टाकण्यात आले नाही, हीच काय ती लष्करप्रमुखांची मेहेरबानी. लष्करप्रमुखांनी शेख हसीना यांच्यावर केलेली दुसरी मेहेरबानी म्हणजे त्यांना देश सोडून जाण्यासाठी त्यांनी लष्कराचे विमान उपलब्ध करून दिले.

सूत्रे लष्कराकडेच : शेख हसीना देशाबाहेर जाऊ शकल्या ते केवळ लष्करामुळे आणि मोहम्मद युनूस हंगामी पंतप्रधान होऊ शकले तेही केवळ लष्करामुळे. लष्कराच्या कृपेने स्थापन झालेले हे सरकार एकप्रकारे लष्कराचे कठपुतळे सरकार आहे. जोपर्यंत लष्कराची इच्छा असेल युनूस सरकारप्रमुख राहतील आणि जेव्हा लष्कराला देशाची सूत्रे आपल्या हाती हवी असतील युनूस यांना बाजूला करून लष्कर आपल्या हाती सूत्रे घेईल□□. म्हणजे भारताच्या शेजारी दुसरे एक पाकिस्तान तयार होईल. पाकिस्तानचे विभाजन होण्यापूर्वी पश्चिम पाकिस्तान व पूर्व पाकिस्तान ही जी स्थिती होती, ती पुन्हा तयार होईल.

सर्वात मोठी सीमा : भारताला आज सात देशांच्या सीमा लागून आहेत. त्यात बांगलादेशची सीमा सर्वात मोठी म्हणजे ४००० किलोमीटरची आहे. या सीमेलगत अनेक भागांत नद्या आहेत. त्यातून मोठ्या प्रमाणावर बांगलादेशी घुसखोर भारतात येत असतात. या घुसखोरांसोबतच दहशतवादीही भारतात येऊ लागले तर? त्यांना सहज आश्रय मिळणारी जागा म्हणजे पश्चिम बंगाल. भाषा-रंग-रूप सारेच सारखे. ही एक नवी समस्या भारताला भेडसावू लागू शकते.

हसीनाला परत पाठवा : अपदस्थ पंतप्रधान शेख हसीना यांना भारताने बांगलादेशात परत पाठवावे, अशी मागणी बांगलादेशात जोर धरू लागली आहे. यासंदर्भात कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्याचा इशारा दिला जात आहे. भारताने शेख हसीना यांना बांगलादेशात परत न पाठविल्यास त्याचा दोन्ही देशांच्या संबंधावर परिणाम होऊ शकतो, असेही बांगलादेशातून म्हटले जात आहे. भारतासाठी बांगलादेशशी संबंध आणि शेख हसीना यांची सुरक्षा या दोन्ही बाबी महत्त्वाच्या असल्याने यातून मार्ग काढण्याची कसरत भारताला करावी लागणार आहे.

चीनचाच हात : शेख हसीना यांनी एक मुलाखत देत आपल्याला हटविण्यामागे अमेरिकेचा हात असल्याचा आरोप लावला आहे. सेंट मार्टिन या लहानशा बेटाचा ताबा अमेरिकेला देण्यास आपण नकार दिला, त्याचा हा परिणाम असल्याचे त्यांनी म्हटले आहे. अमेरिकेने याचा इन्कार केला आहे. हा बांगलादेशचा अंतर्गत मामला असल्याचे अमेरिकेने म्हटले आहे. शेख हसीना यांनी हे प्रतिपादन केले असले, तरी या साऱ्या घटनाक्रमामागे चीनचाच हात असण्याची शक्यता वर्तविली जात आहे. अमेरिका असा मूर्खपणा करणार नाही. भारत वगळता दक्षिण आशियातील सारे देश चीनच्या आहारी गेले असताना, बांगलादेशलाही चीनकडे ढकलण्याची चूक अमेरिका करणार नाही. या भागात अमेरिकेची दारोमदार भारतावर अवलंबून आहे. त्यामुळे भारताला नुकसान होईल, असा निर्णय अमेरिकेकडून घेतला जाण्याची शक्यता फार कमी आहे. या साऱ्यामागे चीनचा हात असल्याचे दिसते. येणाऱ्या काळातील घटनाक्रम या सत्ता बदलातील नाट्यावरचा पडदा हळूहळू दूर करील, असे दिसते. बांगलादेशातील सत्ताबदलात चीनचा हात आहे की पाकिस्तानच्या आएसआयचा, एवढाच प्रश्न बाकी आहे. चीनने आयएसआयला हाताशी धरून हा बदल घडवून आणला असण्याचीही शक्यता आहे. या साऱ्या घटनाक्रमामागे चीन असो वा आयएसआय, भारतासाठी ही मोठी धक्कादायक घटना ठरली आहे. ■

वेध

अनिरुद्ध पांडे

यत्र नार्यस्तु पूज्यन्ते...!

काही सण, उत्सव कालांतराने लोप पावतात, तर काहींचे स्वरूप बदलते. नुकतीच झालेली नागपंचमी या अशा सणांपैकी एक आहे. या दिवशी नागांचे रक्षण व्हावे, नाग-साप हा उपयुक्त प्राणी आहे, ही वस्तुस्थिती सर्वांना कळावी म्हणून या सणाची योजना आपल्या पूर्वजांनी केली असावी. या दिवशी कैची, चाकू, विळी असे नागासाठी धोकादायक ठरतील अशी अवजारे कोणत्याही घरात वापरल्याच जात नसत. काही घरांमध्ये कढई, तर काहींमध्ये तवा न वापरण्याची प्रथा होती. या दोन्ही वस्तू न वापरता, तेलही न वापरता स्वयंपाक केला जायचा. शेतातही विळा, नांगरामुळे सर्पहत्या घडू शकत असे म्हणून या दिवशी निंदण, नांगरणी अशी शेतीकामे कटाक्षाने केली जात नसत. यंत्रसामुग्रीमुळे नकळत सर्पहत्येची शक्यता गृहीत धरून बहुतांश कारखाने नागपंचमीची सुटी घेत. वर्तमानपत्रांच्या वर्षभरातील दहा-बाराच सुट्यांपैकी एक नागपंचमीची असायचीच, अगदी आत्ताआत्तापर्यंत. पण परिस्थिती बदलत गेली. सापांविषयी जागृती होत भीती कमी होत गेली. सर्पहत्येतही लक्षणीय घट झाली. गावोगाव 'सर्पमित्र' तयार होऊन ते सापांविषयीचे गैरसमज दूर करू लागले. 'सर्प हा मित्र' हे जसजसे लोकांना पटू लागले तसतसे नागपंचमी सणाचे स्वरूप बदलू लागले. घरातील स्वयंपाक, शेतातील कामे हळूहळू बदलू लागली. तेलाचा वापर सुरू झाला. कापणे, चिरणे दक्षता घेऊन सुरू झाले. आपण काहीच कापकूप करायची नाही, पण दुसऱ्याने, हॉटेलवाल्याने केली तर ती चालून जायला लागली. महत्त्वाचे म्हणजे वर्तमानपत्रांना असलेली नागपंचमीची सुटी बंद झाली.

लोप पावत असलेल्या नागपंचमी सणाप्रमाणे दहाच दिवसांनी पौर्णिमेला येणाऱ्या रक्षाबंधन सणाचे स्वरूप मात्र बदलले नाही. उलट त्याचा उत्सव होऊ लागला. रक्षाबंधन पूर्वीपासूनच भारत देशभर साजरे होते. रक्षाबंधन का, कशासाठी याची तर्कशुद्ध उत्तरे मिळू शकतात, मिळतात. पण त्याची सुरुवात केव्हापासून याची निश्चित माहिती नाही. एक पौराणिक आख्यायिका आहे. पूर्वी देव आणि दानवांच्या युद्धात दानवशक्तीपुढे देवांचे काही चालत नसे. दानवाचा म्हणजेच राक्षसांचा राजा वृत्रासुर याने देवराज इंद्राला युद्धाचे आव्हान दिले. इंद्र आपले वज्र हे शस्त्र घेऊन युद्धास निघाला. त्यावेळी इंद्राला विजय मिळावा म्हणून त्याची पत्नी शची हिने भगवान विष्णूंकडून मिळालेला धागा इंद्राच्या मनगटावर बांधला. हा धागा म्हणजेच 'राखी'. या राखीच्या प्रभावाने इंद्राला या युद्धात विजय मिळेल, अशी शचीची श्रद्धा होती. इंद्राचा विजय झाला. या प्रसंगाची आठवण म्हणून राखी बांधण्याची पद्धत पडली, असे सांगतात. दुसऱ्या एका कथेनुसार महाभारत काळात पांडवपत्नी द्रौपदीने भगवान श्रीकृष्णाच्या मनगटातून वाहणारे रक्त थांबवण्यासाठी आपल्या साडीचा कोपरा फाडून त्याच्या मनगटावर बांधला. यातून त्या दोघांमधील भावा-बहिणीचे नाते अधिक बळकट होऊन श्रीकृष्णाने द्रौपदीच्या रक्षणाचे वचन दिले. एका ऐतिहासिक कथेनुसार, राणा संग याच्या मृत्यूनंतर चितोडचे रक्षण करण्यासाठी राणी कर्मवतीने दिल्लीचा मोगल बादशहा हुमायूनला बंधुप्रेमाची राखी पाठविली. हुमायूननेही त्या राखीचा सन्मान करून बहादूरशहापासून चितोडला वाचवले.

आणखी एक जगज्जेता सिकंदरचीही गोष्ट आहे. तो हिंदुस्थानात आला असता झेलम नदीकिनारी सावित्री नावाची स्त्री राखीची पूजा करून ती जलदेवतेला अर्पण करीत होती. सिकंदरने हे काय आहे, असे कुतूहलाने विचारले. तेव्हा सावित्रीने राखीचे महत्त्व सांगून त्याला राखी बांधली. पुढे सिकंदराने पोरस राजाला हरवून कैद केले. पोरसाची बहीण असलेल्या 'त्या' सावित्रीने सिकंदरला जाऊन राखीची आठवण करून दिली. सिकंदरानेही बहिणीच्या नात्याचा मान ठेवून पोरसाची सुटका करून राज्यही परत दिले. राजस्थानमध्ये रक्षाबंधनाची प्रथा पूर्वीपासूनच होती, पण काही शतकांपासून ती संपूर्ण भारतात आहे. राखी म्हणजे केवळ दोरा नाही. ते स्नेह, माया यांचे प्रतीक आहे. दुभंगलेली मने जोडण्याचे साधन आहे. प्रेम, जिव्हाळा वाढवणारे आहे. राखीचे पवित्र बंधन कर्तव्याची जाणीव करून देते. 'राखी' या शब्दातच रक्षण कर, 'राख' म्हणजे सांभाळ असा संकेत आहे. तो फक्त भाऊ-बहीण नात्यापुरता मर्यादित नाही. कोणत्याही कर्तबगार, शूरवीराने दुर्बल, असहाय, दिव्यांग आणि अबलांचे रक्षण करणे अपेक्षित आहे. यातूनच आजकाल अशा करारी पुरुषाला राखी बांधून त्याच्यावर रक्षणाची जबाबदारी टाकण्यात येते. काही वर्षांपासून बोकाळलेली वृक्षतोड टाळण्यासाठी पर्यावरणप्रेमी वृक्षांना राखी बांधून त्यांचे संरक्षण करण्याचा एक संदेशच या निमित्ताने देत असतात. महत्त्वाचे म्हणजे स्त्री हा केंद्रबिंदू असलेल्या या सणाचा उद्देश स्त्रीला समान हक्क, सन्मानाची वागणूक हाच आहे. जिथे स्त्रीचा मान, सन्मान तेथे देवतांचा वास आणि जिथे नाही तिथे कुठलीही प्रगती नाही, अशा अर्थाचा मनुस्मृतीतील हा श्लोक आजही किती सार्थ आहे बघा..

यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता: ।
यत्रैतास्तु ना पूज्यन्ते सर्वास्तत्राफला: क्रिया: ॥ ■

९८८१७१७८२९

कानोसा

अमोल पुसदकर

सामाजिक बंधुतेचे रक्षाबंधन

१९०५ मध्ये इंग्रज सरकारने बंगालचे विभाजन करण्याचा निर्णय घेतला. ज्यावेळेस लोकांनी या वंगभंगाचा विरोध केला त्यावेळेस तत्कालीन व्हाईसरॉय लॉर्ड कर्झन म्हणाला की, हा कायदा संसदेमध्ये पारित करण्यात आलेला आहे. त्यामुळे बंगालचे विभाजन झालेले आहे. याला आता कोणीही बदलवू शकणार नाही.

परंतु रक्षाबंधनाच्या दिवशी हजारो लोक गंगा नदीच्या किनाऱ्यावर एकत्र आले. त्यांनी वंदे मातरम्‌च्या घोषणा दिल्या आणि परस्परांना रक्षासूत्र बांधून बंगालचे विभाजन समाप्त करण्यासाठी प्रयत्न करण्याची प्रतिज्ञा घेतली. यामुळे संपूर्ण समाज जोडला गेला व तो वंगभंगाच्या विरोधात पेटून उठला. इंग्रजांनी कायदा पारित केला होता परंतु लोक या कायद्याला मानायला तयार नव्हते. इंग्रजांना बंगालचे विभाजन करून दोन भाग करायचे होते. त्यामध्ये एक मुस्लिमबहुल बंगाल व दुसरा हिंदुबहुल बंगाल. हिंदूंनाच काय पण मुसलमानांना सुद्धा ही इंग्रजांची नीती आवडलेली नव्हती. इंग्रजांनी ढाक्याच्या नवाबाला १४ लक्ष रुपये देऊन त्याला आपल्याकडे वळविण्याचा प्रयत्न केला. ढाक्याच्या नवाबानेसुद्धा मुसलमानांना बंगालचे विभाजन कसे आवश्यक आहे व मुसलमानांच्या फायद्याचे आहे, हे पटवून देण्याचा प्रयत्न केला. परंतु तरीसुद्धा राष्ट्रवादी शक्ती एवढ्या बलवत्तर होत्या की मुसलमानसुद्धा इंग्रजांच्या या नीतीला बळी पडले नाही. ठिकठिकाणी मोर्चे, आंदोलने आणि इंग्रजांचा बहिष्कार सुरू झाला.

यातूनच स्वदेशीचे आंदोलन उभे राहिले. सर्व लोकांनी इंग्रजांच्या वस्तूंचा बहिष्कार केला. इंग्रजांचे कापड, विदेशी वस्तू यांच्यावर बहिष्कार सुरू झाला. समाजातल्या सर्व स्तरातील लोकांनी हा बहिष्कार केला. लग्न लावणारे पुरोहित म्हणू लागले की जर कोणी विदेशी कपडे घालून लग्नाला उभा राहील तर आम्ही लग्नाचा विधी करणार नाही. चप्पल शिवणारा म्हणू लागला की मी विदेशी चपला शिवणार नाही. विदेशी मिठाईचादेखील बहिष्कार करण्यात आला. जनतेने विदेशी वस्तूंची होळी केली. पुण्यामध्ये विदेशी कपड्यांची होळी झाली. लोकांनी हातमागावर विणलेल्या वस्त्रांना प्राधान्य देणे सुरू केले. एकेकाळी मुंबईमध्ये मँचेस्टर कापडाचे चाळीस हजार गठ्ठे एका वर्षात विकले

जायचे. परंतु १९०५-१९०६ या वर्षांमध्ये केवळ चाळीस गठ्ठेच विकले गेले. म्हणून मुंबईच्या व्यापाऱ्यांनी मँचेस्टरला पत्र लिहून ही परिस्थिती कळविली. त्याचा परिणाम असा झाला की इंग्लंड सरकारने भारत सरकारला विचारले की, जर इतका रोष लोकांचा होतो आहे व त्यामुळे आपला व्यापार प्रभावित होतो आहे तर आपण हा निर्णय रद्द का करीत नाही. आणि याचा परिणाम म्हणून पुढे बंगालची फाळणी रद्द झाली. जी गोष्ट नि:शस्त्र जनता बहिष्काराचे तंत्र वापरून करू शकली तीच गोष्ट १९४७ साली मात्र होऊ शकली नाही. ज्या जनतेने बंगालचे विभाजन रोखले ती जनता नेत्यांपुढे हातबल ठरली. इंग्रज मुस्लिम लीग व काँग्रेसचे नेते यांनी देशाच्या विभाजनाला संमती दिली. देशाची जनता विभाजनाच्या बाजूने नव्हती. तरीसुद्धा देशाचे विभाजन झाले. रक्षाबंधनाच्या सणाचा उत्सव लोकांनी एकमेकाला रक्षासूत्र बांधून केला व त्यातून जनसामान्यांमध्ये जागृती झाली. लोक एकत्र आले. रक्षाबंधन सणाचा, उत्सवाचा असा उपयोग पारतंत्र्यात होऊ शकला. आजही हा सामाजिक संदेश आम्ही लोकांपर्यंत पोहोचवू शकतो.

आज बांगलादेशामध्ये हिंदूंवर अत्याचार होत आहेत. या विरुद्ध संपूर्ण समाजाने पेटून उठायला हवे. हिंदूंवर जर अत्याचार झाले तर बांगलादेशाशी व्यापार पुढे करायचा नाही अशा पद्धतीचा निर्णय सुद्धा व्यापारी व जनता घेऊ शकते. याच व्यापाराच्या जोरावर पारतंत्र भारत इंग्रज सरकारला नमवू शकला तर याच व्यापाराच्या जोरावर भारत बांगलादेशला हिंदूंच्या सुरक्षिततेकरिता बाध्य का करू शकणार नाही, याचाही विचार करण्याची आवश्यकता आहे.

निवडणुकीच्या काळामध्ये 'संविधान खतरे में है' अशा पद्धतीची घोषणा दिली गेली व विशिष्ट समाजामध्ये एक भयाचे वातावरण निर्माण करण्यात विरोधी पक्ष यशस्वी झाला. परंतु त्याचवेळी असा कुठलाही बदल संविधानामध्ये केला जाणार नाही, असे सांगणारे लोक सुद्धा होते. परंतु विरोधी पक्षांचा आवाज हा मोठा होता, विरोधी पक्षांचे संबंध आणि संपर्क या समाजामध्ये मोठ्या प्रमाणावर होते. यातून आपल्या काय लक्षात येईल की ज्या समाजाला सहजासहजी भ्रमित केले जाऊ शकते, त्या समाजामध्ये सुद्धा आमचे चांगले संबंध असणे गरजेचे आहे.

रक्षाबंधन हे निमित्त आहे. या निमित्ताने आपल्या परिसराच्या सभोवताल असणाऱ्या कुठल्यातरी सेवा वस्तीमध्ये आम्ही या सणाच्या निमित्ताने गेलो पाहिजे व त्यांना सुद्धा रक्षासूत्र बांधून ते सुद्धा या राष्ट्राचे एक अंगभूत घटक आहे, ही जाणीव त्यांच्यामध्ये निर्माण केली गेली पाहिजे. कारण अशा समाजाचा फायदा आज विरोधी पक्षाने घेतला, उद्या विदेशी शक्ती घेतील हे दोन्ही पण धोके आहेतच. सुदृढ लोकशाहीसाठी हा फार मोठा धोका आहे. त्यामुळे कुठलाही समाज निरक्षर राहणार नाही, सामाजिकदृष्ट्या अस्पृश्य राहणार नाही, समाज म्हणून सर्व लोक एक राहतील याचा प्रयत्न केला पाहिजे. आता विविध समाजांच्या आरक्षणाच्या मागण्यांसाठी समाजांमध्ये आंदोलने उभी केली जात आहेत. त्यातून समाजा-समाजांमध्ये तेढ आणि वाद निर्माण होत आहे. ही परिस्थितीसुद्धा सामाजिक ऐक्यासाठी चांगली नाही. महाराष्ट्राचा बांगलादेश होऊ शकतो, अशा पद्धतीच्या गोष्टी सुद्धा काही पुढारी करताना आपल्याला दिसून येतात. यावरून आपण एवढेच लक्षात घेतले पाहिजे की सामाजिक स्वास्थ्य चांगले नाही, ते बिघडलेले आहे. रक्षाबंधनाच्या निमित्ताने आम्ही प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचून त्याच्याशी सलोख्याचे संबंध निर्माण करण्यासाठी व कोणीही एकटा नाही, कोणीही असुरक्षित नाही, सर्व लोक समाजाच्या पाठिंब्याने सुरक्षित आहे अशा पद्धतीचा संदेश दिला गेला पाहिजे. ■

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

दुर्दैवी विनेश फोगट

भारताची सुप्रसिद्ध ऑलिम्पिक खेळाडू विनेश फोगटच्या पदक मिळवण्याच्या प्रयत्नांना अपयश आल्याची बातमी वाचनात आली. अर्थात् हे होणारच होते. कोणत्याही क्षेत्राचे काही नियम, मार्गदर्शक तत्त्वे ठरलेली असतात आणि त्याचे पालन करणे हे खेळाडूंसह सर्वांचेच कर्तव्य असते. ऑलिम्पिकसारख्या जागतिक स्पर्धांचे नियम अत्यंत कठोर असणेही ओघानेच आले. त्यात कोणालाही सूट मिळण्याची सुतराम शक्यता नाही. वास्तविक आपले वजन जास्त होते हे खुद्द विनेश फोगटनेही नाकारले नव्हते. त्यामुळे तिने खिलाडूपणा द

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांचा वरदहस्त जालन्यात विकास कामांचा धुमधडाका; खोतकरांनी आणले पुन्हा २० कोटी

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

मागील वर्षभरात माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांनी पाठपुरावा केल्यामुळे जालना शहर आणि ग्रामीण भागात सुमारे २०० कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. शहर आणि ग्रामीण भागात विविध विकास कामांचा धूमधडाका सुरू असतानाच पुन्हा नव्याने २० कोटी रुपयांची विकासकामे मंजूर झाली आहेत. मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांचा वरदहस्त असल्याने आणि विकास कामांना प्राधान्य देण्याच्या धोरणामुळे आपल्या जालना विधानसभा मतदारसंघाचे चित्रच पालटणार असल्याचे माजी राज्यमंत्री तथा शिवसेना उपनेते अर्जुनराव खोतकर यांनी म्हटले आहे.

माजी राज्यमंत्री श्री. खोतकर यांनी म्हटले आहे की, महिलांसाठी मुख्यमंत्री माझी 'लाडकी बहीण' योजनेसह कोट्यावधी रुपयाच्या विविध योजना प्रत्यक्षात राबविण्यात येत आहेत. बेरोजगार तरुणांसाठी लाडका भाऊ योजना सुरू आहे. शेतकऱ्यांना थेट मदतीसाठी सोयाबीन व कापूस पिकाला दोन हेक्टर पर्यंत (प्रत्येकी पाच पाच हजार) अनुदान दिले जानार आहे. याशिवाय वेगवेगळे अनुदान दिले जात आहे. विहिरीसाठी ३ लाखावरून थेट ५ लाखापर्यंत अनुदान मंजूर केले आहे. समाजातील सर्व घटकांना मदत होईल असेच धोरण मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारने राबविले आहे.

जालना शहरातील वेग-वेगळ्या वस्त्यांमध्ये नागरिकांच्या समस्या आणि प्रश्न आपण जाणून घेतले. त्यांच्या मागणीनुसार विविध वार्डातील विविध विकास कामासाठी २० कोटी रुपयांचा निधी पुन्हा मंजूर केला आहे. त्यातून आता सिमेंट रस्ते, सामाजिक सभागृह, संरक्षण भिंत,बुद्ध विहार, ख्रिश्चन स्मशानभूमी, पेवर ब्लॉक बसवणे, भूमिगत नाली बांधकाम, मुख्य सिमेंट रस्ते, कब्रस्तान संरक्षण भिंत, बसवेश्वर चौक विकसित करणे ,दर्गा येथे सभागृह बांधकाम, विविध मंदिरासमोर सभागृह उभारणे, संत सावता मंदिरासमोर लादिकरण करणे, वडारवाडी येथे सभागृह, हिंदू ,बौद्ध, ख्रिश्चन, मुस्लिम, स्मशानभूमीचा विकास करणे, भावसार

समाजासाठी भावसार भवन बांधकामासाठी ६० लक्ष रुपये निधी,अशा पद्धतीने सुमारे २० कोटीचा निधी प्राप्त झाला असून लवकरच या कामाचा शुभारंभ होणार आहे. विकास कामे करताना सर्व समाजघटकांना समान न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. विकास कामांचा रथ असाच पुढे जाणार असून शहराचे चित्र प्रत्यक्षात पालटणार आहे.

शहराचा चेहरामोहरा बदलणार

"आज पर्यंत 'स्वच्छ जालना सुंदर जालना' अशा बाता अनेकांनी मारल्या. प्रत्यक्षात पालिकेत सत्ता असूनही विकास कामे करण्याऐवजी पालिके विरुद्ध आंदोलन करण्याचे नाटक केले. आज शहरातील प्रत्येक भागात विकासकामे सुरू आहेत. महानगरपालिका झाल्यामुळे मोठा निधी शहराला मिळत आहे. मनपाला विरोध करणाऱ्याचे आता पितळ उघडे पडले असून विकास कामामुळे डोळे दिपत असतील. मागील वर्षभरात शहरातील प्रमुख विकासकामांचा प्राधान्यक्रम ठरवून आपण सुमारे २०० कोटी रुपयांचा निधी राज्य सरकारकडून मिळविला आहे. त्यातून विकासकामांचा धडाका सुरू आहे.

माऊली नगर भागातील मुख्य रस्त्याचा प्रश्न अत्यंत गंभीर बनलेला आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडलेले आहेत. नागरिक, विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून यशवंतनगर, रस्त्यावरील चालावे लागते. या भागातील महिला आणि जेष्ठ नागरिकांनी पाठपुरावा केल्यामुळे आपण सुमारे ६८ लक्ष रुपये या रस्त्यासाठी मंजूर केले आहेत. ऍड राजेश वाघ यांचे निवासस्थान ते राजपूतवाडी डीपी रोडपर्यंत पूर्ण रस्ता केला जाणार आहे. याशिवाय माऊली नगरमध्ये इंजि. दावनगावे यांच्या घराशेजारी एक सभागृह मंजूर झाले आहे. वैष्णव यांचे घर ते मोहिते यांच्या घरापर्यंत २० लाख रुपयेचा सिमेंट रस्ता मंजूर झाला असून याआधी अंतर्गत रस्ते व तीन सभागृह पूर्ण झा-लेले आहेत. माऊली नगरचे भाग्य उजळले असल्याची भावना या भागातील नागरिक व महिलांनी व्यक्त केली आहे, याचे आपणास समाधान आहे.

संक्षिप्त

पत्रकार अशोक म्हस्के यांना माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीमध्ये उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल केले सन्मानित

तभा वृत्तसेवा
जाफराबाद प्रतिनिधी

जालना येथील हॉटेल सागर इन कलावती हॉस्पिटल च्या बाजूला येथे माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीचा राज्य मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्यासाठी महाराष्ट्र राज्यातील सगळीकडून माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीचे सर्व पदाधिकारी समितीचे व सदस्य आलेले होते. अशोक म्हस्के या पत्रकाराने गेल्या दोन वर्षापासून समितीचे काम फार मेहनतीने केलेले आहे. माहिती अधिकार संरक्षण समितीचे कार्य हे जाफराबाद तालुक्यात कन्याकोपऱ्यामध्ये पोहोचविलेले आहे. माहिती अधिकारामध्ये एकटा काम करत असताना त्यांनी आपल्या सोबत तालुक्यातील सदस्य जमवून तालुक्यात माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण हे मोठे संघटन उभे केले आहे . त्यांचा माणसे जोडण्यामध्ये फार मोठा असा अनुभव आहे. त्यांचा प्रेमळ स्वभाव असल्यामुळे माणसे त्यांच्याकडे येतात ,व अन्याय झालेल्या व्यक्तीला सहकार्य करण्याचे त्यांचे मोठे तालुक्यात काम आहे . पत्रकारिता करत असताना अन्याय झालेल्या व्यक्तींना न्याय मिळवून देण्याचे काम केले आहे . तालुक्यात बातमी आणण्यासाठी स्वतः जाऊन पत्रकारितेचे काम केलेलं आहे.या केलेल्या सर्व पत्रकारिता व माहिती अधिकार या सर्व बाबीचा विचार करून माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष महेश सारणीकर सर , महाराष्ट्राचे कार्याध्यक्ष सखाराम पंत कुलकर्णी सर, मराठावाडा विभागीय अध्यक्ष जगन्नाथ रासवे सर समितीचे सचिव विनोद गायकवाड सर या सर्वांनी माहिती अधिकार पत्रकार समितीचे तालुका अध्यक्ष अशोक म्हस्के यांना सन्मान पत्र ,शाल ,पुष्पगुच्छ ,व ट्रॉफी देऊन सन्मानित केलेआहे.

सुरेश कुमार जेथलियांच्या हस्ते पोलीस दलात निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार

तभा वृत्तसेवा
परतुर/प्रतिनिधी

वाटुर फाटा येथे पिंपरखेडा गावचे सुपुत्र निवास हरिभाऊ चव्हाण यांची रत्नागिरी पोलीस दलात आणि उमरखेडा गावचे सुपुत्र मिलिंद संजय जाधव यांची राज्य राखीव पोलीस दल जालना निवड झाल्याबद्दल मा.आमदार सुरेशकुमार जेथलिया साहेबांनी संघर्ष करीअर अकॅडमी छ. संभाजीनगर चे संचालक व श्री. दिलीप चव्हाण यांचाशाल श्रीफळ देऊन आमदार सुरेश कुमार जेथलिया साहेबांनी सत्कार केला. यावेळेस सोबत किसनराव मोरे, दिलीप चव्हाण, लक्ष्मण शिंदे,योगेश अवचार,अमोल राठोड (राष्ट्रीय बंजारा परिषद जिल्हा कार्याध्यक्ष),अमोल भैय्या राठोड, सुहास राठोड, नरेश राठोड व इतर सहकारी

तभा वृत्तसेवा

माझी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना अंतर्गत आज गावोगावी जाऊन रक्षाबंधनानिमित्त महिला भगिनी कडून राखी बांधून घेतल्या व तसेच माननीय मुख्यमंत्री साहेबांसाठी एक राखी प्रत्येक महिलांकडून संकलित करून त्या वर्षा बंगल्या मुंबई या ठिकाणी पाठविण्यात येणार आहे या कार्यक्रमासाठी शिवसेना जिल्हाप्रमुख मोहन अग्रवाल शिवसेना उपजिल्हाप्रमुख बाबासाहेब चिखले जिल्हाध्यक्ष शिवाजीराव तरवटे, विधानसभा संघटक विजयकुमार गिरी,महिला आघाडी उपजिल्हाप्रमुख ललिता ताई काळदाते, महिला आघाडी तालुकाप्रमुख नीताताई घोंगडे,प्रणय मोर, कृष्णा अग्रवाल, राहुल भदर्गे, लक्ष्मण काळदाते दिनकर शेंडगे, यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते

आष्टीतील खंडेश्वर मंदिराच्या विकासासाठी ३ कोटी ५० लक्ष रुपयांचा निधी -आ.बबनराव लोणीकर

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

प्रादेशिक पर्यटन विकास निधी अंतर्गत आष्टी तालुका परतुर येथील खंडेश्वर मंदिरासाठी ०३ कोटी५० लाख रुपये चा निधी प्राप्त झाला असून खंडेश्वर परिसरातील विकास कामांचे उद्घाटन लवकरच होणार असल्याची माहिती माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी विकास कामांच्या जागेची पाहणी करताना दिली

यावेळी बोलताना ते म्हणाले की ०१ कोटी २५ लक्ष रुपयाचे भक्तांसाठी भव्य प्रसादालय, भक्तनिवासाचे बांधकाम करणे ५१ लक्ष रुपये सभामंडपाचे छत १० लक्ष रुपये प्रवेशद्वार बांधकाम करणे ०४ लक्ष रुपये यासह पाच विभाग काम वृक्ष लागवड व संवर्धन अशी विविध प्रकारची कामे मंदिराच्या परिसरात केली जाणार असून यामुळे आष्टी व पंचक्रो-शीतील भक्तांची मोठी सोय होणार असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी सांगितले

पुढे बोलताना ते म्हणाले की आपण परतूर मतदारसंघाचा विकास करत असताना पर्यटन निधी अंतर्गत करळेश्वर असेल घटना येथील गुरु गंगाभारती बाबा संस्थान, आष्टी येथील गणपती मंदिर मारुती मंदिर यासह अनेक कामांसाठी निधी उपलब्ध केला होता त्यांनी तिचा विनय होऊन अनेक सुंदर अशी कामे उभी राहिली असल्याचे यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी सांगितले



पुढे बोलताना ते म्हणाले की खंडेश्वर मंदिराच्या विकासाच्या माध्यमातून या ठिकाणी उपलब्ध होणाऱ्या सुविधा या उच्च दर्जाच्या असून त्यामुळे खऱ्या अर्थाने मंदिर परिसराचा विकास होणार असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले

कृष्णकांत अष्टेकर यांनी आष्टीतील भक्त गणांसाठी श्रावण मासा मध्ये श्री महंत समाधान जी चैतन्य महाराज यांच्या अमृतव-ाणीतून सुरू असलेल्या कथेचे आमदार बबनराव लोणीकर यांनी श्रवण करीत आशीर्वाद घेतले यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना आमदार लोणीकर म्हणाले की, भारताची संस्कृती ही प्राचीन संस्कृती असून केवळ साधुसंतामुळेच ही संस्कृती टिकून असल्याचे नमूद करताना छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेला देव देश आणि धर्माचा मंत्र आम्ही ध्यानात घेऊन काम करत असल्याचे यावेळी बोल-ताना नमूद केले, पुढे ते म्हणाले की देशाचे पंतप्रधान हे साधुसंतांच्या आशीर्वादाने दुसऱ्यांदा पंतप्रधान झाले असून सुसंस्कृत देशाची जडणघडण करण्यात साधुसंतांचा सर्वाधिक वाटा असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले. यावेळी भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर भाजपा तालुकाध्यक्ष शत्रुघन कणसे, तुका आबा सोळंके मधुकर मोरे गजानन लोणीकर बबलू सातपुते छत्रपती थोरात रमेश थोरात रामदास काका सोळंके बाबा सोळंके महादेव वाघमारे सिताराम राठोड बाळासाहेब लहाने , राजेभाऊ तोर्,नसरुल्ला काकड रफिक कुरेशी श्री गांजाळे सईद शेख, मुजीब राज वसीम राज शफी कुरेशी यांच्या सह मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांची उपस्थिती होती

जाफ्राबाद तालुक्यातील आधार अपडेट आणि मोबाईल नंबर लिंक नसल्याने अनेक बहिणी उपाशी

तभा वृत्तसेवा
जाफ्राबाद/प्रतिनिधी

जाफ्राबाद तालुक्यांत अनेक महिला, मुख्यमंत्री लाडकी बहिन योजना महाराष्ट्र शासना कडुन सुरु करण्यांत आलेली असुन बऱ्या पैकी बहिणीना तिन हजार रु.मिळालेले सुध्दा! मात्र महाराष्ट्र बॅक, महाराष्ट्र ग्रामीण बँक, एच.बी.आय, पोष्ट ऑफीस, जिल्हा मध्यवर्ती सरकारी बँक अश्या विविध बँकेत लाडक्या बहिना तिन रु. काढण्यासाठी गर्दीच गर्दी जाफ्राबाद तालुक्यांत चित्र दिसत आहे.

लाडक्या बहिणीच्या काही स्वःताच्या चुका असुन आणि शिव्या सरकारचा अधिकारी ना, काही शाखेत अधिकाऱ्यांची तुरगी , मुर्गी,होतांना दिसुन येते.

एकदरीत मुख्यमंत्री लाडक्या बहिणीना रु. तिन हजार पाहिजे असेल तर आपले आधार कार्ड ऑपटेड करून अधार कार्डला मोबाईल नंबर लिंक करावा, मंग पुन्हा लाडक्या बहिणीनी रुपये तिन हजार नकीच मिळेल ! यांच्या नंतरही हुकुन चुकुन लाडक्या बहिणी आन लाईन फार्म भरण्याचे राहिल्यास त्या साठी शासनाने सप्टेबर पर्यंत अर्ज ऑनलाईन, ऑफ लाईन अर्ज लाडक्या बहिणीचा अर्ज सरकारने स्विकारनार अशी स्वःता मुख्यमंत्री एकनाथ राव शिंदे पुणे येथील कार्यक्रमात लाडक्या बहिणीना मार्गदर्शन महिला मेळाव्यांत सांगितले आहे.लाडक्या बहिणीची मांगणी सुध्दा आहे. दिपावली पर्यंत तिन पेक्षा अधिक च वाढ मिळेल व आम्हा आमच्या बहिणीनी आशिर्वाद व्यावे, असे देखिल मुख्यमंत्री शिंदे म्हणाले,

तभा वृत्तसेवा

राजस्थानचे महामहीम राज्यपाल आ.हरिभाऊ बागडे नाना यांची छत्रपती संभाजीनगर येथे जालना विधानसभा प्रमुख भास्कर आबा दानवे यांनी भेट घेतली. राज्यपाल पदी नुकतीच नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे भारतीय जनता पार्टी जिल्हा जालनाच्या वतीने शाल-पुष्पगुच्छ देऊन हार्दिक अभिनंदन केले तसेच वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष श्री.बद्रीनाथ पठाडे, जालना महानगराध्यक्ष श्री.अशोक (आण्णा) पांगारकर, प्रदेश कार्यकारिणी निमंत्रित सदस्य राजेशजी राऊत, जिल्हा सरचिटणीस सिद्धिविनायकजी मुळे, शिवराज जाधव, सरपंच निवृत्ती लंके, यांच्ससह भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

भाऊ नसलेल्या राजश्रीताई बांधतात आदिवासी मुलांना राखी

सलग ८ वर्षांपासून आदिवासी मुलांसोबत रक्षाबंधनाचा सण करतात साजरा

तभा वृत्तसेवा
परतूर/प्रतिनिधी

अनु-आदिवासी आश्रम शाळा परतूर येथे (वर्ष ८ वे)दरवर्षी प्रमाणे याही वर्षी रक्षाबंधनचा सण उत्साहात साजरा करण्यात आला. सौ.राजश्रीताई शिवहरी डोळे या दरवर्षी अनु-आदिवासी आश्रम शाळा परतूर येथे मुलांना राखी बांधत आहे.

शास्त्रात रक्षाबंधनाचा सण महत्त्वाचा आहे. भावा-बहिणीचे अतूट नाते दर्शवणारा हा सण आहे. या दिवशी बहीण भावाच्या हातावर राखी बांधते आणि त्याच्या दीर्घायुसाठी प्रार्थना करते. तसेच भाऊही बहिणीला तिचे रक्षण करण्याचे वचन देतो.

राजश्रीताईला सख्खा भाऊ नसल्या कारणाने त्या मागील ८ वर्षा पासून आदिवासी मुलांसोबत रक्षाबंधनाचा सण साजरा करत आहे. आज २५० ते ३०० भावासोबत हा सण त्या साजरा करत आहे.

संचालक मंडळाच्या प्रयत्नांमुळेच शिक्षक पतसंस्था प्रगतीपथावर -दळवी

तभा वृत्तसेवा
माहोरा /प्रतिनिधी

संचालक मंडळाने कर्जवसुलीसाठी केलेले भरीव प्रयत्न,सभासद हितासाठी राबवलेल्या आकर्षक योजना व घेतलेले धडाडीचे निर्णय यामुळें जाफराबाद जिल्हा परिषद शिक्षक पतसंस्था कायम प्रगतीप-थावर वाटचाल करत राहील असा विश्वास माजी चेअरमन भगवानराव दळवी यांनी शनिवारी ता.१७ केले.जिल्हा परिषद शिक्षक पतसंस्थेच्या ४४व्या वार्षिक सभेच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.यावेळी विस्तार अधिकारी रामकुमार खराडे,भाग चौकसनीस संजय उभरहंडे, जिल्हाध्यक्ष भगवान भालके,गणेश लोखंडे,माजी चेअरमन दिनकर भोसले, बळीराम उभरहंडे, जे.पी.जाधव, बिंदेसिंग सोळंकी, सुधाकर चिंधोटे, डी. के.खरात,जमीर शेख,रिजवान शेख, प्रदिप साळोख, कैलास बकाल, चेअरमन विनोद कळंबे, व्हॉईस चेअरमन प्रदिप ताठे, मानद सचिव वसंता शेवाळे, संचालक गणेश पवार,सुखदेव अवकाळे, संजय लोखंडे संजय निकम,अभिजित साळवे, किरण तिडके, गणेश फुकट, छाया पुंगळे, सुनिता खलसे, विजय वैद्य, अनिता सोनटक्के, काशिनाथ उखर्डे, दामोधर डोईफोडे,श्रीकृष्ण चेके, संजय गवते, उमेश दूनगहू,मुमताज पठाण,नजीर खान,मोहिब शेख, लिंबाजी कड,अनिल भोसले,कैलास चेके, कृष्णा सवडे, किशोर महाजन,पंकज पाटील,आश्रुबा बुरकुल,गजानन अंभोरे यांच्यासह इतरांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी श्री भालके यांच्यासह जमीर शेख , प्रदिप साळोख, दिनकर भोसले, भगवान भालके,गणेश लोखंडे,सीमा रिंढे यांनी मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रास्तविक चेअरमन विनोद कळंबे यांनी केले.यावेळी प्रास्ताविकात पतसंस्थेची वाटचाल विषद केली,पतसंस्थेच्या विविध योजनांची माहिती दिली.यावर्षी पतसंस्थेला ६४ लक्ष नफा झाला असून लाभांश ९ टक्क्यांनी वाटप करण्यात येणार असून १९ तारखेनंतर लाभांश खात्यात जमा करण्यात येणार असल्याचे ते म्हणाले.पतसंस्थेच्या सर्व सभासदांना आकर्षक टिफीन भेट देण्यात येणार असून या भेटवस्तू चे विमोचन यावेळी करण्यात आले.सदर भेटवस्तू चे वाटप २२ ऑगस्ट पासून पतसंस्थेच्या कार्यालयीन वेळेत करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.जिजाऊ सावित्री कन्यादान योजनेच्या धर्तीवर सभासदांच्या मुलासाठी शुभमंगल योजना, सेवानिवृत्त सभासद सन्मान योजनेची ही यावेळी त्यांनी घोषणा केली.यावेळी पतसंस्थेचे मयत सभासद तुकाराम मेहत्रे यांच्या वारसांना सन्मान मयत निधीअंतर्गत ४ लक्ष रुपयांचा धनादेश देण्यात आला. शिक्षकांचे गुणवंत पाल्य, सेवानिवृत्त शिक्षक अशा २५जणांचा स्मृतिचिन्ह, शाल देऊन सत्कार करण्यात आला.सूत्रसंचलन दिपक चव्हाण तर आभार विजय वैद्य यांनी मानले.कार्यक्रमासाठी विजय वैद्य, श्रीराम देठे, प्रविण अंभोरे यांच्यासह सभासदांनी परिश्रम घेतले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर नूतनीकरण स्मारकाचा लोकार्पण सोहळा थाटात संपन्न

तभा वृत्तसेवा
भोकरदन/युवराज पगारे

शहरातील सिल्लोड कॉर्नर वरील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचा नूतनीकरण सोहळा रविवारी १८ रोजी पूज्य भदंत एस प्रज्ञाबोधी,पुज्य भदंत शिवली शाक्यपुत्र तसेच माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे व इतर मान्यवरांच्या उप-स्थितीत मोठ्या थाटात संपन्न झाला.तसेच यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य पुतळ्याचेही उद्घाटन करण्यात आले.दरम्यान, कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण व उद्घाटक डॉ भीमराव आंबेडकर साहेब यांनी यावेळी भ्रमध्वनीद्वारे जनतेशी संवाद साधून शुभेच्छा दिल्या.

सदरील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी राज्यमंत्री रावसाहेब दानवे हे होते तर आ संतोष दानवे,माजी

आमदार चंद्रकांत दानवे, माजी सभापती सुदमराव सदाशिवे, माजी नगराध्यक्ष राजाभाऊ देशमुख, माजी नगराध्यक्ष हर्षकुमार जाधव, डॉ संजय पगारे,महेंद्र बनकर,चंद्रकांत पगारे, आशा माळी,रेखाताई पगारे, प्रा डॉ अंकुश जाधव, केशव जंजाळ,मुकेश चिने, इरफानोद्दीन सिद्दीकी,नानासाहेब वानखेडे, रमेश सपकाळ यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते.प्रथम भदंत एस प्रज्ञाबोधी व भदंत शिवली शाक्यपुत्र यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व त्यानंतर भदंतांनी बुद्ध धम्म वंदना घेतली.यावेळी प्रथम परम पुज्य बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे सर्वेसर्वा सचिन पारखे यांनी आपल्या प्रास्ताविकात त्यांचे आजोबा रायभान पारखे यांनी जागा मिळविण्यासाठी व पुतळा उभा करण्यासाठी घेतलेल्या मेहनतीचा आढावा घेत सदरील कार्यक्रमासाठी माजी नगरसेवक दीपक बोर्डे, युवा नेते प्रदीप जोगदंडे तसेच सम्राट अशोक नवयुवक मित्र मंडळ, स्मारक समितीचे पदाधिकारी,भारतीय बौद्ध महासभा,डॉ बाबासाहेब आंबेडकर फाउंडेशन,सम्राट भोगवर्धन बुद्ध विहार समिती,सुजाता महिला मंडळ तसेच समस्त बौद्ध समाज शहर व तालुका या सर्वांचे आभार मानले. यावेळी आपल्या अध्यक्षीय भाषणात माजी मंत्री रावसाहेब दानवे यांनी माजी सभापती सुदमराव सदाशिवे यांच्या भाषणाचा दाखला देत शहरातील बुद्धीविहार व पुतळ्यांच्या सुशोभीकरण करण्यासाठी लागेल तेवढा निधी उपलब्ध करून देण्याची ग्वाही दिली. विहार समितीच्या वतीने तात्काळ समिती गठीत करावी असे आवाहनही त्यांनी उप-स्थित जनतेला केले. यावेळी माजी आमदार चंद्रकांत दानवे यांनी अत्यंत देखण्या सुशोभीकरण सोहळ्याचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. राजाभाऊ देशमुख, हर्षकुमार जाधव यांनी ही आपले विचार मांडले. त्यानंतर अंत्यत उत्साहात मान्यवरांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे उदघाटन करण्यात आले. यावेळी विद्युत रोषणाई व डीजेच्या तालावर तरुणाई अत्यंत उत्साहात थिरकली. कार्यक्रमास शहर व तालुक्यातील समस्त समाज बांधवांनी मोठा सहभाग नोंदवला त्यात महिलांची संख्या मोठी होती हे विशेष. दरम्यान, रात्री उशिरा राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील व माजी मंत्री राजेश टोपे यांनी बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन केले.

हर हर महादेव, वैद्यनाथ भगवान की जय...चा जयघोष

तिसऱ्या श्रावण सोमवारी वैद्यनाथाच्या दर्शनाला भावीकांची गर्दी

हर हर महादेव, वैद्यनाथ भगवान की जय...चा जयघोष करत आज सोमवार दिनांक १९ ऑगस्ट रोजी तिसऱ्या श्रावण सोमवारीयेथील वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या दर्शनासाठी शिवभक्तांचा जनसागर उसळला. दुपारपर्यंत दोन लाखांवर भाविकांनी दर्शन घेतले.

तक्रार निवारणासाठी हेल्पलाईन नंबर जाहीर

तभा वृत्तसेवा
बीड दि.१९ ऑगस्ट

जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार करण्यासाठी तसेच त्यांच्या निवारणासाठी जिल्हा प्रशासनाने ८७८८९९८४९९ हा हेल्पलाईन नंबर आज (दि.१९)सोमवारी जाहीर केला. याच नंबरवर तक्रार करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी केले आहे. जिल्ह्यातील सामान्य नागरीक, समाजसेवक यांच्या तक्रारींचे जलदगतीने निवारण करण्याकरिता जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांच्या वतीने ८७८८९९८४९९ हा व्हॉट्सप हेल्प लाईन नंबर सुरू करण्यात आला. जिल्ह्यातील नागरिकांनी या व्हॉट्सप हेल्पलाईन नंबरवर तक्रारी/विनंती अर्ज लेखी स्वरूपात पीडीएफ करून पाठवावेत. सदर तक्रारींच्या अनुषंगाने योग्य ती कारवाई करण्यात येईल असे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या वतीने आवाहन करण्यात आले. या तक्रारी करताना त्या टंकलिखित केलेल्या असाव्यात, तसेच काही पुरावे इतर काही कागदपत्रे असतील तर त्या हर्वांची एकच पीडीएफ तयार करावी. तसेच याची साईज १० एमबी पेक्षा जास्त नसावी असे कळविण्यात आले आहे. हेल्पलाईन नंबर जिल्हा प्रशासनाने जाहीर केल्याने सामान्य नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे. परंतु यावर कारवाई करावी अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

मानवी जीवन सुखी करण्यासाठी बौद्ध धम्मा शिवाय पर्याय नाही-पू.भिक्खु धम्मशील थेरो

तभा वृत्तसेवा
माजलगाव दि.१९ ऑगस्ट

आपण व्रतवैकल्ये कर्मकांडातून मुक्त झाल्याशिवाय बौद्ध धम्माची तत्वे धारण करू शकणार नाहीत. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्मातील अगाध साहित्य आपणास वाचणे शक्य होणार नाही म्हणून द बुद्ध अँड हिज धम्मा हा इंग्रजी भाषेतील ग्रंथ लिहिला आणि जगाला धम्माची ओळख करून दिली. तसेच भारतातील कर्मकांडग्रस्त बांधवांसाठी २२ धम्म प्रतिज्ञा दिल्या.

प्रसेंनजित राजाच्या कार्यकाळात डाकू अंगुलीमालाच्या दहशितीने प्रजा भयभीत झाली होती. हत्ती घोडे शस्त्र हजारो सैन्य असूनही राजा हतबल झाला होता. परंतु भगवान बुद्धाच्या करुणा मैत्रि बलापुढे क्रूर अंगुलीमाल भगवान बुद्धाला शरण गेला.

व भिक्खु झाला व भगवान बुद्धा च्या उपदेशाने तो दुःख मुक्त झाला.तो दिवस म्हणजे श्रावण पौर्णिमा .

बौद्ध धम्माच्या आचरणाने डाकू असलेला अंगुलीमाल हा पुढे अर्हत भिक्खु होऊन सुखी जीवन जगू लागला.

शील हा उपासकाचा दुसरा सद्गुण आहे. शील हे धन आहे. माणूस माणसाचा सन्मान त्याच्या सदाचारामुळे करतात. धनसंपत्तीपेक्षा माणसाच्या चारित्र्याला, शिलाला ,सदाचाराला महत्त्व आहे. धम्मात याच बाबीला अधिक महत्त्व दिले आहे. म्हणून मानवी जीवन सुखी करण्यासाठी बौद्ध धम्माशिवाय पर्याय नाही. असे प्रतिपादन पूजनीय भिक्खु धम्मशील थेरो यांनी व्यक्त केले. राज्याचा तीर्थक्षेत्राचा दर्जा प्राप्त असलेल्या सद् धम्म सेवा संघाच्या श्रावस्ती बुद्ध विहारात आज दि.१९/८/२०२४ वार. सोमवार रोजी वर्षावासानिमित्त श्रावण पौर्णिमेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजलगाव चे उपविभागीय अधिकारी मा.गौरवजी इंगोले हे उपस्थित होते.

या पूजेचे यजमान आयु.भास्करराव घाडगे व महानंदा भास्करराव घाडगे यांनी उपस्थितांना मिष्टांन्नयुक्त भोजनदान दिले.सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक सद्धम्म सेवा संघाचे अध्यक्ष आयु सदाशिव भालेराव यांनी केले. तर सूत्रसंचालन ड. दशरथ मकसरे यांनी केले. तर आभार सचिव जी.एन घनघाव यांनी मानले.या वेळी सद् धम्म सेवा संघाचे भगवानराव सातपुते,नवनाथ शिनगारे, पांडुरंग जाधव, सोपान उजगरे, एन.जी शिनगारे,रविकांत उघडे, धम्मपाल जावळे, वाल्हाबाई टाकणखार, लीलाताई उजगरे, उपस्थित होते. तर दीपक भालेराव, कचरू खळगे, डॉ.श्रीराम खळगे,लक्ष्मण पोटभरे,बाबासाहेब जाधव, जीवन डोंगरे माजी नगरसेविका सुधमाती पौळ, सुशीलाताई चांदमारे, किरणताई ढाकरगे, विद्याताई निसर्गंध, महानंदा टाकणखार, मीनाताई टाकणखार, तात्यासाहेब साळवे, भगवान जाधव, सदाशिव जाधव आधी तालुक्यातील उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रक्षाबंधन निमित्त लाडक्या भाऊरायाला राखी बांधताना केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील लाडकी बहिण. (छाया:-अनिल गलांडे)

माजलगाव :माहेश्वरी महिला सभेकडून घेण्यात आलेल्या रामायण कथेत महादेव पार्वतीच्या विवाह सोहळ्यात महादेव च्या भूमिकेत पलक उमेश जेथलिया तर पार्वतीच्या भूमिकेत सान्वी राम भूतडा

ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी रक्षाबंधन सण पोलीस व सैन्य अधिकाऱ्यांसोबत साजरा

तभा वृत्तसेवा
किल्लेधारूर दि.१९ ऑगस्ट

किल्ले धारूर तालुक्यातील ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयातील स्काऊट व गाईड पथकातील बाल विद्यार्थ्यांनी दिंनाक १९ ऑगस्ट रोजी रक्षाबंधन सण मोठ्या उत्साहात व आनंदात साजरा केला. त्यांनी किल्ले धारूर तालुका पोलीस स्टेशनमध्ये काम करणाऱ्या पोलीस बांधवां सोबत व १३६ बी इको भारतीय बटालियनच्या सैनिकांसोबत एकत्र येऊन साजरा केला..

या वेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. देविदास वाघमोडे यांनी विद्यार्थ्यांना पोलीस स्टेशनच्या कामकाजाविषयी विस्तृत माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना उत्तरेही दिली. या कार्यक्रमास पोलीस स्टेशन किल्ले धारूर व इको बटालियन १३६ बी मधील सर्व कर्मचारी व मोठी संख्या असलेले विद्यार्थी उपस्थित होते. ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयात विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकीची जपवणूक व्हावी, तसेच विविध सण व उत्सवांची ओळख व्हावी या हेतूने अनेक कार्यक्रम आयोजित केले जातात. रक्षाबंधन सण हा त्यापैकीच एक कार्यक्रम होता. यावेळी ज्येष्ठ पत्रकार श्री सय्यद शाकेर , ज्येष्ठ पत्रकार श्री अनिल महाजन,श्री शाहिद शेख सर, श्री. मुंजाराम निरडे सर पोलीस स्टेशन किल्ले धारूर व इको बटालियन १३६ बी सर्व कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लाडक्या बहिणींनी राजेंद्र मस्केंना बांधली आशिर्वादाची राखी

तभा वृत्तसेवा
बीड दि.१९ ऑगस्ट

बहिण भावांच्या नात्यातील उत्कट जिव्हाळा व अतूट प्रेम जोपासुन बहिणींचा सन्मान करणारा राखी पौर्णिमा सणाला भारतीय संस्कृतीत अनन्य साधारण महत्त्व आहे. राज्य सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना जाहीर करून राज्यातील बहुतांश महिलांना सन्मानजनक सक्षम आधार दिला. आगामी काळात भगिनींचे आशीर्वाद वरदान ठरतील.

अशी अपेक्षा व्यक्त करून राजेंद्र मस्के यांनी भगिनींना राखी पौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या.मुख्यमंत्री लाडकी योजनेचा लाभ प्रत्येक पात्र भगिनी पर्यंत पोहोचवण्यासाठी भाजप जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या संकल्पनेतून भाजपा कामगार मोर्चाच्या पुढाकाराने संघर्षयोद्धा जनसंपर्क कार्यालय येथे मोफत नाव नोंदणी अभियान राबवण्यात आले .अभियानांतर्गत सुमारे २००० पेक्षा अधिक महिलांनी आपली नाव नोंदणी केली. यापैकी ७५ टक्के महिलांचे मानधन त्यांच्या खात्यात जमा झाले. महिलांच्या उत्स्फूर्त पुढाकारातून राजेंद्र मस्के यांच्या संघर्षयोद्धा जनसंपर्क कार्यालयात रक्षा बंधनाचा गोड कार्यक्रम शेकडो महिलांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

महिलां भगिनींनी राजेंद्र मस्के यांचे औक्षण करून राखी बांधली. यावेळी प्रत्येक भगिनींना साडी सप्रेम भेट दिली .या सांस्कृतिक कार्यक्रमास माजी जिप उपाध्यक्ष जयश्रीताई मस्के, लाडकी बहीण योजनेचे प्रदेश सहप्रभारी ओमप्रकाश गिरी.कामगार मोर्चाचे प्रदेश सचिव तथा मराठावाडा अध्यक्ष दादासाहेब ननावरे, कामगार मोर्चा मराठावाडा उपाध्यक्ष लालासाहेब पन्हाळे, मारुती तिपाले,लताताई मस्के,मनिषाताई स्वामी, नेहा माळी, गीताताई काळे, मनीषाताई मुंडे, वैशाली नन्नवरे, गीतांजली ननवरे, कविताताई गिरी, अंजलीताई गिरी,बाळासाहेब सोलनकर .गणेश तोडेकर, सुरेश माने, राकेश बिराजदार,अजय ढाकणे, अविनाश नवले,आदी सह महिला बहुसंख्येने उपस्थित होत्या.

संतवाङ्मय तरुण पिढीला रुचेल असे सांगण्याची गरज

डॉ. सौ. स्वाती शिरडकरांचे प्रतिपादन

तभा वृत्तसेवा
बीड दि.१९ ऑगस्ट

विश्ववंदिता भारताच्या निर्माणासाठी संतांचे वाङ्मय हे अत्यंत प्रभावी असून ते आजच्या तरूणाईला समजेल, रूचेल अशा पद्धतीने सांगण्याची गरज आहे असे प्रतिपादन श्री रामचंद्र वैद्यकीय विज्ञान संस्थेच्या अधिष्ठाता डॉ. सौ. स्वाती शिरडकर यांनी केले.

दासबोध सखोल अभ्यास फाऊंडेशनच्या कोअर कमिटीतील सदस्यांच्या बैठकीत मार्गदर्शन करतांना डॉ . शिरडकर बोलत होत्या.

संताचे साहित्य आणि आधुनिक विज्ञानातील अनेक संदर्भ देऊन त्यांनी आजच्या तरुण पिढीला योग्य दिशा देण्याची गरज विशद केली.

दासबोध सखोल अभ्यास हा उपक्रम चाळीस वर्षांपासून कार्यरत असून देशातील नऊ राज्ये व जगातील सहा देशांमध्ये साधक अभ्यास करीत आहेत ही गौरवाची बाब असल्याचे प्रशंसोद्गार सौ. स्वाती शिरडकर यांनी यावेळी काढले.

दा.स.अ. फाऊंडेशन चे कार्य अजून व्यापक व्हावे या उद्देशाने या उपक्रमाचे संचालक डॉ. विजय लाड यांनी या कोअर कमिटीचे नियोजन केले असून प्रचार, प्रसार, ग्रंथ छपाई व प्रकाशन, निधी संकलन व विनियोग, अभ्यार्थींची प्रवेश प्रक्रिया आणि उपक्रमाचे डिजिटलायजेशन तसेच संकेत स्थळाचे लोकार्पण यासाठी देशातील बारा ज्येष्ठ कार्यकर्त्यांची निवड करण्यात आली आहे.

सौ. विनया व विनायक विद्वांस, सौ. वृंदा व आनंद जोगळेकर, सौ. अपर्णा वांगीकर, सौ. शुभदा व विवेक थिटे (पुणे) , सौ. रंजना पाटील (बेळगाव), सौ. मेधा कुळकर्णी (धाराशिव) , अनिल वाकणकर (वडोदरा) , संतोष सप्रे (मुंबई) , सौ. माधवी पानसे (नांदेड) या सर्व सदस्यांनी दा.स.अ. कोअर कमिटीच्या पहिल्या बैठकीत सक्रीय सहभाग घेतला.समर्थ रामदास स्वामींचे वाङ्मय हे मानवी जीवनातील प्रपंच व परमार्थाचा सुमधुर समन्वय साधणारे असून समाज व देशाच्या सर्वांगीण विकासासाठी या साहित्याचा संशोधक पद्धतीने सखोल व शिस्तबद्ध अभ्यास होण्यासाठी दा.स.अ. फाउंडेशन करीत असलेले कार्य अधिक व्यापक होईल अशी अपेक्षा डॉ. विजय लाड यांनी यावेळी व्यक्त केली.

बैठकीची सुरुवात सीमाताई रिसबुड यांचे हस्ते दा.स.अ. उपक्रमाच्या संयोजक पू. अक्कास्वामी वेलणकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन झाली तर समारोप कल्याणकरी प्रार्थनेने झाला.

सकारात्मक व पारदर्शक कारभारामुळे सभासद, ठेवीदारांचा विश्वास वाढला-अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की

तभा वृत्तसेवा
अंबाजोगाई दि.१९ ऑगस्ट

सभोवताली नकारात्मक वातावरण असताना देखील सकारात्मक व पारदर्शक कारभारामुळे सभासद, ठेवीदार यांचा विश्वास वाढला आहे. आर्थिक क्षेत्रात वेगाने प्रगतीकडे वाटचाल करणारी बँक म्हणून ही आज दीनदयाळ बँकेकडे पाहिले जाते. सर्वसामान्य माणूस केंद्रबिंदु मानून समाजाच्या सर्वच क्षेत्रात आर्थिकदृष्ट्या संपन्नता आणण्यासाठी दीनदयाळ बँक कटीबध्द आहे. बँकींग सेवा योग्य व पारदर्शक ठेवून बँकेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी संचालक मंडळ प्रयत्नशील आहे. आर्थिक क्षेत्रात आश्वासक व दमदार पाऊले टाकणा-या दीनदयाळ बँकेला ३१ मार्च २०२४ अखेर २ कोटी ५० लाख रूपयांहून अधिकचा करपूर्व नफा झाला असून बँकेकडून ३ टक्के लाभांश जाहीर करीत असल्याची घोषणा दीनदयाळ बँकेचे अध्यक्ष ऍड.मकरंद पत्की यांनी २८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत केली.

दीनदयाळ बँकेने ग्राहक, ठेवीदार आणि हितचिंतक यांचा विश्वास संपादन केला आहे. मागील २८ वर्षांपासून सहकार क्षेत्रात काम करताना बँकेने माणसे जोडण्याचे काम केले आहे. दीनदयाळ बँकेची ३१ मार्च २०२४ (आर्थिक वर्ष २०२३ - २०२४) अखेर आर्थिक वर्षासाठीचे लेखापरीक्षीत आर्थिक परिणाम सांख्यिकीय माहिती पुढीलप्रमाणे आहे (कंसातील सर्व नमुद आकडे हे लाखांत आहेत.) एकूण संकलित ठेवी (५२३४५.३२), एकूण वितरीत कर्जे (३१७९२.०८), एकूण गुंतवणुक (२१८८६.२६), भागभांडवल (१५८१.१९), राखीव निधी (३५.२७ लक्ष), निव्वळ अनुत्पादक कर्जे (नेट एनपीए) चे प्रमाण ४.९८ टक्के एवढे आहे., निव्वळ मालमत्ता (३१.४५ कोटी), बँकेकडे (५९०४५.५७) एवढे खेळते भांडवल आहे. बँकेने एकूण (८४१.३३ कोटी) एवढा व्यवसाय केला आहे. तर बँकेस तब्बल २ कोटी ५० लाख ५१ हजार रूपये इतका करपूर्व नफा झाला आहे. १९९६ साली लावलेल्या या बँकरूपी रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. सभासदांच्या सहकार्याने बँक उत्तरोत्तर प्रगती करीत आहे. संचालक मंडळाच्या कामाचे स्वरूप सभासदांसमोर ठेवण्यासाठी या सभेचे आयोजन करण्यात येते. बँकेचे कर्ज वाटप, वसुली, अकाऊंट, लेखापरीक्षण, माहिती तंत्रज्ञान, प्रशासन व ई - सेवा हे सर्व विभाग खूप चांगले काम करीत आहेत. बँकेचे सभासद, कर्मचारी, अधिकारी व संचालक मंडळ यांच्यात सुसंवाद आणि उत्तम समन्वय ठेवण्याचे काम मुख्य कार्यकारी अधिकारी सनतकुमार बनवसकर हे सुरूवातीपासून करीत आहेत. बँकेचे संचालक मकरंद कुलकर्णी व प्रा.जयकरण सुरेशकांबळे यांनी कर्मचारी आणि अधिकारी यांच्या प्रशिक्षणासाठी घेतलेला पुढाकार स्वागतार्ह आहे. प्रशिक्षणामुळे कर्मचारी आणि अधिकारी यांच्यात सकारात्मक बदल दिसून येत आहेत. बँकेने नेहमीच सभासद, ठेवीदार, कर्जदार, ग्राहक व हितचिंतक यांचा विश्वास संपादन केला आहे. तत्पर व दर्जेदार बँकींग सेवा, सुविधा उपलब्ध करून देत दीनदयाळ बँकेने सहकार क्षेत्रात बिना संस्कार, नही सहकार हा संस्कार जोपासला आहे. एक परिवार म्हणून काम करताना विश्वास, विकास आणि विनम्रता हे ब्रीद घेऊन आश्वासक प्रगती साधली आहे. सुरूवाती पासूनच सामाजिक बांधिलकी मानून ही बँक आर्थिक क्षेत्रात कार्यरत आहे. बँकेच्या सर्वांगीण विकासात बँकेच्या संचालिका तथा आमदार सौ.पंकजाताई गोपीनाथराव मुंडे (पालवे) यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन तर उपाध्यक्ष ऍड.राजेश्वर देशमुख, संस्थापक अध्यक्ष तथा विद्यमान संचालक रा.गो.धाट, संचालिका सौ.शरयुताई हेबाळकर, संचालक सर्वश्री विजयकुमार कोपले, चैनसुख जाजु, इंजि.बिपीन क्षीरसागर, प्राचार्य किसन पवार, मकरंद कुलकर्णी, बाळासाहेब देशपांडे, डॉ.विवेक दंडे, प्रा.अशोक लोमटे, जयकरण सुरेशकांबळे, ऍड.शिवाजीराव कराड, महादेव इटके आणि बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सनतकुमार बनवसकर यांचे तसेच आर.बी.आय., सहकार खात्याचे आयुक्त, तथा निबंधक, उपनिबंधक, सहायक निबंधक तसेच बँकेचे सहाय्यक सरव्यवस्थापक, वरिष्ठ अधिकारी, आय.टी.अधिकारी, सर्व शाखाधिकारी, कर्मचारी, पिग्मी एजंट यांचेसह सभासद, ठेवीदार, खातेदार, कर्जदार, हितचिंतक आदींचे सातत्यपूर्ण सहकार्य लाभत असल्याची माहिती देवून अध्यक्ष ऍड.मकरंद पत्की यांनी सभासदांच्या अपेक्षा, बँकींग सेवा योग्य व पारदर्शक रहाव्यात यासाठी बँकेचे संचालक मंडळ व अधिकारी, कर्मचारी वर्ग हा प्रयत्न करीत आहे. आलेल्या सुचनांचे स्वागत करून, सुचनांची योग्य ती दखल घेऊन त्यांना सकारात्मक प्रतिसाद देतो. यामुळे बँकिंग सेवा ही अधिक गुणवत्तापूर्ण होईल असा विश्वास अध्यक्ष ऍड.पत्की यांनी व्यक्त केला. दीनदयाळ बँकेच्या २८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस बँकेचे सभासद, महिला, ज्येष्ठ नागरिक यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. सभेचे सुत्रसंचालन ओंकार कुलकर्णी यांनी केले. तर अध्यक्षीय मनोगत व्यक्त करून उपस्थितांचे आभार बँकेचे उपाध्यक्ष ऍड.राजेश्वर देशमुख यांनी मानले. शांती मंत्राचे पठण करून वार्षिक सर्वसाधारण सभेची सांगता करण्यात आली. सभेच्या यशस्वितेसाठी बँकेच्या वतीने पुढाकार घेण्यात आला.

बीड विभागीय कार्यालय : आदर्शनगर गणपती मंदिरासमोर पांगरी रोड, बीड मो.९४०३२६४९३०, E-Mail - jagannathdeshmukh2020@gmail.com

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

जरांगेंच्या मागण्या शासनाने मान्य केल्यास आम्ही पाठींबा देऊ- जयंत पाटील

वसमत येथील शिवस्वराज्य यात्रेत मराठा आंदोलक आक्रमक

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १९ ऑगस्ट

शरदचंद्र पवार राष्ट्रवादी गटाची शिवस्वराज्य यात्रा वसमत येथे आली असता मराठा आंदोलकांनी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांना घेराव घालत मराठा आरक्षणाबाबत जाब विचारला. यावेळी जयंत पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मनोज जरांगे पाटील यांच्यात झालेल्या चर्चेची माहीती आपल्याला नाही. मात्र मनोज जरांगे यांच्या मागण्या शासनाने मान्य केल्या तर त्याला राष्ट्रवादीचा पाठींबा असेल अशी भूमिका मांडली.

वसमत येथे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार यांची शिवस्वराज्य यात्रा शनिवारी रात्री दाखल झाली होती. यावेळी खा-सदार अमोल कोल्हे, माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर, जिल्हाध्यक्ष दिलीप चव्हाण यांच्यासह राष्ट्रवादीचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी खा अमोल कोल्हे यांनी पुरे झाली टक्केवारी आता वाजवा तुतारी अशा शब्दात वसमतचे आ. राजू नवघरे यांच्यावर नाव न घेता टीका केली. पुर्णा नदीच्या पात्रा-तून किती वाळू उपसा करावयाचा याचा विचार व्हायला पाहीजे मात्र त्याचा विचार न करता बेसुमार वाळू उपसा केल्याचा आरोप खा कोल्हे यांनी केला. पत्रकारांना महायुतीच्या काळात मोर्चे काढावे लागत असेल तर नक्कीच पाणी कुठेतरी मुरतेय अशी टीकाही यावेळी खा अमोल कोल्हे यांनी केली. वसमत विधानसभेला आता सुसंस्कृत चेहऱ्याची गरज आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार सात वेळा निवडणुका झाल्या आता बस झाले असे म्हणत आहेत दुसरीकडे १४ निवडणुका होऊन देखील महाराष्ट्राच्या हितासाठी मैदान सोडणार नाही असा दृढविश्वास राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांचा आहे. झाड कितीही उंच आणि डेरेदार असले तरी त्याची मुळे पक्की असतील तर ते टिकून राहते. ज्यांनी राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांना सोडले तो नेता पडणारच असा विश्वास यावेळी खा अमोल कोल्हे यांनी व्यक्त केला. यावेळी जाहीर सभेला मोठ्या संख्येने राष्ट्रवादी शरद पवार गटाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

जलवाहीन्या दुरूस्तीमुळे हिंगोलीकरांना दोन दिवस निर्जळी

सिध्देश्वर धरणाजवळील जलवाहीन्यांचे काम

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १९ ऑगस्ट

हिंगोली शहराला पाणीपूरवठा करणाऱ्या सिध्देश्वर धरणाजवळील जलवाहीन्याच्या दुरूस्तीचे हाती घेण्यात आल्यामुळे शहराला दि २१ आणि २२ ऑगस्ट रोजी पाणीपूरवठा होणार नसल्याचे नगर पालिकेचे मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांनी सांगितले आहे. त्यामुळे नागरिकांना दोन दिवस निर्जळीचा सामना करावा लागणार आहे.

हिंगोली शहराला सिध्देश्वर धरणातून पाणीपूरवठा केला जातो. शहरातील सतरा प्रभागामधून सुमारे एक लाख नागरिकांना नळाद्वारे पाणीपूरवठा होतो. त्यासाठी जुने शहर आणि नवीन वसाहत या भागात सुमारे १५ पेक्षा जास्त जलकुंभ आहेत. याशिवाय आदर्श महाविद्यालय परिसरातील नवीन वसाहतींना योग्य दाबाने पाणीपूरवठा व्हावा यासाठी नवीन दोन जलकुंभ उभारण्यात येणार आहेत.

शहरातील सर्व प्रभागांना योग्य दाबाने पाणीपूरवठा व्हावा यासाठी मुख्याधिकारी अरविंद मुंढे, नगर अभियंता रत्नाकर अडसिरे, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, अभियंता पुतळे यांच्या पथकाने पाणी वाटपाचे नियोजन करून प्रत्येक प्रभागात किमान दोन दिवसाआड करून पाणीपूरवठा होईल याची दक्षता घेतली जात आहे. दरम्यान, सिध्देश्वर धरणावरील जलवाहीनी नादुरूस्त झाल्यामुळे पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी पालिकेने तातडीने दुरूस्तीचे काम हाती घेतले आहे. बुधवार दि २१ आणि गुरूवार दि २२ ऑगस्ट रोजी जलवाहीनी दुरूस्त केली जाणार आहे. सध्या दरूस्तीच्या कामाची पाहणी केली जात असून काही ठिकाणी दुरूस्तीचे कामही युध्दपा-तळीवर हाती घेण्यात आले आहे. त्यामुळे हिंगोली शहराचा पाणीपूरवठा दोन दिवस विस्कळीत होणार आहे. नागरिकांनी पाणी जपून वापरण्याचे आवाहन मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांनी केले आहे.

हिंगोली- शिवाजी नगर येथील दत्त मंदिरात श्रावण मासानिमित्त सार्वजनिक श्रावणीचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. यावेळी अनंता धर्माधिकारी, दिवाकर धर्माधिकारी, दुर्गादास बंडाळे, कावडे, राजू घवाड, हेमंत कुलकर्णी, कल्याण आसेगावकर, किशोर भालेराव, अरूण देशपांडे, मंडलीक, देविदास पांडे, डॉ किशोर जोशी, गणेश पहीनकर आदी. छाया- सुनील पाठक

आदर्श महाविद्यालयात रक्षाबंधन दिन उत्साहात साजरा

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १९ ऑगस्ट

शहरातील आदर्श महाविद्यालयामध्ये राज्यशास्त्र विभागातर्फे प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली बी.ए. प्रथम वर्षाच्या विद्यार्थिनींकडून रक्षाबंधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रम प्रसंगी विद्यार्थ्यांना रक्षाबंधन सणाचे महत्व राज्यशास्त्र विभागातील प्रा. जी. पी. चव्हाण यांनी सांगितले की, बहीण या दिवशी भावाला ओवाळून त्याच्या हातावर राखी बांधते आणि आपले भावाविषयी प्रेम व्यक्त करते. या सणाचे आधार-स्तंभ म्हणजे प्रेम, पराक्रम, संयम आणि साहस. निस्व-ार्थ प्रेमाची व्याख्या म्हणजे भावा-बहिणीचं नातं होय. पूर्वजांनी भारतीय संस्कृती मध्ये या नात्याच्या पवित्रतेचा महिमा गायला आहे. आपल्या भारत देशाने संस्कृतीचे उत्तम उदाहरण देऊन मानवाला योग्य दिशा प्रदान केली आहे. स्त्री सन्मान हा सुद्धा या सणामधून दिलेला उपद-ेश होय. राखी' ह्या शब्दातच रक्षण कर'-राख म्हणजे सांभाळ' हा संकेत आहे. कुठल्याही कर्तबगार, धाडसी शूरवीराने याचक, दुर्बल, वृद्ध, आजारी, असहाय्य, अपंग व अबलांचे रक्षण करणे हा धर्म आहे. हेच लक्षात घेऊन याच दिवशी रेशमी धागा अशा करारी पुरुषाच्या हाती बांधून त्याच्याकडून रक्षणाचे अभय घेण्याची ही प्रथा आहे. यातला गर्भित अर्थ नात्याचे रक्षण करणे हाच आहे. तसेच गौरव वानखेडे यांने आपले म नोगत व्यक्त केले. या कार्यक्रम प्रसंगी डॉ. सुरेश लेकुळे, डॉ. आकाश बांगर, प्रा. माधव बळवंते व बी. ए. प्रथम वर्षातील गायत्री कुबडे, दुर्गेश्वरी भगत, प्रतीक्षा चव्हाण, पूजा बांगर, तृप्ती जाधव, रूपाली ठोके, स्नेहल शिखरे, नंदिनी सारडा, पायल शेळके, साक्षी गिड्डे, तृप्ती कांबळे, सपना केंद्रे, पल्लवी पट्टेबहादूर, ओमकार शिंदे, प्रफुल जमदाडे, निलेश भोयर, आदिनाथ गाडगीळ, राजेश फ ुफाटे तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी उप-स्थित होते.

हिंगोलीत जागतिक छायाचित्र दिन उत्साहात साजरा

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १९ ऑगस्ट

हिंगोली जिल्हा प्रेस फोटोग्राफर व हिंगोली जिल्हा फोटोग्राफर असोसिएशनच्या वतीने शासकीय विश्रामगृह येथील सभागृहात जागतिक छायाचित्र दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सुनील पाठक यांच्या हस्ते कॅमेऱ्याची पूजा करण्यात आली. यावेळी जेष्ठ फोटोग्राफर संतोष अर्धापुरकर यांनी कॅमेऱ्यात होणाऱ्या आधुनिक बदला संदर्भात माहिती दिली, नवीन नवीन आधुनीक टेक्नॉलॉजीचा वापर फोटोग्राफर यांनी केला पाहिजे. कॅमेरात होणाऱ्या बदला संदर्भात संपूर्ण माहिती घेणून काम करावे. जेणेकरून फोटो पाहून ग्राहकाचे मन प्रसन्न झाले पाहिजे. ग्राहक प्रसन्न झाला तर त्यातच आ-पले खरे कौशल्य दिसत होते, अशी माहिती दिली. यावेळी जिल्हाध्यक्ष गजानन थोरात, संतोष अर्धापुरकर, सुधाकर वाढवे, संदीप बोरकर, विजय गुंडेकर, निलेश गरवारे, राजू गवळी, सुनिल प्रधान, बाल-ाजी वाबळे, सचिन जैन, सचिन बंडाळे, बालाजी पारोळकर, प्रज्वल कान्हेड, पिंटू तरोडे, आर्या पवार, पंढरी गायकवाड, आदी उपस्थीत होते.

जागतिक छायाचित्र दिनानिमित्त गोवा येथील ५ दिवसीय कार्यशाळा आयोजीत करण्यात आली. २५ ऑगस्ट ३० ऑगस्ट पर्यंत कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेला हिंगोली जिल्हा प्रेस फोटोग्राफर असोसिएशन व जिल्हा फोटोग्राफर असोसिएशनचे सर्व पदाधिकारी जाणार आहेत.

संक्षिप्त वृत्त

औंढा तहसीलमधील वैजनाथ भालेराव यांना आदर्श नायब तहसीलदार पुरस्कार

औंढा नागनाथ- हिंगोली जिल्ह्यातील तीनही तालुक्यातून आदर्श नायब तहसीलदार पुरस्कार औंढा नागनाथ तालुक्याचे वैजनाथ भालेराव यांना मिळाला आहे. जिल्हाधिकारी खुशाल सिंह परदेशी सरांचे हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश म हाडिक, सर्व प्रांताधिकारी, सर्व तहसीलदार वरिष्ठ अधिकारी सर्व संघटनांचे पदाधिकारी मंडळ अधिकारी, तलाठी, कोतवाल शिपाई वर्ग हजर होते. सदर कार्यक्रम जिल्हा नियोजन सभागृहात संपन्न झाला.

इंद्रमणी लदनिया यांचे निधन

हिंगोली- अग्रवाल समाजा-तील ज्येष्ठ समाजसेविका श्रीमती इंद्रमणीबाई लदनिया वय ९७ वर्षे यांचे रविवारी दुपारी मारवाडी गल्ली येथे त्यांच्या राहत्या घरी वार्धक्याने दुःखद निधन झाले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ परिवारातील मराठवाड्यातील जुन्या काळातील ज्येष्ठ स्वयंसेवक व हिंगोलीतील कापड व्यापारी आणि मूळचे नर्सी नामदेव येथील रहिवाशी स्व.रामेश्वरजी लदनिया यांच्या त्या धर्मपत्नी व ओमप्रकाश, गोपाल व सुभाष लदनिया यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात मुले, मुली, जावई, सूना, नातवंडे, पतवंडे व आप्तेष्ट असा मोठा परिवार आहे. धार्मिक व सामाजिक क्षेत्रातील एका ज्येष्ठ समाजसेविकास कायम मुकल्याची भावना अनेकांनी व्यक्त करून श्रद्धांजली अर्पित केली. भाजपचे प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा व्यापारी महासंघाचे उपाध्यक्ष सुभाषचंद लदनिया यांच्या त्या मातोश्री होत. सोमवारी त्यांच्या पार्थिवावर कयाधू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राजकीय पक्षांचे पुढारी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते, शहरातील व्यापारी तसेच प्रतिष्ठित नागरिक अंत्ययात्रेत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

मुख्यमंत्री- माझी लाडकी बहिण योजनेच्या अर्जासाठी बँकेसमोर गर्दी

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १९ ऑगस्ट

शहरातील भारतीय स्टेट बँकेसमोर मागील आठवडा भरापासून मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचे अर्ज भरण्यासाठी महिलांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याचे दिसत आहे. या गर्दीमुळे मोंढ्यातील वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे.

मुख्यमंत्री- माझी लाडकी बहिण योजनेचे दोन महिन्यांचे ३ हजार रूपये पात्र महिलांच्या खात्यात जमा होत आहेत. त्यामुळे आता या योजनेचा लाभ घेण्यासाठी येथील भारतीय स्टेट बँकेच्या समोर मागील आठवडाभरापासून सकाळपासून शहर आणि ग्रामीण भागातील सर्व जातीधर्माच्या महिला मुख्यमंत्री- माझी लाडकी बहिण योजनेचे अर्ज भरण्यासाठी गर्दी करीत आहेत. सकाळपासून महिला आणि त्यांचेसोबत त्यांचे नातेवाईक येत असल्याने बँकेच्या समोर लांबच लांब रांगा लागत असून या रांगामुळे मोंढ्यातील रस्त्यावर वाहतुक वारंवार खोळंबत आहे. या बँकेत अनेक महिलांचे खाते असल्यामुळे खाते केवायसी करणे तसेच इतर प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ही गर्दी होत आहे. काही दिवसांपूर्वी शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक नरेंद्र पाडळकर यांन भेटही दिली होती.

माळधामणी येथे जिजाऊ ब्रिगेडच्या शाखेची स्थापना

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १९ ऑगस्ट

तालुक्यातील माळधामणी येथे जिजाऊ ब्रिगेडची शाखा स्थापन करण्यात आली. यावेळी जिजाऊ ब्रिगेडच्या अध्यक्ष सौ. साधना हेंबाडे पाटील, सचिव प्रा. सिमा वडदकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमास उपाध्यक्षा राजश्री सोळंके, सहसचिव अरुणा अंभोरे उपस्थित होत्या. यावेळी राजाबाई म ुंजाजी शिंदे यांची अध्यक्षपदी तर निकिता नागोराव शिंदे यांची उपाध्यक्षपदी, सचिव स्नेहल नागोराव भगत, सहसचिव सीता नागोराव कदम, कोषाध्यक्ष प्रियंका दत्तराव उबाळे यांची निवड करण्यात आली. सदस्यपदी ताई बाबुराव कदम, संगीता विजय कऱ्हाळे, मुक्ताबाई तुकाराम देवरे, अनुसया बाबुराव शिंदे, वंदना बालाजी भोसले, कौशल्या तुकाराम भोसले, आशाताई लक्ष्मणराव शिंदे, तारामती विश्वनाथ मांडगे, नीता संतोष शिंदे, अनुसया लक्ष्मणराव डव्हळे, राधाबाई मुंजाजी शिंदे, अश्विनी शहाजी भोसले, रेखा अरुणराव सावंत, शांताबाई भिमराव जाधव, गोदावरी शेषराव शिंदे, शांताबाई रंगनाथ शिंदे, रुक्मिणीबाई गिंडे, लताबाई वसंतराव शिंदे, समुद्राबाई खाडे, विमलबाई बाबुराव तडस, धोंडाबाई राऊत, मंगल शिवाजी भोसले, संध्या भुजंगराव भगत, निकिता संतोष पौळकर महिला यांची निवड करण्यात आली. जिजाऊ ब्रिगेडच्या अध्यक्षा सौ.साधना हेंबाडे पाटील व सचिव प्राध्यापक सीमा वडकर यांनी मार्गदर्शन करून त्यांना जिजाऊ ब्रिगेड तर्फे नियुक्तीपत्र देण्यात आले.

जैन समाजाच्या स्वाध्यायाचे महत्व समजले जिल्हाधिकारी पापळकर यांचे प्रतिपादन

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १९ ऑगस्ट

हिंगोली जिल्ह्यात नेमणूक झाल्यानंतर शांतता आणि संयम शिकलो याचबरोबर जैन धर्माच्या स्वाध्यायाचे महत्त्व खऱ्या अर्थाने समजले असे प्रतिपादन हिंगोली ते जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी केले.

जैन धर्मियांच्यावतीने महावीर भवन येथे आयोजित निरोप समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी तेजकुमार झांजरी होते. तर प्रमुख पाहुणे ॲड मनीष साकळे, मिलिंद यंबल, अमोल संघई, निश्चल यंबल, भूपाल दोडल, रत्नदीप सावजी, वंदनाताई सोवितकर, शरद मोहारे अशीश दोडल, कुलदीप मास्ट, संजय दोडल, सुयोग कंदी, पंचराज यंबल, संदीप महाजन, भूपाल दोडल यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना जिल्हाधिकारी पापळकर पुढे म्हणाले हिंगोलीतील माझा कार्यकाळात समाधानकारक गेला .इथे बरीच नवीन कार्य करण्याची संधी मला मिळाली. पंडितजी अमोल संघई यांच्याकडून खरे जैन तत्त्वज्ञान मला कळाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रेमेंद्र बोथरा यांनी केले. पुसेगाव येथील बाहुबली जैन मंदिरास दीड कोटीचा निधी दिला. यावेळी जैन समाजाच्यावतीने जिल्हाधिकारी पापळकर यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

भोकर मतदारसंघात श्रीजयाताईंचा विजयाचा मार्ग खडतरच!

तभा वृत्तसेवा
नांदेड,१९ ऑगस्ट -

लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला फेक नॅरेटिव्ह फटका बसल्याने भारतीय जनता पार्टी आता फेक नॅरेटिव्ह पसरणार नाही याची पुरेपूर काळजी घेत असली तरी नांदेड जिल्ह्यातील भोकर मतदारसंघात मात्र केवळ खासदार अशोक चव्हाण यांच्या कुटुंबीयांसह त्यांच्यासोबत राहणाऱ्या पदाधिकाऱ्याविरुद्ध नॅरेटिव्ह पसरविण्यात येत असल्याने श्रीजया चव्हाण यांच्या विजयाचा मार्ग खडतरच असल्याची चर्चा केवळ भोकर मतदारसंघ नव्हे तर नांदेड जिल्ह्यात सुरू आहे.

लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी भारतीय जनता पार्टी प्रवेश केला. या प्रवेशाचा भारतीय जनता पार्टीला फायदा होईल अशी चिन्हे दिसू लागली. खासदार अशोक चव्हाण प्रचारात देखील उतरले. परंतु या प्रचारादरम्यान खासदार अशोक

चव्हाण यांना जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागले. त्यातच भारतीय जनता पार्टी बद्दल फेक नॅरिटीव्ह पसरविण्यात आला आल्याने भाजपाला याचा फटका बसला. विधानसभा निवडणुकीत जनतेचा रोष कमी होईल अशी आशा असतानाच भोकर मतदारसंघ वर उमेदवारीची दावेदरी करून खासदार अशोक चव्हाण, माजी आमदार अमिता चव्हाण व संभाव्य उमेदवार श्रीजया चव्हाण या मतदारसंघ पिंजुन काढत आहेत. विविध विकास कामांचे भुमीपुजन करण्यात येत आहे. परंतु विकास कामे मार्गी लागत असतानाही यावेळीही त्यांना जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागत असल्याचे चित्र दिसून येत आहे. नुकतेच भोकर मतदारसंघात संत सेवालाल स्मारक भूमीपूजन दरम्यान काही शेतकऱ्यांनी गोंधळ घातला. पोलिसांनी वेळीस मध्यस्थी करून शेतकऱ्यांना शांत केले. लोकसभा निवडणुकीत भाजपा विरुद्ध फेक नॅरेटिव्ह पसरला होता. पुरंतु आता विधानसभेच्या पूर्वीच केवळ खासदार अशोक चव्हाण यांच्यासह त्यांचे कुटुंब, मर्जीतील पदाधिकाऱ्यांविरोधात नॅरेटिव्ह पसरत असल्याने श्रीजया चव्हाण यांच्या विजयाचा मार्ग खडतरच असल्याची चर्चा होत आहे. तर दुसरीकडे याचा फायदा होईल या आशेने काँग्रेसकडून तिरुपती कोंडेकर, बाळासाहेब रावणगावकर यांच्यासह दामिनी ढगे देखील निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत. त्यामुळे खासदार अशोक चव्हाण यांना वेळीच हा नॅरेटिव्ह दूर करावा लागेल अशी चर्चा भाजपाच्या कार्यकर्त्यांत सुरू आहे.

ग्रामपंचायतच्या ठोस लेखी आश्वासनानंतर उपोषण मागे

तभा वृत्तसेवा
मुदखेड,१९ ऑगस्ट -

स्मशानभूमी रस्ता व जागेसाठी शासनाचे तसेच लोकप्रतिनिधींचे लक्ष वेधण्यासाठी सुरू असलेले उपोषण ग्रामपंचायत चे ठोस आश्वासन, तहसील व पंचायत समितीच्या मध्यस्थीने पाचव्या दिवशी उपोषण मागे घेण्यात आले असून जागी संदर्भातील अहवाल दोन दिवसात संबंधित प्रशासनाला सादर करण्याचे लेखी आश्वासन देण्यात आले आहे.

तालुक्यातील निवघा या गावातील स्मशानभूमीच्या प्रमुख मागण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुकाप्रमुख तथा सामाजिक कार्यकर्ते प्रमोद व्यंकटराव पवार यांनी आमरण उपोषण सुरू केले होते. यामध्ये मराठा /मातंग तसेच बौद्ध स्मशान भूमी कडे जाणारा रस्ता चिखलमय तसेच खडतर असल्याने या रस्त्याचे तात्काळ मजबुतीकरण करण्याची मागणी केली होती. यासोबतच लिंगायत समाज तसेच मुस्लिम समाज यांच्या दफन विधीसाठी गावठाण जागा नमुना नंबर आठ ला लावण्याची मागणी केली होती. यापूर्वी स्मशानभूमीच्या मागण्यांसाठी उपोषण करण्यात आले होते परंतु प्रश्न निकाली काढण्यात स्थानिक प्रशासन, संबंधित प्रशासन यांनी हेतू परस्पर दुर्लक्ष केले होते. स्मशानभूमीचा प्रश्न निकाली निघत नसल्याने पुन्हा स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला आमरण उपोषण सुरू करण्यात आले होते. अखेर आमरण उपोषणाच्या पाचव्या दिवशी ग्रामपंचायत, तहसील व पंचायत समिती ला जाग आली.

तहसीलदार आनंद देऊळगावकर यांच्या आदेशाने विस्तार अधिकारी निलेश बंगाळे, तलाठी मुळेकर, ग्रामसेवक एम के मोरे, उपसरपंच उद्धव पवार निवघेकर यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेत प्रमुख मागण्या संदर्भात चर्चा केली. यानंतर शिष्टमंडळाने लेखी ठोस आश्वासन दिले. आमरण उपोषण करते प्रमोद पवार यांना लिंबू पाणी देऊन उपोषण सोडण्यात आले. ग्रामपंचायत तसेच संबंधित प्रशासनाने याविषयी लवकरात लवकर पाठपुरावा करून

संबंधित प्रश्न निकाली काढावा अन्यथा पुन्हा आंदोलन करण्याचा इशारा उपोषणकर्ते प्रमोद पवार यांनी दिला.

यावेळी शिवा संघटनेचे तालुका प्रमुख प्रकाश कांचनगिरे, काँग्रेस कमिटी तालुका अध्यक्ष मुदखेड प्रताप देशमुख, मनमत राजेवार ओमप्रकाश पवार, योगेश पवार, तंटामुक्ती अध्यक्ष आनंदा पवार ,गंगाधर राजेवर , वैजनाथ राजेवर , चंद्रकांत राजेवार, नारायण नरडेले, श्रीरंग केंदे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

अहवाल सादर करण्याचे लेखी आश्वासन देण्यात आले

स्मशानभूमी च्या मागण्या संदर्भात सुरू असलेल्या आमरण उपोषणासाठी ग्रामस्थांच्या शिष्टमंडळाने तहसीलदार आनंद देऊळगावकर यांच्याशी चर्चा करून लक्ष वेधले. यानंतर ग्रामस्थांच्या शिष्टमंडळात अ ब क ड चा सविस्तर अहवाल ग्रामपंचायत ने सादर केला नसल्याचे निदर्शनास आणून दिले. संबंधित अहवाल ग्रामपंचायत ने दोन दिवसात प्रशासनाकडे सादर करण्याचे ठोस लेखी आश्वासन देण्यात आले आहे.

संक्षिप्त वृत्त

भोकर येथील शाहू विद्यालयात भूकंपाच्या मॉक ड्रीलचे आयोजन

भोकर-येथील श्री शाहू महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आपत्ती व्यवस्थापन संदर्भातील भूकंपाच्या परिस्थितीत कोणती काळजी घ्यावी व आपले घरातील इतरांचे प्राण कसे वाचवायचे याबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली. याच माहितीवर आधारित भूकंपाच्या परिस्थितीत विद्यार्थ्यांनी घाबरून न जाता परिस्थिती कशी हाताळायची याचे प्रात्यक्षिक म्हणून मॉक ड्रील घेण्यात आले. याप्रसंगी मूख्याध्यापक संजय देशमुख कामनगावकर, उपमुख्याध्यापक किनेवाड , प्राथमिक विभागाचे मुअ जगदंबे सर, सलीम सर, आपत्ती व्यवस्थापन पथकातील कर्मचारी व इतर शिक्षक उपस्थित होते.

पत्रकार धनंजय सोळंके यांना राज्यस्तरीय महाकवी डॉ. वामनदादा कर्डक पुरस्कार प्रदान

नांदेड-छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. प्रमोद दुथडे फाउंडेशनच्या वतीने महाकवी वामनदादा कर्डक यांच्या जयंती निमित्त घेतलेल्या कार्यक्रमात

शाल श्रीफळ, गौरवचिन्ह व रोख धनादेशासह पुरस्कार देवून गौरव.नांदेड येथील पत्रकार व मॅक्स महाराष्ट्र वृत्त वाहिनीचे मराठवाडा ब्युरो धनंजय प्रल्हादराव सोळंके यांना छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. प्रमोद दुथडे फाऊंडेशनच्या वतीने २०२४ चा राज्यस्तरीय महाकवी डॉ. वामनदादा कर्डक पुरस्कार देवून गौरव करण्यात आलाय. गेल्या पंधरा वर्षा पासून जिया न्युज,गर्जा महाराष्ट्र,महाराष्ट्र वन चॅनल,-इझ माझा ते मॅक्स महाराष्ट्र सारख्या वृत्त वाहिण्यात पत्रकारिता करत मराठवाड्यातील शेतकरी, कष्टकरी,विद्यार्थी, दुर्लक्षित समाजाचे प्रश्न सरकार आणि समाजापुढे मांडून त्यांना वाचा फोडण्याचा प्रयत्न प्रयत्न आपल्या वार्तांकनातून ते करतं आहेत. पत्रकरतेतील त्यांच्या योगदानाला लक्षात घेवून डॉ. प्रमोद दुथडे फाउंडेशनच्या वतीने त्यांना हा पुरस्कार जाहीर करण्यात आला होता. दिनांक १८ऑगस्ट रोजी महाकवी वामनदादा कर्डक यांच्या जयंतनिमित्त छत्रपती संभाजीनगर येथे तापडिया नाट्य मंदिर याठिकाणी घेण्यात आलेल्या भव्य सन्मान सोहळ्यात हजारोंच्या उपस्थितीत या कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ. प्रमोद दूथडे कार्यक्रमाचे अध्यक्ष कार्यकारी अभियंता अशोक येरेकर यांनी रोख रकमेसह,शाल, श्रीफळ, गौरवचिन्ह देवून त्यांना महाकवी डॉ.वामनदादा कर्डक पुरस्कार सन्मानाने प्रदान करण्यात आलाय.या गौरव सोहळ्याला प्रमूख पाहुणे म्हणून शिक्षण उपसंचालक अनिल साबळे , व्यवस्थापकीय संचालक रमेश बनसोड, शिक्षण महर्षी प्राचार्य सुनील वाकेकर रमेश पवार,डॉ, प्रमोद दुथडे, अभियांता अशोक येरेकर आदी मान्यवर उपस्थित होते.सदर महाकवी डॉ.वामनदादा कर्डक राज्यस्तरीय समारोह रिपब्लिकन टायगर फोर्सचे अध्यक्ष विजयकुमार खंडागळे व डॉ. प्रमोद दुथडे यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आला.

देगलूर महाविद्यालयाच्या खेळाडूला जलतरण स्पर्धेत जनरल चॅम्पियनशिप

देगलूर-स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड व उत्कर्ष वोकेशन ट्रेनिंग कॉलेज,सगरोळी येथे दि.१० ऑगस्ट रोजी आयोजित

आंतर महाविद्यालयीन विद्यापीठीय जलतरण स्पर्धेत देगलूर महाविद्यालयाची कु.दिक्षा दिपक जोगे या खेळाडूने १०० व ५० मीटर फ्रिस्टाईल मध्ये सुवर्ण पदक तसेच १०० मीटर ब्रेदस्टोक मध्ये रौप्य पदक अश्या तीन प्रकरा पदक पटकावत देगलूर महविद्यालयासाठी जनरल चॅम्पियनशिप खेचून आणले आहे व तसेच देगलुर महाविद्यालयाची यशस्वी परंपरा कायम ठेवली आहे.या यशाबदल अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेम्बरेकर,उपाध्यक्ष जनार्धन चिद्रावार, सहसचिव राजकुमार महाजन, कोषाध्यक्ष विलास तोटावार यांच्यासह संस्थेच्या कार्यकारिणी मंडळाचे सदस्य डॉ. कर्मवीर उनग्रतवार, देवेंद्र मोतेवार, नारायणराव मैलागिरे, सूर्यकांत नारलावार, , गंगाधरराव जोशी, रविंद्र अप्पा द्याडे, चंद्रकांत नारलावार, गुरुराज चिद्रावार, विजय उनग्रतवार, सुभाषराव सांगवीकर, गोविंदप्रसाद झंवर यांच्यासह महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ , उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार , उपप्राचार्य प्रा. उत्तमकुमार कांबळे, पर्यवेक्षक श्री संग्राम पाटील , कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी व सर्व प्राध्यापक , कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी आभिनंदन केले आहे.

मऱ्याबाई वाघमारे बितनाळकर यांचे निधन

उमरी-उमरी तालुक्यातील मौजे बितनाळ येथिल जेष्ट महिला श्रीमती

मऱ्याबाई नागोराव वाघमारे बितनाळकर ह्या वृद्धकाळाने दि १८ ऑगस्ट २०२४ रोजी संध्याकाळी ८ : ०० वाजता त्यांचे निधन झाले आहे . मृत्यू समयी त्यांचे वय ७५ वर्ष होते. त्यांचा अंत्यसंस्कार दि १९ ऑगस्ट रोजी वेळ दुपारी १:०० वाजता बितनाळ येथेच स्मशानभुमित करण्यात आला आहे . त्यांच्या पश्च्यात पती ,एक मुलगा , दोन मुली , नातू नातवंड असा मोठा परिवार आहे . सामाजिक कार्यकर्ते अंबादास गायकवाड बितनाळकर त्यांच्या त्या आजी होत.

मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेच्या लाभार्थी महिलांचा साडीचोळी देऊन बोंढारकरांच्या वतीने गौरव

तभा वृत्तसेवा
नवीन नांदेड,१९ ऑगस्ट

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी खऱ्या अर्थाने लाडकी बहीण योजना राबवून महिलांना आर्थिक बळकटी देत त्यांच्या सक्षमीकरणासाठी महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. त्यांच्यामुळे पात्र प्रत्येक महिलेच्या खात्यावर पहिला हप्ता ३००० रुपयाचा मिळालेल्या नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील महिलांचा साडीचोळी देऊन रक्षाबंधनाच्या दिवशी शिवसेना जिल्हाप्रमुख आनंदराव पाटील बोंढारकर यांनी सन्मान केला आहे . नांदेड दक्षिण मध्ये हा कार्यक्रम आज पार पडला.

प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला, यावेळी मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी वचनपुर्ती करून मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना अंतर्गत रक्षाबंधन निमित्ताने माता भगिनी यांच्या सन्मान सोहळा सिडको येथे उपशहरप्रमुख पप्पू गायकवाड यांच्या निवासस्थानी व उपशहरप्रमुख पप्पू गायकवाड आणि शहरसंघटक दशरथ कंधारे यांनी कार्यक्रम नियोजित केला होता.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख आनंदराव पाटील बोंढारकर ,जिल्हा संघटक शंकर पिनोजी, शहरप्रमुख तुलजेश यादव, शहरप्रमुख सुहास खराणे पाटील, तालुकाप्रमुख उद्धव पाटील शिंदे ,अल्पसंख्याक जिल्हाप्रमुख शिराज भाई, व्यापारी आघाडीचे जिल्हाप्रमुख रुपेश बारडकर,मुख्यमंत्री जनकल्याणचे बालाजी गाडगे, महिला आघाडी तालुकाप्रमुख स्नेहाताई पाटील, सिडको महिला शहरप्रमुख रूपालीताई कुलकर्णी, दिक्षाताई वंनजे,एकनाथ सर, जेष्ठ महिला लक्ष्मीबाई, गादेवार यांच्या सत्कार करण्यात आला.

अशासकीय सदस्यपदी संदीप नवघडे

तभा वृत्तसेवा
नांदेड,१९ ऑगस्ट -

राज्य शासनातर्फे राबविण्यात येत असलेल्या लाडकी बहीण योजनेच्या नांदेड विधानसभा क्षेत्रीय समितीच्या सदस्य पदी संदीप नवघरे यांची निवड केल्याचे बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी जाहीर केले आली आहे.

मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजनेची शेवटच्या घटकातील महिलांपर्यंत अंमलबजावणी व्हावी यासाठी राज्य शासनाने विधानसभा क्षेत्र निहाय समित्या जाहीर केल्या आहेत. नांदेड शहराच्या समितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहरचिटणीस संदीप नवघरे यांची अशासकीय सदस्य पदी नेमणूक केल्याचे पत्र बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी निर्गमित केले आहे

सर्वसामान्यांच्या हितासाठी काम करणारे संदीप नवघरे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे जीवन पाटील घोगरे , प्रवीण घुले, विनायक कामठेकर, मयूर कोकरे प्रवीण निखाते, निखिल सूर्य, चेतन कांबळे, चंद्रकांत सोनकांबळे, कपिल जोंधळे, अनूप जोंधळे, सुजित नवघडे, संजय सातोरे यांच्यासह सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे

माहूर तहसिलवर धडकणार किसान सभेचे आंदोलन

तभा वृत्तसेवा
माहुर१९ ऑगस्ट -

अखिल भारतीय किसान सभा माहूर तालुका कमिटीच्या वतिने २१ ऑगस्ट रोजी आपल्या विविध मागण्यांसाठी हजारो शेतकरी-कष्टकऱ्यांचा मोर्चा माहूर तहसिल कार्यालयावर धडकणार असल्याची माहिती किसान सभेचे नेते कॉ.अर्जुन आडे, कॉ.शंकर सिडाम,कॉ. किशोर पवार यांनी दिली आहे.

कापसला १२ हजार, सोयाबिणला ८ हजार हमीभाव जाहीर करा,शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती जाहीर करा, रोजगारासाठी वणवण भटकणाऱ्या मजुरांना गावातच कामसाठी रोजगार हमी योजनेची प्रभावी अमलबजावणी करुन ५०० रु मजुरी द्या,मंजूर घरकुल तातडीने वाटप करुन अनुदान रक्कम ५ लाख करा,कसत असलेल्या व ताब्यातील वन जमीन,देवस्थान जनीन, गायराण जमीनीचे मालकी हक्क द्या, ई पीक पेऱ्याची अट रद्द करून सोयाबीण,

कापसासह सरसकट सर्व शेतीपिकानां व शेतीवर राबणाऱ्या शेतमजुरांना शासनाने जाहीर केलेले ५ हजार रुपये अनुदान द्या, पेसा भरती अतंर्गत सर्व १७ संवर्ग प्रवर्गातील भरती सुरु करा,पेसा कायद्याची ठोस अंलबजावणी करुन आदिवासींचा सर्वांगीण विकास करा,शेतकरी लाभार्थींना प्राधान्य कुटुबांत सामाविष्ट करुन प्रती माणसी५ किलो रेशन धान्य द्या,स्वस्त धान्य दुकानदारांना प्रति क्विंटल ५०० रुपये कमीशन द्या,सन २०२३ चा उर्वरीत पिक विमा शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करा,चिमटा निम्न पैनगंगा धरण रद्द करा आदि मागण्यांसाठी शेतकरी, कामगार,कष्टकऱ्यांनी जास्ती जास्त संख्येने आंदोलनात सामील होण्याचे आहवान किसान सभेच्या माहूर तालुका कमिटीने केले आहे. अन्यथा किसान सभा आरपारचा लढा उभारेल असा इशारा दिला आहे.वरील ज्वलंत मागण्यासाठी कष्टकऱ्यांनी ताकदीनिशी या आंदोलनात सामील होऊन आपला हक्क मागावा असे आवाहन किसान सभेचे नेते कॉ. किशोर पवार यांनी व्यक्त केले.

आंदोलनाची जोरदार तयारी सुरू असुन कॉ.राजकुमार पडलवार,डॉ.बाबाराव डाखोरे,प्रल्हाद चव्हाण,अंबादास आडे,गांगजी मेश्राम,संजय मानकर,रवी भगत,कैलास भरणे,आरीफ सदागर,कादर खान,अमोल आडे,दिंगाबर आगीरकर,कालिदास सोनुले,प्रसराम पारडे,चद्रंभाण निलेवाड,वंसत राठोड,प्रमसींग चव्हाण,किसन जगदाळे आदी किसान सभेचे कार्यकर्ते तयारीला लागले आहेत.

भाऊ-बहिणीचे नाते गहिरे करण्यात पोस्ट ऑफिसचे योगदान

तभा वृत्तसेवा
किनवट,१९ ऑगस्ट -

आपल्या लाडक्या भावाला बहिणीने पाठवलेली राखी रक्षाबंधनापूर्वी प्राप्त व्हावी याकरिता किनवट पोस्ट ऑफिस कार्यालयाने पुढाकार घेतला आहे. रविवार हा सुट्टीचा दिवस असूनही पोस्ट मास्तर अनिल भोसीकर, पोस्ट असिस्टंट एम. डी. भुरके यांच्या दिशानिर्देशांतर्गत पोस्टमन शिवाजी पंदे यांच्यासह किनवट पोस्ट ऑफिस कार्यालयात कार्यरत सर्व कर्मचाऱ्यांनी बहिणींच्या राखीचे वाटप योग्य वेळी केलेले आहे.

किनवट पोस्ट ऑफिस कार्यालयाने सुरू केलेला हा उपक्रम स्तुत्य असून, याविषयी नागरिकांनी आनंद व समाधान व्यक्त केले आहे. व्हॉटस्पच्या काळात राखी मिळणे एक वेगळाच आनंद देऊन जाते, असे यावेळी राखी प्राप्त केलेल्या नागरिकांनी भावना व्यक्त केल्या आहेत, तर यावर्षी पोस्ट ऑफिस मधून राखी संदर्भात वेगवेगळ्या योजना आयोजित करण्यात आल्यात. यामध्ये देशाच्या रक्षणाकरिता देशाच्या सीमेवरील सैनिकांना शहरातील विविध शाळांमधून राखी पाठवण्याचे आवाहन करण्यात आले होते. ज्यामध्ये पोस्ट ऑफिस मधून त्या राख्या मोफत सैनिकापर्यंत पाठवण्यात आल्या आहेत. यामुळे पोस्टऑफिस, सैनिक व नागरिकांचे एक अनोखे अनुबंध यामुळे निदर्शनास आलेले आहे.

आर.आर.मालपाणी मतिमंद विद्यालयात मेंदूविकार शिबिराच्या नाव नोंदणीस प्रारंभ

तभा वृत्तसेवा
नांदेड,१९ ऑगस्ट -

मेंदूचे विकार असणाऱ्या रुग्णांसाठी वरदान ठरत असलेल्या १८ वर्षाआतील मुला-मुलीकरीता येथील मगनपुरा भागातील आर. आर. मालपाणी मतिमंद विद्यालयात दि. १९ ते २१ सप्टेबर या कालावधीत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठीच्या नोंदणीस प्रारंभ झाला असून गरजूंनी त्वरित नोंदणी करावी असे आवाहन मुख्याध्यापक नितीन निर्मल यांनी केले आहे.

आरोग्य शिबीरातील रूग्णांवर मुंबईच्या प्रसिध्द बाल मस्तिष्करोग तज्ञ डॉ. अनैता हेगडेसह तब्बल ३०-३५ डॉक्टरांची टीम आरोग्य शिबिरात रुग्णांची तपासणी व उपचार करणार आहेत. नेहमीप्रमाणे आवश्यकतेनुसार मोफत एमआरआय, सिटी स्कॅन, २-डी इको, ईईजी, ईसीजी, एक्सरे व पॅथॉलॉजीकल तपासण्या करण्यात येणार आहे.

आरोग्य शिबीराचे हे चौदावे वर्ष असून आता पर्यंत झालेल्या पंचवीस आरोग्य शिबीरात जवळपास ७ हजार रूग्णांना लाभ झाला आहे. आरोग्य शिबिरात तपासणी केलेल्या रुग्णांना आवश्यकते नुसार दररोज शाळेतील राजस्थानी एज्युकेशन सोसायटीच्या डॉ. एम. जी. बजाज रिहॅब्लीटेशन सेंटर येथे फिजीओ थेरपीची सोय निशुल्क उपलब्ध करून देण्यात आली आहे.

आरोग्य शिबीर यशस्वी व्हावे यासाठी संस्थेचे अध्यक्ष ओमप्रकाश गिल्डा, सचिव प्रकाश मालपाणी, उपाध्यक्ष कमल कोठारी, सहसचिव डॉ. लक्ष्मीकांत बजाज, कोषाध्यक्ष जयप्रकाश काबरा, बनारसीदास अग्रवाल, अंकित अग्रवाल आदींच्या मार्गदर्शनाखाली मूख्याध्यापक नितीन निर्मल तसेच विद्यालयाचे कर्मचारी परिश्रम घेत आहेत. आरोग्य शिबिरासाठी शाळेत प्रत्यक्ष उपस्थित राहून नोंदणी करावी तसेच आरोग्य शिबिरासाठी प्रत्यक्ष नोंदणी करणे अशक्य असलेल्यांनी डॉ. मनिषा तिवारी (८२०८११४८३२) व संजय रुमाले (९०६७३७७५२०) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' म्हणजे माता-भगिनींप्रती कृतज्ञता!

तभा वृत्तसेवा
नांदेड,१९ ऑगस्ट -

अल्पावधीतच महिलांच्या पसंतीस उतरलेल्या 'मुख्यमंत्री लाडकी बहिण' योजनेअंतर्गत 'लाडक्या बहिणीचा देवाभाऊ' (रक्षाबंधन) महिला मेळावा शहरातील कौठा भागातील मातोश्री मंगल कार्यालय येथे राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली ऑनलाइनद्वारे पार पडला.

भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी या महिला मेळाव्याची नांदेड जिल्ह्याची जबाबदारी माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर, महिला आघाडीच्या श्रद्धा चव्हाण व प्रणिताताई देवरे-चिखलीकर यांच्यावर सोपवण्यात आली होती.

यावेळी मुंबई भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष आशिष शेलार, विधान परिषदेचे सदस्य प्रवीण दरेकर, विजयाताई रहाटकर, महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष चित्राताई वाघ आदींची ऑनलाइन द्वारे उपस्थिती होती तर नांदेड येथून भारतीय जनता पार्टीचे माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर, राज्यसभा खासदार डॉ.अजित गोपछडे, किनवट विधानसभेचे आमदार भीमराव केराम, भाजपा नांदेड दक्षिण ग्रामीण जिल्हाध्यक्ष डॉ.संतुकराव हंबर्डे, महानगराध्यक्ष दिलीप कंदकुर्ते, भाजपा उत्तर ग्रामीण जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख, माजी महानगराध्यक्ष प्रविण साले, डॉ.शितलताई भालके, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष संध्याताई राठोड पुनमताई पवार, भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यकारणी सदस्य मिलिंद देशमुख, बालाजीराव बच्चेवार, जनार्दन ठाकूर नंदकुमार कुलकर्णी, श्रावण पाटील भिलवंडे, बाळू खोमणे, आघाडीचे डॉक्टर सचिन उमरेकर, भारतीय जनता पार्टी जिल्हा सरचिटणीस लक्ष्मणराव ठक्करवाड, भारतीय जनता पार्टी जिल्हा सरचिटणीस डॉक्टर माधवराव उच्चेकर, भारतीय जनता पार्टी लोहा विधानसभा प्रमुख तथा जिल्हा सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर, भाजपा युवा मोर्चा महानगराध्यक्ष बंटी मल्होत्रा, माजी महिला मोर्चा महानगराध्यक्ष वैशालीताई देशमुख, महानगर सरचिटणीस

विजय गंभीरे, सरचिटणीस अमोल कदम, युवा मोर्चा प्रदेश सचिव अनिल बोरगावकर, मंडळाध्यक्ष मारुती वाघ, सुरेश लोट, जसबीरसिंघ धुपीया, महादेवी मठपती, पुनमकौर धुपिया, हिरामण देशमुख, अशोक पाटील धनेगावकर, व्यंकटेश जिंदम विजयाताई घिसेवाड मनोज जाधव व इतर मान्यवर आणि लाडक्या बहिणी उपस्थित होत्या.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची औपचारिक सुरुवात आज झाली असली तरी रक्षाबंधनाच्या आधीच महाराष्ट्रातील १ कोटी ३ लाख लाडक्या बहिणींना ओवाळणी म्हणून खात्यात ३ हजार ००० जमा झाले आहेत. कारण आपले सरकार लेना बँक सरकार नसून देना बँक सरकार आहे. ३१ जुलैपर्यंत आलेल्या फॉर्म्सचेच हे पैसे असून ३१ ऑगस्टपर्यंत फॉर्म भरणाऱ्या बहिणींच्या खात्यातही तब्बल ३ महिन्यांची रक्कम जमा होणार जमा होणार आहे. ही खटाखट योजना नसून फटाफट योजना आहे. आम्ही ही योजना आणली तेव्हा सावत्र भावांनी ठरवलं की बहिणींना ओवाळणी मिळूच द्यायची नाही. त्यासाठी ते आधी कोर्टात गेले, कोर्टाने फटकारल्यानंतर पुरुषांचे फोटो लावून फॉर्म भरले. फॉर्म्ससाठीचे पोर्टल बंद पडले पाहिजे म्हणून जंक डेटा टाकला मात्र आमच्या बहिणींना पैसे देण्याचा निर्धार आम्ही पूर्ण केला. आमच्या माता-भगिनींप्रती आमची ही कृतज्ञता आहे. सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आले त्यांना १हजार ५०० मोल समजू शकत नाहीत, असे देवेंद्र फडणवीस बोलताना म्हणाले.

केंद्र सरकारच्या पाठिंब्याने आम्ही महिला केंद्रीत योजना सुरु केल्या. लेक लाडकी योजना, मुलींना मोफत उच्च शिक्षण, मुद्रा योजनेमार्फत ६३% महिलांना कर्ज, महिला बचत गटाच्या माध्यमातून ६३ लाख महिलांना काम मिळाले. आम्ही आमच्या माता-भगिनींच्या पाठिशी कायम उभे आहोत, हा शब्द याठिकाणी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे.